# रेशीमबंध

**सौ. मनीषा कुलकर्णी**

**कीर्ती प्रकाशन**
औरंगाबाद



© सौ. मनीषा कुलकर्णी
२, यमुना विहार, कालिका पार्कसमोर,
उंटवाडी, जगतापनगर,
नाशिक : ४२२००८.
भ्रमणध्वनी : ९४२१६०८६४१

**प्रथमावृत्ती**
गुढीपाडवा, १६ मार्च २०१०

**प्रकाशक**
सूर्यकान्त दाणेकर
कीर्ती प्रकाशन,
१७, रचनाकार कॉलनी,
देवगिरी कॉलेजजवळ,
औरंगाबाद : ४३१ ००५.
फोन : ०२४०-६५४९०४५, २३५७२४५.
kirtiprakashan@yahoo.co.in

**अंतर्गत सजावट**
दीपक दंडवते

**छायाचित्र**
ऋतुजा कुलकर्णी

**मुद्रणस्थळ**
रजनीश आर्ट प्रिंटर्स सिडको, औरंगाबाद.

**मुखपृष्ठ रचना**
संजय उबाळे

**किंमत**
एकशेवीस रुपये

Reshimbandh *(Pensketches)*
Manisha Kulkarni / Rs. 120/-

प.पू. सद्‌गुरू श्री शंकर महाराज (धनकवडी)
आणि या विश्वातील
सद्-विचारांना मनोभावे
अर्पण...



# परिचय

| | | |
|---|---|---|
| **नाव** | : | सौ. मनीषा निवास कुलकर्णी |
| **निवास** | : | २, यमुना विहार, कालिका पार्कसमोर, उंटवाडी, जगतापनगर, नाशिक : ४२२००८. |
| **शिक्षण** | : | एस.वाय.बी.ए. (यशवंतराव चव्हाण, महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक) कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक आयोजित ‘साहित्यभूषण’ पदवी परीक्षा प्रथमश्रेणीत उत्तीर्ण (२००८) शासनमान्य ग्रंथपालन प्रमाणपत्र अभ्यासक्रम (एलटीसी) उत्तीर्ण (२००७) |
| **लेखन प्रसिद्धी** | : | मिळून साऱ्याजणी, व्यासपीठ दिवाळी अंक, मासिक कादवा शिवार, ऊर्जा दिवाळी अंक, दैनिक देशदूत, गांवकरी, अक्षरबंध, सृजन, सकाळ (मधुरा) |
| **इतर** | : | ऊर्जा दिवाळी अंक २००९ मधील लेखास सर्वोत्कृष्ट लेख (द्वितीय) पुरस्कार. |
| | : | शासकीय कर्मचाऱ्यांचे सार्वजनिक वाचनालय, नाशिक या संस्थेचा सर्वोत्कृष्ट वाचक पुरस्कार (२०००) |
| | : | लेखन, वाचन, संगीत याबरोबर सामाजिक कार्याची आवड |
| **प्रकाशित साहित्य** | : | ‘रेशीमबंध’ (व्यक्तिचित्रसंग्रह) कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद. |

# अंतरंग


| | |
|---|---|
| मनोगत | ६ |
| रावळगावची मामी | ८ |
| ... ते दिवस | १५ |
| एक होता राजू! | २० |
| वाचन संस्कार करणारे बोराटे सर | २४ |
| माझा अवीदादा | २९ |
| मी वडनेरेसाहेब बोलतोय | ३६ |
| आमच्या अक्का | ४० |
| माझ्या मुलींचा बाबा | ४६ |
| ताई नावाच्या आई! | ५४ |
| तिची कहाणी | ५९ |
| धाकटी | ६६ |
| स्वच्छ, गुलाबी, मनसोक्त आंघोळ! | ७१ |
| आईची जेव्हा मुलगी होते... | ७५ |
| एक गुणी लेक : अंकिता | ७८ |
| फोटो आईचा | ८३ |
| तिच्या लेकी अन् मी | ८५ |
| माधवी, तुझी आठवण येते | ९० |
| आई-आबांविषयी | ९७ |
| सदाकाका | १०३ |
| बोक्या | १०७ |
| प.पू. श्री शंकर महाराज | ११२ |




# मनोगत

मी एक मध्यवर्गीय गृहिणी, माहेरी चार बहिणींच्यात सर्वात थोरली. त्यामुळे बालपणी जसं 'पहिली बेटी' म्हणून कौतुक झालं, तशी मोठेपणी मात्र जबाबदारीची जाणीवही, मनात राहिली आहे. आजोळ नाशिकचं! सर्वार्थाने अत्यंत समृद्ध, मला प्रिय असलेलं, म्हणून नाशिकचं आणि माझं अतूट नातंही आहेच. या पवित्र भूमीचे, आजोळच्या सर्व प्रेमाचे, संस्कारांचे मोठेच ऋण माझ्यावर आहे. त्याचा उल्लेख लेखातून स्वाभाविकपणे आलेला आहे. वडिलांची-आबांची बदली दिंडोरी येथे असताना आमचे मराठीचे शिक्षक गुरुवर्य श्री. हरिभाऊ बोराटे सर यांनी आमच्यावर वाचनाचे उत्तम संस्कार केले. आपल्या शिकवण्यातून साहित्य जगताची ओळख करून दिली.

*'दिसामाजी काही तरी लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे।'*

सद्गुरू समर्थ रामदास स्वामींनी म्हटल्याप्रमाणे बालपणापासनूच अखंड वाचन सुरू होते, पण लिहिण्याचे धाडस मात्र होत नव्हते. मनातून मात्र आपणही लिहून पहावे, असे सारखे वाटत होते. नाही म्हटले तरी, एका सर्वसामान्य गृहिणीचे अनुभवविश्व असून असून किती विस्तारित असणार? अन् तिच्या सहवासातील माणसंही अगदीच सर्वसामान्य असणार, असं नाही का? असं वाटे. परंतु डॉ. अनिल अवचट, फादर फ्रान्सिस दिब्रिटो, सुधा मूर्ती, प्रवीण दवणे, अरुणा ढेरे, यांची जवळपास सर्वच पुस्तक वाचली. शिवाय त्यांना 'याची देही याची डोळा' जिवाचा कान करून ऐकलं, पाहिलं तेव्हा आपणही त्यांच्यासारखंच 'सामान्यातलं असामान्यत्व' ओळखून आपल्या माणसांवर लिहावं, असं मनानं घेतलं. शक्य तेवढं किंवा जास्तीत

जास्त असोशीने वाचताना एकदा 'मी वडनेरे साहेब बोलतोय' हा लेख 'व्यासपीठ' दिवाळी अंकासाठी लिहिला.तो प्रसिद्धही झाला. या लेखाचं कौतुक झालं, तेव्हा आपणही लिहू शकतो! त्यामुळेच हा आत्मविश्वास मिळाला. त्यातच 'ऊर्जा' दिवाळी अंकाने एका लेखास उत्कृष्ट लेखाचं बक्षीस दिलं, सुरुवातीपासूनच माझं अत्यंत आवडतं असं दर्जेदार मासिक 'मिळून साऱ्याजणी'ने माझा (मी पहिल्यानेच पाठवलेला) लेख स्वीकारलेला आहे. अशी पोच दिल्यानंतर माझा आनंद द्विगुणित तर झालाच, शिवाय नाही म्हटलं तरी या दोन गोष्टींमुळे माझा लेखनाचा उत्साहही वाढण्यास मदत झाली, हेही खरेच. माझे लेखन, विशेषत: व्यक्तिचित्र आणि ललित लेख हे चांगले होत आहेत, असा अभिप्राय जवळच्या काही सुहृदांकडून आणि घरातूनही मिळाल्यावर अगदी दोन-चार महिन्यातच यातील सर्व लेख अक्षरश: झपाटल्यागत आणि एकटाकी म्हणावेत असे लिहून झाले आहेत. धनकवडीचे श्री शंकर महाराज यांच्या कृपाशीर्वादामुळेच मी हे सर्व लेखन करू शकले आहे. या संग्रहातील बहुतेक सर्वच माणसे अत्यंत साधीसुधी, जगालेखी सामान्य म्हणावीत किंवा लौकिकार्थाने ती फार मोठी वा प्रसिद्ध नाहीत. परंतु त्यांच्या जगण्या-वागण्यातलं मला जाणवलेलं असामान्यत्व महत्त्वाचं वाटतं. या माणसांनी वेळोवेळी प्रेम, आनंद व विश्वासही दिलेला आहे. त्यामुळे मंगलमामी, अविदादा, माधवी रानडे किंवा दररोज दिसणारी शेळ्या चारणारी म्हातारी अशा सर्व माणसांचं चांगुलपण, वेगळेपण, निरागसपण, साधेपण नोंदवून ठेवावंसं वाटलं. या सर्वांचं अक्षरचित्र 'रेशीमबंध' मधून आपल्यासमोर सादर करत आहे. मला अशा आहे की, अशी माणसं प्रत्येकाच्याच घरात - परिसरात अनुभवत असतो. फक्त त्यांचं वेगळेपण आपण लक्षात घेत नाही. त्यांच्याबद्दल आपण आवर्जून लिहीत नाही. ते लिहिण्याचं धाडस मी केलेले आहे. माझे बालपण ते आजवरचे आयुष्य यानुसार 'रेशीमबंध'मधील लेखांचा क्रम लावण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. पुस्तक तयार होण्याच्या प्रक्रियेत कीर्ती प्रकाशनचे सूर्यकांत दाणेकर अंतर्गत सजावट करणारे दीपक दंडवते आणि याकामी मला प्रेरणा व प्रोत्साहन देणाऱ्या सर्वांचीच मी अत्यंत ऋणी आहे.

**- सौ. मनीषा कुलकर्णी**



# रावळगावची मामी

'समृद्ध बालपण म्हटलं म्हणजे, त्यात महत्त्वाचा वाटा हा खुपदा आजोळचा असतो.' आम्हा सगळ्या मावस व सख्ख्या बहिणींना आनंददायी असं आजोळ बऱ्यापैकी लाभलंय. बालपण आणि आजोळ असं वेगळं करताच येणार नाही, इतक्या रम्य आणि मनोज्ञ आठवणींनी ते दिवस आम्ही अनुभवले.

हे आजोळ कुठं म्हणून बरोबर नव्हतं. तर मे महिन्याची, दिवाळीची, नाताळची सुटी किंवा लग्न-मौंजी यासारखे घरगुती लग्नविधीचे कार्यक्रम, आणखी काय काय. आमची आई, मावशी आणि आम्ही सात-आठ बहिणी हमखास आजोळीच जात असू.

खरं तर आजी-आजोबा आम्हाला फारसे आठवतच नाहीत, पण त्यांच्या पश्चात पाच मामा, पाच माम्या, त्यांची मुलं असं मोठं कुटुंब नाशिकला आजोळच्या गणेशटेकवरील शुक्ल वाड्यात अशा निमित्त-कारणाने एकत्र येई.

मामांकडे आम्हा सगळ्यांचे खूप स्वागत होत असे. झोपाळ्यावर बसून झोके घेणे, हे एक आनंदाचे ठिकाण. झोका द्यायला कोण? तर मामाच. मोठ्या मामी टापटीप राहत. त्याचं पुणेरी वागणं, बोलणं. त्या वयाने, मानानेही मोठ्या. त्यामुळे त्यांचं मोठेपण त्या छान सांभाळून असत. बाकीच्या तीन माम्या बिचाऱ्या फार बोलतही नसत. वडाच्या झाडाखाली इतर झाडं वाढत नाहीत, अशी काहीशी गत. किंवा त्यांची तशी काही तक्रारही नसे. त्या आपल्या आलं गेलं, घरकाम, इतर कामं यात सतत

मग्न. मात्र मुलांचं खाणंपिणं, त्यांचं करणं यात कुणीच म्हणून मागे रहायच्या नाहीत. मोठ्यांचा तर प्रश्नच नव्हता. त्यामुळे आमचे मामाकडचे दिवस अगदी भरल्या आनंदाचे वगैरेच असायचे.

या सगळ्यांच्यात सर्वात लाडकी, आवडती, प्रेमळ अशी आम्हा सगळ्या भाच्यांची अन् हो, त्यांच्याही घरातल्या मुलांची आवडती म्हणजे रावळगावची आमची मंगल मामी. मामा रावळगाव शुगर फॅक्टरीत नोकरीस होते. म्हणूनच या मामीला आम्ही सगळेच 'रावळगावची मामी' असेच म्हणतो. रावळगावच्या त्यावेळच्या चॉकलेटची अवीट गोडी तिच्या स्वभावात पुरेपूर भरून राहिलेली आहे, असं मला नेहमीच वाटतं.

आमची ही मामी म्हणजे आजोळच्या सगळ्या व्यक्तींमध्ये आमचं लाडकं दैवतच आहे. आनंदाचं निधानच म्हणा ना. तर ती फक्त हीच मामी. मामी सुटीत कुठे आहे हे आधीच मामा आम्हाला पत्रातून कळवत असत. ती नाशिकला येणार नसेल तर आमची टोळधाड रावळगावकडे मोर्चा वळवणारच! ही काळ्या दगडावरची रेघ होती.

नाशिकला एकदा मामी आली की, आम्ही सगळे तिथे जायचो. आमची ही मामी म्हणजे कामसू, सुग्रणतेचं प्रतीक. तिला काय काय येत असे यापेक्षा काय येत नाही अशीच परिस्थिती होती व आहे. इडली, चिरोटे, ओली भेळ, कढी-गोळे, गुळाचा शिरा असे मुलांना आवडणारे चटक-मटक खूप पदार्थ लहान मोठ्यांसहित साधारण अठरा-वीस जणांसाठी मामी लीलया करायची. आम्ही त्या खाऊचा अक्षरशः फडशा पाडायचो. इतकं ते सारं चविष्ट वगैरे असायचं.

मामी रावळगावहून येताना तिथले चॉकलेट्स, घरी हातावर केलेल्या हातशेवया आठवणीने घेऊन येई. त्या ज्यांना आवडतात त्यांना ती आवर्जून देत असे. साधी शेवयांची खीरही ती दोन-तीन प्रकारे करून खाऊ घालत असे. आम्ही लहान होतो, तेव्हा तिला आम्ही कुणी मदत-बिदत करत नसायचो. उलट आपसात आमची सारखी भांडणं चालायची. रुसवे-फुगवे, हट्ट अशा बालसुलभतेला तर उधाण आलेलं असे, पण मामी त्यावर कधी वैतागली किंवा चिडली असे होत नसे. ती आम्हा सगळ्यांना छान समजून घेत असे.



त्यात मी आपली लाडूबाई. घरात थोरली, पण आजोळी कुक्कुलं बाळ. उठसूठ मी आपली कशावरूनही रुसून बसायची. मग मामी मला म्हणे, 'सांगू नको कुणाला, माझी सगळ्यात लाडकी भाची तू आहेस. आत चल, आपण खाऊ खाऊया हं.'

रविवारचं केसं न्हाणं असेल तरी मी माझा नंबर मामीकडे आधीच लावणार. कधी चुकून तिच्या मुलीचा नंबर लागला असेल तर मी तोफांड करायची. मागाहून न्हायला नकार द्यायची. 'आधी तुमच्या मुलींना न्हायला घातलं ना.' असे चिडणे झाले की मामी शांतपणे समजावे, 'जाऊ द्या गं. ती छोटी आहे ना. पुन्हा नाही कधीच घालणार हं.' मग सुटीभरच्या रविवारी पहिला नंबर केवळ आमचाच. मामी तशी काळजी काटेकोरपणे घेत असे.

माझं आपलं हक्कानं सारं सुरू असे. ती बोलवायला आली की, माझा राग कुठल्याकुठे पळून जाई आणि मीही अशी वेडी, हट्टी की, तिला जणू मी एकटीच लाडाची भाची होते. आज याचं वाईट वाटतं. इतक्या गोड मामीला मी कशी त्रास देत असेल ना.

मामी दिसायला जशी नीट-नेटकी, सुंदर आहे, तसंच तिचं वागणंही अगदी व्यवस्थित. लग्नकार्य असेल, आहेराचं असेल, मामी कल्पकतेने आहेरात, नाविन्य आणत असे. तिची ती समज हा माझ्यासाठी नेहमीच कौतुकाचा, उत्सुकतेचा भाग राहिलेला आहे.

आम्हा मुलांच्यात प्रिय असलेली ही मामी घरातल्या नात्यातल्या वृद्धांमध्येही प्रिय अशीच होती. मामी नाशिकला आली की, तिला आवर्जून भेटायला बायका येत. कधी तीच एखाद्या आजी-आजोबांना बोलावून घेत असे. तिला हे सर्व कसं साधत असेल? म्हणून आजही मला आश्चर्य वाटतं. की ती मुळात गोडच होती, पण त्यावेळी आम्ही भाचेकंपनी, तिची मुलं यांच्यासाठी ती जणू मधाचं पोळं होती.

मामीचं माहेर तिवंध्यात, पण मामी एकटी कधी माहेरी गेली असं होत नसे. आम्ही तिला वेड्यासारखं प्रेमाने म्हणत असू, 'तू गेल्यावर आम्हाला करमत नाही. तू जाऊ नकोस.' आणि जर ती माहेरी गेलीच तर आम्हा मुलांची सगळी उत्साही फौज तिच्यासोबत असेच. आज या

गोष्टीचं वाईट वाटतं. मामीला तिच्यापेक्षा तीन-चार लहान बहिणी होत्या. लग्न झालेल्या, न् झालेल्या. त्या कुटुंबातल्या त्यांनाही ती एकटी यावी, असे वाटत असेल. सुख-दु:खाच्या गोष्टी बोलायच्या असतील, तिलाही निवांतपण, माहेरपण हवे असेल, पण नाही. आमची गुंड टीम असे कधी घडू द्यायचो नाही. आम्ही तिचा पल्लू धरून तिच्यापाठोपाठ जायचोच. मामीची आईही तिच्यासारखीच प्रेमळ होती. तिथेही आमचं छान स्वागत व्हायचं. तिच्या आईकडून तिला असं प्रेमळपणे वागण्याची गोष्ट मिळाली असावी. असंच तिचं माहेर होतं.

मी मामीची लाडकी, त्यामुळे लहानपणी अगदी अधिकारवाणीने मी त्यांना ठणकावून सांगत असे, 'ती आमचीच आहे. तुमची नाही. तिला परत घेऊन जाण्यासाठीच मी तिच्याबरोबर आलेय.' यावर माझा कुठलाही राग वगैरे न करता मामीची आई माझे लाडच करीत असे.

मी झाले त्यावेळी पहिले दोन-तीन महिने याच मामीने मला सांभाळलं होतं, म्हणून की काय, माझी लहानपणापासून तिच्याकडे एक आंतरिक ओढ आहे, असं मला वाटतं.

मग ह्याच ओढीनं मामी सुटीत कुठे आहे, असं आमचं विचारणं होई. मामाही कंटाळा करायचा नाही. नाशिकला असेल तर तसं, नाही तर रावळगावला जाणं हे ठरलेलंच. आजच्यासारखे तेव्हा फोन, मोबाईल नव्हते, म्हणून मामांची अन् आमची पत्रापत्री व्हायची. आम्ही नुसते वाट पाहून असायचो, सुटी लागली रे लागली की आम्ही आजोळ गाठायचो. इकडे शाळा सुरू झाली तरी फिकीर नसायची. सावकाश निघणं व्हायचं. एरव्ही अन्यत्र मी आई-वडिलांच्या आठवणीत घरी निघून जायला पाही. परत मामीच्या घरातून सहसा सहज पाय निघतच नसे. परंतु जायच्या दिवशीही माझ्या जीवावर येई, इतकं ती सर्वांना प्रेम देई; त्यामुळे मामीसोबत राहणं, याला केवढा अर्थ होता आमच्या बालपणी.

या मामांची मुलं आम्हा दोघी बहिणींच्या बरोबरीची होती. मुलगी मात्र दहा-अकरा वर्षांनी लहान होती. आम्ही सगळे मिळून खूप मस्ती करायचो. खूप खेळायचो. भांडायचोही. मग मामा कधी सौम्यपणे चिडत, रागावत. मग आम्हीही त्यांना विचारत असू, 'आम्ही तुमच्याकडे नाही,



मामीकडे आलोय. ती कधी रागवते का?' आमच्या या दटावणीचं मामीला भारी कौतुक वाटे. ती हसे. खरं तर सर्वांनाच समजून, त्यांना प्रेमाने सांभाळणे हे तिच्या अंगातच होतं.

मे महिन्यात मामा चांगले पाटीभर आंबे, जांभळं, करवंदं आणत. मामी गुळांबा, साखरांबा, मोरावळा, कैरीचे ताजे लोणचे करून ठेवत असे. मग आमची चंगळच. खूप खेळायचं, भरपेट जेवायचं. त्यावेळी आम्ही सारेजण खूप खातही असायचो. बरणी रिकामी झाली की मामीने न चिडता म्हणावं, 'बरं झालं, परत करेन. तुम्ही खाल्लं ना सगळ्यांनी की मला आनंद वाटतो.' मामा आपला हक्काने व कौतुकाने म्हणे, 'ही सगळी मुलं अगदी राक्षस आहेत.' त्यावेळी आम्ही खूप हसायचो. आम्हाला मग बकासुराची गोष्ट आठवत असे.

मामीने आमच्यासाठी नेहमीच नवनवीन पदार्थ करून घालावे. कधी रवाळ कणीक दळून त्याची छान लापशी करावी, कधी सांभार, वेगवेगळे लोणचे असं काय काय ती करतच असे. तिच्या हातालाच खरंतर चव आहे, असं आजही मला वाटतं.

मुळातच गोरापान रंग, किंचित अपरं नाक, स्वच्छ राहणीमान, कपाळावर ठसठशीत टिकली, छान रंगसंगतीच्या साड्यात तिला मी पाहत आलेय. केव्हाही पाहा, एखादे प्रसन्न फूल फुलल्यासारखे भाव तिच्या चेहऱ्यावर असतात. ती हसते आहे, हेच भाव माझ्या मनात खोलवर आहेत. तिला चिडताना, भांडताना, संतापताना मी पाहिलं नाही म्हणून तर जास्तच.

बरं, हे केवळ माझ्या एकटीसाठी नाही तर घरातल्या प्रत्येक लहान-मोठ्यांसाठी! कुणाला काय आवडतं हे तर ती अचूक लक्षात ठेवते. उदाहरणार्थ बाळूमामांना घरच्या जात्यावर दळून भाजणीचं थालीपीठ, मेतकूट, तर माझ्या वडिलांसाठी आणि मावशीच्या यजमानांसाठी (काकांसाठी) हातशेवया ती आठवणीने पाठवत असे. तिच्या अगत्यशील स्वभावामुळे तिने सर्वांनाच जिंकून घेतलेलं होतं आणि आहे. तिने कधी रागवावं, कुणाचा दु:स्वास करावा, आदळ-आपट करावी, असा एकही क्षण नाही म्हटल्यावर इतकी प्रेमळ मामी तीही आपली! म्हटल्यावर आम्ही

फक्त लाडूबाई न होऊ तर काय?

हे सर्व असून तिने आम्हा सर्वांना बाहेर फिरायला न्यावं, गंगेवर आंघोळीसाठीही तिनेच न्यावे, कुणाला काय हवंय, असं विचारून घरातूनच एखादा पदार्थ बनवून बागेत वगैरे न्यावं, शिवाय नुसतं काकूबाईसारखंही नाही. तिने आम्हाला पाणीपुरी खाऊ घालावी, आईस्क्रीम खायला द्यावं. त्यात जसे आम्ही असू तसे आमचे इतर मामालोकही यायचेच.

एवढं व्यवस्थित, एवढं प्रेमळ, लाघवीपण तिच्यात कुठून बरं आलं असेल. कुणाचं लग्न ठरलं की, रुखवताच्या वस्तू बनवण्यातही तिचा हातखंडा नि पुढाकार असे.

आमचे लग्न-साखरपुडा तर मामांच्याच घरी असे. व्यवस्थितपणे, छान सगळं जमवण्यात, करण्यात ती कुठेच चुकत नसे. बरं, माणसं कमी-जास्त होऊ द्यात. तिचं पदार्थ करण्याचं प्रमाण कधी चुकत नाही. आमच्या लग्नाचे केळवण, डोहाळजेवण, मांडव परतणीचं जेवण असं मामीनं आमचं खूप केलंय, याची मला प्रेमळ जाणीव आहे. कौतुकही आहे.

माझ्याबरोबरच माझ्या मुलींनाही ही आजी खूप आवडते. त्यांचे दहावी-बारावीचे रिझल्ट असतील, नवी गाडी घेणं असेल, त्यांना माझ्या या मामींकडून म्हणजे त्यांच्या आजीकडून त्याचं कौतुक करून घ्यायला आवडतं.

हा लेख लिहिताना मी, आम्ही लहान असताना त्यावेळी मामी ज्या वयात होती त्या वयात आज आहे. मामी तर थकलीये, पण तिच्या चेहऱ्यावरचे- मुख्य म्हणजे डोळ्यातले ते प्रेमळ, स्निग्ध भाव तर तस्सेच आहेत, हे जाणवत राहतं. मामा-मामी माझ्या घराच्या जवळपासच राहतात. फार जाणं-येणं होत नाही, पण ती जवळ आहे, याचं केवढं समाधान वाटतं मनाला, अन् आधारही.

मामी-मामा फिरताना दिसतात. मामांना डोळ्यांचा त्रास, म्हणून ती त्यांना हात धरून फिरायला घेऊन जाते. वाटतं, असं उपयोगी पडायला पाहिजे आपण सतत प्रेमानं कुणाच्या तरी. तिच्यासारखं प्रसन्न, शांतपणे हसता यायला हवं आपल्याला. तिचे हात तर केवळ देणारेच हात. त्यांना



मनोभावे नमस्कार करण्याबरोबरच आपल्यालाही असे हात होता आले पाहिजे, यासाठी मी सतत धडपडत असते. कुठे शिकली असेल मामी इतकं गोड वागायला, बोलायला आणि प्रत्येकाचं आनंदानं करायला? असा विचार मनात येतो, तेव्हा खूप अपराध्यासारखं वाटतं. आपण मामीकडून काठोकाठ प्रेम, सुख ओरपलं, पण आपण स्वत:?

नाही, नाही! मामीशी आपली तुलना करणं केवळ केवळ अशक्य. मामीसारखी फक्त मामीच! तिला पाहिलं, तिला आठवताना एकच गोष्ट मनात असते की, तिने आमचं बालपण समृद्ध केलं. सुखी-आनंदी केलं. म्हणूनच मी माझ्या मनाशी एकच एक प्रश्न विचारत राहते, ‘तुला कोणासारखं व्हायचंय?’ त्याचं फक्त एकच उत्तर आतआतून येतं, ‘मला रावळगावची मंगलमामी व्हायचंय!’ होय, मी त्याच प्रयत्नात असते.

✤✤✤

# ... ते दिवस

आजकालच्या पोरांची धावपळ नि दगदग पाहिली की वाटतं, ही मुलं निवांत अशी नाहीतच. उठसूट टीव्ही, कॉम्प्युटर, म्युझिक प्लेअर, मोबाईल, गाडी, क्लास, सिनेमा, कुठले कुठले कोर्सेस, परीक्षा नि ॲडमिशन्स, मित्र-मैत्रिणी यात! त्यांचं घरात बसणं असं होतच नाही. मग बोलायला कुठून वेळ मिळणार? मग त्यांच्याशी संवाद असा दूरच. त्यांच्या करिअरीस्टतेमुळे मुलांच्यात भावनिक असा रुक्षपणा जाणवतो. त्यात आपणच इतके दूरचे होऊन जातो की पाहुणे-रावळे, नातेवाईक यांच्यात बसून गप्पांना आपुलकीने चौकशी वगैरे बाबी दूरच राहतात.

नवी पिढी पैसा, सुख मिळवण्याच्या नादात स्वत:चं जगणं मात्र विसरूनच जातात. मग ही मुलं उगीच अकाली प्रौढ झाल्यासारखी वागतात. पैसा असला की, सुख ओरबाडता येतं, असं त्यांना वाटतं; पण तो आनंद क्षणिकच असतो. चिरंतन सुख देणाऱ्या गोष्टींसाठी यांना वेळ नसतो, हे खरं कारण.

मात्र ज्यांची लग्नं ऐंशी-नव्वदच्या दशकांदरम्यान झाली असतील, अशा आमच्या पिढीने त्यापूर्वी आपलं बालपण, आजोळ, काका-आत्या, चुलतनिलत भावंडे, शेजार-पाजार, चाळ, वाडे, सणवार हे सारं सारं बऱ्यापैकी अनुभवलं. तो आनंद, त्या आठवणी आजही मन ताजं टवटवीत करतात; त्याची ही हकीकत.

शाळेत असताना कुठल्याही छोट्या-मोठ्या सुट्ट्या असोत, आमची आई आम्हा बहिणींना घेऊन आजोळी येणारच. ते चार-आठ किंवा



महिना-पंधरा दिवस, वर्षभर मनाला आनंद पुरवत. त्या दिवसात एक छोटंसं कौटुंबिक संमेलनच वर्षातून एकदा भरायचं. शिवाय सणवार, लग्न-मौंजी, सुख-दु:ख, त्या गप्पा, ती चेष्टामस्करी, चर्चा, वादसंवाद घडत. ते ऐकत ऐकत आम्ही मोठे होत गेलो, घडत गेलो.

आज तर मनोरंजनाची कितीतरी आधुनिक साधनं आलीहेत. मोबाईलची एक कॉर्ड तुम्हाला स्वत:ला इतरांपासून वेगळं ठेवू शकते. गाडीच्या काचा बंद केल्या की, तुमचा मातीशी संपर्क तुटतो. घर, दुकान सारं काही नको इतकं चकचकीत झालंय. माहिती नि विज्ञान-तंत्रज्ञानामुळे जग जवळ जवळ येतंय आणि माणसं मात्र एकेमकांपासून दूर दूर चालल्लीहेत, असं चित्र आहे.

याद्दष्टीने माझं आजोळ मला छान आठवणीत आहे. आमच्या घरी आईच्या माहेरी असे वर्षातून एक-दोनदा तरी नक्कीच कौटुंबिक संमेलनासाठी सर्वजण जमत असू. पाच मामा-माम्या, त्यांची मुलं, मावशी, तिच्या मुली, आम्ही चौघी बहिणी आईसोबत, असे सगळे एकत्र जमून खूप मजा करायचो.

सर्व बायका मिळून स्वयंपाक करणं, फिरायला जाणं, खेळ, आईस्क्रीम पार्टी, गप्पा-टप्पा यात दिवस कसे उडून जात, काहीच समजत नसे. घरी जायची वेळ आली की, अक्षरश: जीवावर यायचे. घरी आल्यावर करमायचे नाही, चुकल्या चुकल्यासारखे वाटायचे, काही दिवस!

घरी परतल्यावर आमचा आणि आईचा एकच उद्योग, तिथल्या गप्पा-गोष्टी आठवून आठवून त्या वडिलांना सांगणे. एकत्र जमलो की, आम्हा मुलांची भांडणं, रुसवे-फुगवे हे व्हायचेच, पण घरी आलो की, पुन्हा सगळ्यांची ओढ लागायची.

त्यावेळी पाहुण्या मुलांना कुणी काही महागडे कपडे, खेळणी वगैरे घ्यावी, अशी फारशी पद्धतच नव्हती. मुलेही आजच्यासारखी खर्चिक नव्हती. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांचा, मुलांचा कुणाला भार वाटायचा नाही. आमचे सगळे मामालोक आई व मावशीला त्यांच्या सासरच्यावरून हमखास चिडवायचे. त्या टिंगलटवाळीत या दोघीही सहभागी व्हायच्या. आम्ही मात्र लहान, म्हणून या दोघींचा राग यायचा. आईने मावशीने त्यांना

रागवावे, असं वाटे, पण ती गंमत आम्हाला कुठली आली समजायला? आता त्याचं हसू येतं. आईला उगीच रागवायचो, आम्ही तेव्हा.

ते सोनेरी, लाडीगोडीचे, अलवार स्वप्नांचे मऊदाट सायीचे दिवस कसे पाखरासारखे उडून गेले. आम्ही एकदम मोठे केव्हा झालो, तेही समजलं नाही, पण वय वाढलं आणि आम्ही मोठे (?) झालो. मग एकेका बहिणीची लग्नं व्हायला लागली. मामांचा वाडा मोठा म्हणून साखरपुडा, लग्नाची तयारी, सारी इथूनच चाले. माम्या परगावी असल्या तरी अशा कार्यासाठी त्या आवर्जून येतच. मनापासून राबत. 'आपलंच कार्य' हा भाव त्यांच्याठायी असे. त्यांचा तो उत्साह, ती आपुलकी मनाला आनंद देऊन जाई.

प्रत्येक मुलीचं लग्न झालं की, तिची चेष्टामस्करी ही ठरलेली. तिच्या माहेरपणात चेष्टेला अगदी उधाण येई. मामांच्या वाड्यात या गप्पा, तिकडचं कौतुक, उणं-दुणं असं 'सर्वकाही' गुऱ्हाळ आनंदानं चालायचं.

याविषयी आणखी थोडं सांगितलं पाहिजे. असा हा ठेवा आम्ही प्रत्येकीने मनात जपून ठेवलाय. आम्ही सगळ्या मिळून मामे-मावस अशा अकरा बहिणी. त्यापैकी जिचं लग्न झालं असेल ती नवी नवरी सर्व माम्या-मावश्या आणि अगोदर लग्न झालेल्या बहिणींकडून सर्व प्रश्नांना, चेष्टांना सामोरी जात असे. त्यात केवळ चेष्टाच असे, असेही नाही. कधी काळजी, कधी कौतुक, कधी वेळ घालवणं रीती-भाती, घरची माणसं, त्याचे स्वभाव अशाही प्रकारच्या त्या चर्चा ऐकणं हा एक आनंददायी ठेवा असे. परंतु कधीकधी ही चर्चा अशी काही वळण घ्यायची की, बिचारी नवी नवरी लाजेने चूर होऊन सरळ बाहेर पळून जात असे.

प्रत्येकीला आपल्या लग्नानंतर जेव्हा दुसरीचं लग्न होईल, तेव्हा या बैठकीचं सभासदत्त्व आपसूक मिळत असे. वर सांगितल्याप्रमाणे चेष्टेचा भाग सोडला तर त्यातून कितीतरी मौलिक असं ज्ञान मिळत असे. तेव्हा ऐकताना जरी त्या ऐकलेल्या गोष्टी सहजशा वाटल्या असल्या तरी सासरी नांदताना आणि भावी आयुष्यात त्या गोष्टींचा प्रत्येकीलाच खूप मोठा उपयोग झालेला आहे. वेगळे वातावरण, नवीन माणसं, वेगवेगळ्या चालीरीती, स्वयंपाकाच्या पद्धती अशांमध्ये ॲडजेस्ट होताना ती मैफल



आठवे. तिचा उपयोग होई.

आजही ते सर्व दिवस, त्या गप्पा, त्या मैफली आठवल्या की, मन भूतकाळात जातं, आनंदतं. क्षणभर आपण 'तरुण' झाल्याची सुखद जाणीव होते. इतकं प्रेमाने, कौतुकाने, आदराने आता कोण बोलतं? समजावतं. आताच्या नवऱ्या मुली आणि नवी पिढी जशी आयतीच 'शहाणी' असल्यासारख्या झाल्याहेत. त्यामुळे आता ते अनुभवविश्व जणू लुप्तच पावलंय.

लग्नात आता सर्वकाही आयतंच मिळतं. मुलीही ओव्हरएज होतात. मनानेही निबरतात. त्यामुळे लग्नंही कॉन्ट्रॅक्ट सिस्टीममुळे लग्नं वाटतच नाहीत. लग्नाची तयारी, रुखवत, देणं-घेणं, रुसवे-फुगवे आणि त्या मैफिली आता कुठे राहिल्याहेत?

आता कुणालाच कशाला वेळ नाही, पण तेव्हा लग्न हा विषय खूप आनंददायी, खूप दिवस आठवावा, असा तो सोहळा. म्हणून माम्या मावश्या, आई, बहिणींसोबत आम्ही विशेषत: लग्नकार्यात आणि त्यानंतरच्या त्यांच्या माहेरपणाविषयी खूपच एकत्र मैफिली केल्याहेत. हसलो नाराजलोय. वगैरे म्हणून लग्नासंबंधी इथं सविस्तरपणाने लिहिल्या.

परंतु दर सुटीत, प्रत्येक आजोळच्या भेटीत आम्ही त्या गप्पा अनुभवल्या. त्यात समरसून सहभागी झालो. जो आनंद मिळाला, तो केवळ शब्दातीत आहे. 'ते' दिवस अक्षरश: सोनेरीच होते. आनंददायीच होते. त्या उतू जाणाऱ्या मैफली आता जवळपास आटल्याहेतच.

लावलेलं अत्तर काही काळाने जसं हातावरून उडून जावं तसे 'ते' दिवस आता संपले आहेत. परंतु त्यांच्या भावगर्भ आठवणी येताना कवी अरुण म्हात्रेंची एक सुंदर कविता आठवतेय,

*'ते दिवस आता कुठे,*
*जेव्हा फुले बोलायची'*

या कवितेत कवी शेवटी म्हणतो,

*'फाटके होते खिसे अन् नोटही नव्हती खरी*
*पण उगवत्या चांदण्यावर मालकी वाटायची.'*

२१व्या शतकाच्या अगोदरची मध्यमवर्गीय माणसं तशी गरिबीतच

वाढली, पण खरोखर त्यावेळी उगवत्या चांदण्यांवर प्रत्येकीला मालकी वाटायची. नेमकं काय झालं, हे सर्व असं विलक्षण सुंदर हवंहवंसं असं अचानक कसं संपलं? याचा शोध काहीकेल्या लागत नाही. वास्तविक आताही मामाचा वाडा आहे, गंगा आहे. आईस्क्रीमच्या गाड्या आहेत, गंगेवरच्या वसंत व्याख्यानमाला आहेत, आताही घरात कुणाचं न कुणाचं लग्न होतंच...

दरम्यान एक मामा गेले, अविदादाही गेला. पण बाकीची ती सर्व माणसं आहेत की! मग तरी आमचा त्या दिवसांचा 'आनंद' कुणी हिरावून घेतला? ते दिवस आता नाहीतच का? या विचारांनी मी जाम अस्वस्थ होते.

परंतु विचार केला की, निसर्ग आपलं काम करतो. मामा-माम्या थकलेत. आई-आबाही थकले. गाव विस्तारलं. कुटुंबं तर सगळ्यांचीच विस्तारली. जबाबदाऱ्या वाढल्या. आणि हो, आपल्या लहानपणी मावशी, आई, माम्यांनी दिलेला आनंद, ते प्रेम, ती आपुलकी, आपण अगदी भरभरून घेतली. काठोकाठ उपभोगली. पण हाच ठेवा, हा वारसा इतरांना वाटण्यात आपण स्वत: खरंच कमी पडलो. आपण संकुचित झालो. लिमिटेड माणुसकी आपल्यात आलीच आली! हे मान्य करावं लागेल. हे सर्व मान्य करून एकच एक सारखं आठवत राहतं की, ते दिवस निरातिशय सुंदरच होते. लहानपणी आपल्या मनातल्या गोठ्यात एखादी गाय असते, तिचं कोवळं वासरू असतं. कुणी शहाणं माणूस दूध काढताना सुरुवातीला चरवीत दुधाच्या धारा पडताना 'चुर्रऽऽचुर्रऽऽ' असा आवाज होतो. तो आपण ऐकतो, तो आवाज आपण मनात साठवत जातो.

पुढे गाय जाते, वासरूही नसतं, गोठाही जातो. मग दूध कुठून मिळणार? तशा या गोड, धारोष्ण आठवणी कुठेतरी आटत चालल्यासारख्या वाटल्या, पण फक्त ते दिवस आठवले की स्मृतींचा पान्हा पिळला, आणि काय आश्चर्य! पुन्हा तोच लहानपणी कान टवकारून ऐकलेला स्वर्गीय आवाज चुर्रऽऽ चुर्रऽऽ चुर्रऽऽ!

✤✤✤



# एक होता राजू!

मध्यंतरी टीव्हीवर सर्फ एक्सल पावडरची जाहिरात दिसायची. दोघं शाळकरी बहीण-भाऊ मस्त शाळेचा गणवेश घालून निघालेत. दिवस पावसाचे वगैरे. पैकी बहीण एका छोट्या खड्ड्यात पडून तिचा गणवेश चिखलाने खराब होतो. चिमुकला भाऊ त्या खड्ड्यावर, चिखलावर चिडून, बहिणीची कड घेऊन त्या चिखलाला बेदम मारतो. त्यात त्याचे कपडे भरतात. राग शांत होतो. ते पुढे जातात. भाऊ मागे वळून त्या खड्ड्याला सांगतो, 'वापस नही करना!' जाहिरात छोटीशी, गमतीशीर. त्यातला इनोसंटपणा मनाला भावतो. कुणालाही हसू यावं, कौतुक वाटावं, अशी ती जाहिरात!

हीच जाहिरात बघून, माझ्या मुली म्हणायच्या, 'आई, तू आणि मामा बघ!' मला कौतुक वाटे. हसूही येई. प्राथमिक शिक्षणाचं वय तसं अगदी निरागसतेचं, उत्साहाचं आणि मुलींसाठी काहीसं भीतीचं वय असतं. आईचा उबदार पदर सुटला की, बाहेर खाच-खळगे, खड्डे, ऊन, चिडणं, रागावणं सारंकाही अनुभवायला मिळतं, पण त्यात आपण घडत असतो.

शाळा, वर्ग, शिक्षक, वर्गमित्र-मैत्रिणी अशात दिवस कसे भुर्रकन उडून जातात. मात्र त्या कोवळ्या लुसलुशीत आठवणी मनात कायमचं घर करतात.

माझ्या वडिलांच्या नोकरीत बदलीमुळे माझं शिक्षण वेगवेगळ्या गावी झालं, पण इयत्ता पहिली ते तिसरी वैतरणा डॅमवरच्या प्राथमिक शाळेत शिक्षण झालं. कॉलनीपासून आमची शाळा थोडी दूरच्या अंतरावरच होती.

आम्ही पायीपायीच शाळेत जात असू.

माझ्या दोन्ही मोठ्या भावांची शाळा दुपारी व माझी शाळा मात्र सकाळीच असायची. सुरुवातीला दोन-तीन महिने मला शाळेत जाणं म्हणजे जुलूमच वाटायचा. वडील लवकर साईटवर निघून जायचे. मोठे काका शेजारीच रहायचे. त्यांना दहा वाजता ऑफिस असायचं. मी शाळेत जायचं म्हटल्यावर अक्षरश: भोकाड पसरायची. मग काकांनी येऊन मला समजावून सांगून शाळेत सोडायचं.

काका कसेतरी करून मला शाळेत घेऊन जायचे. मी काकांना म्हणे, 'मी वर्गात बसेन, पण तुम्ही शाळेच्या ओट्यावरच बसायचं, मला वर्गातून तुम्ही दिसले पाहिजेत. सुरुवातीचे सात-आठ दिवस काकांनी खरोखर तसेच केले. मी त्यांच्याच बरोबर शाळेत व घरी जाऊ लागले. सारखी-सारखी मी वर्गाबाहेरच बघायचे. काका जागेवरून हलले की मी मोठ्याने हाक मारून 'जाऊ नकाऽऽ' म्हणायचे. काकांना अगदी पोटात तुटायचे. ते बिचारे निमूट बसायचे.

त्यानंतर मात्र काका मला सोडून हळूच निघून जाऊ लागले. मी रडले, गोंधळ घातला, पण शाळा काही चुकली नाही किंवा मनाने मी हे स्वीकारले की, काका माझ्यासाठी शाळेत बसून राहू शकणार नाहीत. त्यांना जावंच लागणार आहे.

एके दिवशी संध्याकाळी वडलांचे मित्र आमच्या घरी त्यांच्या मुलाला घेऊन आले. त्यांच्या दोघांच्या इकडच्या तिकडच्या गप्पा चाललेल्या. ते दोघेही त्यांच्या बालपणापासूनचे वर्गमित्र होते.

थोड्या वेळाने त्यांच्याबरोबरचा मुलगा त्यांना म्हणाला, 'ही मुलगी रडकी आहे. काकांना खूप त्रास देते. त्यांना शाळा सुटेपर्यंत ओट्यावरच बसवते. आम्ही हिला खूप हसतो, पण बाई आम्हाला रागवतात.' तो असं म्हणाला, पण तेव्हा मला त्याचा राग आला.

पण वडील व त्यांचे मित्र म्हणाले, 'तुम्ही दोघे एकाच वर्गात आहात ना? मग तू का नाही जात तिच्याबरोबर?' अशारीतीने मला शाळेत जायला राजूची सोबत झाली.

माझ्याच वयाचा, पण राजू खूप समंजस होता. तो कधीच माझ्याशी



भांडल्याचं आठवत नाही. फक्त आठवतंय ते एवढंच की, 'आपण बरोबर जाऊ. तू मात्र रडायचं नाही. आपण येतानाही बरोबर येऊ.' एकप्रकारे त्याने माझी ने-आणण्याची जबाबदारीच स्वीकारली होती. वडील व काकांनाही त्यामुळे बरं वाटलं असेल.

हळूहळू मलाही शाळेची गोडी लागली. पावसाळ्यात वैतरण्याला खूप पाऊस असतो. घरून निघताना आई मला रेनकोट घालून द्यायची. टोपीचे बटन मला लावता यायचे नाही. इतर मुलं रेनकोट चढवणं, त्याची बटनं लावणं ही कामं स्वत: करत असत, पण माझं काहीतरी अडेच. मग राजू असायचाच तेथे. 'थांब, मी देतो लावून बटन.' म्हणून माझी रेनकोटची टोपी व्यवस्थित घालून द्यायचा. इतर मुलं त्याला हसायची. 'का रे, तू नोकर आहेस का तिचा?' राजू काहीच न बोलता मला घरापर्यंत आणून सोडायचा. मुलांशी यावरून भांडणं वगैरे करायचा नाही. उलट एखाद्या शहाण्या मुलासारखा म्हणायचा, 'नाही, माझ्या वडिलांनी सांगितलंय मला तिला व्यवस्थित पोहचवायला.'

पहिली ते तिसरी सुरुवातीचे काही दिवस वगळता आम्ही नियमित बरोबर आलो-गेलो. त्यानंतर माझ्या वडिलांची बदली झाली नि मी दुसऱ्या गावाच्या शाळेत गेले. तेथे शाळेत जाण्यासाठी बस होती. नवीन मैत्रिणीही खूप मिळाल्या. घरीही छोटी बहीण झाल्यामुळे मी काहीशी मोठी, समंजस ताई तेव्हापासून झाले.

राजू तसा आमच्या नात्यातच होता. म्हणजे आहे. पण हकीकत तशी जुनी झाली म्हणून 'होता' असा उल्लेख! तर राजूच्या मावशीचे माझ्या आईच्या नात्यात लग्न झाले. त्यावेळी आम्ही दोघे तिसरीतून थेट आठवी-नववीत आलेलो होतो. इतक्या वर्षांनंतर गाठभेट होत होती. त्याकाळची परिस्थिती म्हणजे ऐंशीच्या अगोदरच्या या वयातली मुलं-मुली आपसात बोलायला बऱ्यापैकी संकोचायची. तसा संकोच मनात ठेवून आम्ही बोलणं टाळलेलं.

पण आईने किंवा काकूने आमची पुन्हा ओळख करून दिली. तोंडदेखलं हसलो. खूप काही विचारावं-बोलावं वाटत होतं, पण काहीच बोलणं झालं नाही. जुजबी काहीतरी बोलून निरोप घेतला, ते आजतागायत.

त्या गोष्टीला आता बरीच वर्षे झालीत. त्यावेळी वाटलं, आता आपण शाळेत रडणार नाही आहोत. आपलं रेनकोटचं बटन लावून द्यायला मला कुणाची मदत लागत नाहीये. मला आता शाळा आवडतीय. हे आपण हसत हसत राजूला सांगायला हवे होतेच, पण नाही धीर झाला- नव्हे मी संकोचलेच होते त्यावेळी.

पण आताही कुणी बहीण-भावंडं त्यांच्या प्राथमिक शाळेत जाताना दिसतात. कुणी चिमुरडी पावसाळ्यात रेनकोट घालून जाताना दिसते. तिच्यात मी मला पाहते. राजूची आठवणही येतेच येते. त्याने माझी बालपणीची शाळा सुसह्य केलीय. मला धीर दिला, साथ केली. माझ्या आठवणीत एक वर्गबंधू म्हणून राजूची आठवण मला सर्फ एक्सलच्या अशा एखाद्या गोष्टीतून दिसते, तेव्हा मी एक छोटी 'मनी' झालेली असते. दूर कुठेतरी गाणं ऐकू येत असतं, 'अशी पाखरे येती... आणिक स्मृती ठेवूनी जाती...'

✤✤✤



# वाचन संस्कार करणारे बोराटे सर

माझं माध्यमिक शिक्षण दिंडोरी या तालुक्याच्या गावी झालं. माझ्या शाळेचं नाव 'जनता इंग्लिश स्कूल, दिंडोरी.' पंचवीस-तीस वर्षांपूर्वी आम्ही तेथे होतो, तेव्हाचं दिंडोरी एक विकसीत असं खेडेवजा गाव होतं. त्यात आमची ही शाळा म्हणजे आमच्यासाठी एक विलक्षण मोठी अशी इमारत होती. किती सुंदर नि प्रशस्त होता शाळेचा सर्व परिसर. थोडासा अभ्यासाचा ताण सोडला तर शाळेत जाणं म्हणजे एक आनंदाची अशी पर्वणी.

आमच्या शाळेचे मुख्याध्यापक एन.के. पवार सर हे आमचे मोठे शिस्तप्रिय असे मुख्याध्यापक होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर जातीने लक्ष द्यायचे. आम्ही थोडीफार मुले नोकरी करणाऱ्यांच्या घरातून आलेलो; बाकी बहुसंख्य मुलं आजूबाजूच्या खेड्यातून यायची. मूळ दिंडोरीतील मुलंही होतीच.

मुख्याध्यापक पवारसरांचे प्रत्येकाकडे बारीक लक्ष असायचे. बहुतेक सगळ्याच मुलांना ते नावानिशी ओळखायचे. मुलांची चौकशी करून त्यांना अभ्यासाकडे वळविणे हा त्यांचा नित्यक्रम. सर दुरून दिसले तरी मुलांच्यात सामसूम होऊन जाई. ती आदरयुक्त भीती मनात आहे. आज इतक्या वर्षांनी सर नाशिकला भेटतात. माझी मुलगी द्विपदवीधर होतेय, पण मला सरांच्या समोर जाण्याचं धैर्य होत नाही. मग मनोमनच त्यांना नमस्कार करून मी सरांपुढे जाण्याचं टाळते.

या सुंदर अशा शाळेची शिस्त, तिथलं मनमोकळं वातावरण यात माझे

मित्र-मैत्रिणी जसे छान आठवणीत आहेत. तसे आम्हाला मराठी शिकवणारे हरिभाऊ बोराटे सर हे माझेच नव्हे तर आम्हा सर्वच मुलांचे अत्यंत आवडते शिक्षक होते. मराठी विषय शिकवण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. मराठीचा तास असला की, आम्ही सर्व मुलं खुश होऊन जायचो. कारण काढला धडा नि शिकवले! असं व्हायचं नाही. ते त्यांचं सारंकाही ऐकणं म्हणजे एक सुंदरसा अनुभवच असायचा.

बोराटे सर मराठी शिकवायचे, पण त्यांच्या बोलण्यातून येणारं सामान्यज्ञान पुढे जीवनातही खूप उपयोगी ठरलं. प्रत्यक्ष धडा सुरू करण्यापूर्वी सर संबंधित लेखक, कवी यांच्याविषयी त्यांच्या साहित्याबद्दल अशी काही माहिती द्यायचे की विद्यार्थी अक्षरश: भरून पावायचे. त्यातलं सारंकाही समजे, असंही नाही, पण ऐकताना जाम मजा यायची. सर भरभरून बोलायचे. आमची उत्सुकता ताणायची. आम्ही अंदाज घ्यायचो. अमूक एक धडा, कविता शिकवणार, अंदाज खूपदा चुकतही, पण ती उत्सुकता मोठी गमतीची होती. सरांच्या मराठीच्या ज्ञानाचं अप्रूप वाटे. आपणही असं ज्ञान मिळवावं वगैरे मनात येई, पण सर ज्या खुबीने ते सारं सांगत की, नाही रे बाबा आपल्याला जमणार. इतकं सरांनी स्वत:ला छान घोटवून घेतलं होतं.

सर एखाद्या सुंदर गोष्टीसारखा तो धडा आमच्यासमोर उलगडवत की, आम्ही सारे त्या धड्यातील गावातलेच एक होऊन जायचो.सरानी ते उभं केलेलं चित्र आमच्या मन:पटलावर इतके पक्के कोरले जायचे की, सारा अभ्यासच पक्का होऊन जायचा. त्यामुळे आज इतक्या वर्षांनीही सरांनी शिकविलेल्या त्या धड्यांची, कवितांची, साहित्यिकांची नावे छान लक्षात आहेत. या त्यांच्या चौफेर वाचनातून नकळत आम्ही घडत गेलो. आम्हाला वाचनाची सवय लागली. नव्हे, सरांनी आम्हाला वाचनाची दिशा दिली, तसे संस्कार दिले.

उदाहरणच द्यायचे झाले तर सर एकदा गोनिदांचा धडा शिकवत होते. तो धडा शिकवताना सरांनी आम्हाला अगोदरच समजावून दिले. गोनीदांचं दिसणं, असणं, स्वभाव-वैशिष्टचे तर सांगितलेलंच. शिवाय त्यांचं साहित्यही आवर्जून वाचण्याचं कळकळीनं आवाहनही केलं. मला पक्कं



आठवतंय, सर त्यांच्याविषयी म्हणाले होते, ते छोटी छोटी वाक्यं लिहितात. त्यांच्या लेखनाच्या या शैलीबरोबर आपल्यासमोर एखादे गाव, त्यातील व्यक्ती अगदी हुबेहूब म्हणजे चित्रमय शैलीत उभे करतात.'

आता मराठी साहित्याचा उच्च अभ्यास करताना किंवा साहित्याची एखाद-दुसरी समीक्षा वाचताना, सर त्यावेळी नेमकं काय म्हणाले होते, याची प्रचिती येते. एवढे सारं सांगून झालं की, म्हणायचे, 'मग वाचणार ना गोनीदांचं साहित्य?' आचार्य अत्र्यांची विडंबन कविता शिकवताना सर विडंबन काव्याचे वैशिष्टच, अत्रेशैली, अचूक मर्मभेद याविषयी तर बोलायचेच, पण स्वत: अत्रे एक फर्डा वक्ता म्हणून कसे आहेत! त्यांच्या बोलण्याचा किंवा समोरच्यावर तुटून पडायचा झंझावात कसा अफलातून असायचा वगैरे सांगताना हळूच आम्हाला म्हणायचे, 'आणि तुम्ही बघा, तुमच्यातल्या किती जणांना साधे उत्तर द्यायला भीती वाटते!...'

मग आम्ही विचारात पडलो की म्हणायचे, 'अरे अत्रेही लहानपणी घाबरायचे.' मग अत्र्यांनी त्यांच्या लहानपणी वर्गात सिंहाची व उंदराची गोष्ट कशी सांगितली, हे साभिनय सांगितले. मग मुलांनी विचारलं, 'पण सर, तुम्हाला हे सर्व कसं माहितेय?' सरांकडे उत्तर तयार होतं. 'अरे, मी अत्रे बोलतोय'चा एकपात्री प्रयोग बघितलाय मी.' मग काय नाटक, एकपात्री प्रयोग, प्रायोगिक नाटक आणि प्रासंगिक अशा विषयांवर सरांची माहिती म्हणजे आमच्यासाठी साक्षात मेजवानीच. आम्ही ती गुंग होऊन ऐकत असू.

ऐंशीच्या दशकातील ही हकीकत. एखाद-दुसरा मुलगा सोडला तर बाकी बहुतेक मुलांची आर्थिक परिस्थिती जेमतेम किंवा खाऊन-पिऊन सुखी अशी होती. पण सरांनी आपल्या व्यासंगी रसिकतेतून आम्हा मुलांमध्ये साहित्याची उत्तम रसिकता निर्माण केली. इंदिरा संत, बालकवी, बा.सी. मर्ढेकर यांच्या उत्तम उत्तम कविता आम्हाला शिकवून काव्यविश्वातही आम्हाला प्रवीण केले. मर्ढेकरांची, सरांनी शिकवलेली 'गणपत वाणी' कविता तर अजूनही कालपरवा शिकवल्यासारखीच आठवते. या सगळ्यांमुळे आम्ही मराठीचे चाहते झालो.

पुढे मी भरपूर मराठी साहित्य वाचले. करमणूक म्हणून आणि अभ्यास

म्हणूनही. या साहित्य वाचनाने मी अधिक ज्ञानी झाले. आनंदी झाले. विचारांची बैठक कुठेतरी पक्की झाली. मुख्य म्हणजे त्या वाचनानंदाने माझ्या आयुष्यालाच एक अर्थपूर्णता आली. मी आतल्या आत उमलत-बहरत राहिले. पुढे माझं वाचन चोखंदळ नि नेमकेपणाकडे वळलं. त्यामुळेच एका वाचनालयाचा 'सर्वोत्कृष्ट वाचक' पुरस्कार मला प्रवीण दवणेंच्या हस्ते प्राप्त झाला. माझं कौतुक झालं. आकाशवाणीवर एक रसिक वाचक म्हणून माझी मुलाखत झाली. मला वाटतं, हा पुरस्कार किंवा माझ्या अखंड वाचनानंदाचे सर्व श्रेय मी अत्यंत विनयानं माझ्या या शाळेला आणि आमच्या मराठीचे असलेले शिक्षक श्री. बोराटे सरांनाच देईन. सरांच्या या संस्कारातून आम्ही काही त्यांचे विद्यार्थी 'उत्कृष्ट वाचक' तर झालोच, पण त्याहीपेक्षा एक संवेदनशील माणूस म्हणूनही आम्ही घडलो.

सरांच्या मृदू व्यक्तिमत्त्वामुळे आमच्यातही तसे गुण आले असावेत. सरांचे संस्कार तर कधीच न विसरण्यासारखे आहेत. कारण छोट्या छोट्या गोष्टी आहेत, पण त्यातच त्यांचं असामान्यत्व दडलेलं होतं. सर कधी कुणाला रागावले नाहीत. कुणाला कुठल्याच कारणावरून टाकून बोलले नाहीत. मला स्वत:ला गणितात, विज्ञानात जमतेम गुण पडत. पण इतर शिक्षकांसारखे ते न रागवता समजावून सांगत, 'मुलांनो, अभ्यास करा. शिक्षक तुमच्या भल्यासाठीच रागवतात.' त्यांचं बोलणं म्हणजे प्रत्येक मुलासाठी मनापासून एक प्रकारचं प्रोत्साहनच असे.

सर शाळेबाहेरही एक चांगला माणूस होते. त्यांची पुतणी आमच्या वर्गातच होती. ती त्यांचा चांगुलपणा आम्हाला सांगे. सरांनी आपल्यावरील कौटुंबिक जबाबदाऱ्याही छान पार पाडल्या.

बोराटे सर आता महाविद्यालयात अध्यापनाचं काम करतात. माझी सटाण्याची पुतणी त्यांच्याकडे शिकलीय. अर्थातच तिनेही सरांचे वाचन संस्काराविषयी भरभरून कौतुक केले. म्हणजे पहा, एकाच घरातील दोन पिढ्यांना त्यांनी ज्ञानवंत केले. त्यांच्याच मराठीची एक उत्तम रसिकता निर्माण केली.

आमच्या संस्कारक्षम वयात सरांनी आम्हाला चोखंदळपणे वाचक म्हणून घडण्याची प्रेरणा व प्रोत्साहन दिले. आमच्या शाळेचं ग्रंथालयही



आमच्यासाठी सर खुले करून देत असत. त्यावेळी त्यांच्या आग्रहाचं, प्रयत्नांचं फारसं अप्रूप वाटत नसे, पण आज निश्चितच वाटते. आजकाल किती मराठीचे शिक्षक असे मुळापासून वाचनासाठी प्रयत्न करत असतील? सर शिकवायचे इतकीच तळमळ आता कुठे पहायला मिळेल? म्हणून मुले वाचनापासून दूर राहतात. कुठे नि कसे वाचले असेल सरांनी इतके सुंदरपणे? इतकं प्रगल्भ वाचन आताचे शिक्षक करतही असतील, पण इतरांनाही वाचतं करण्याचे सरांचे अमर्याद कष्ट आठवले की, सरांच्या चरणी नतमस्तक व्हावेसे वाटते.

आताही एखादं छान पुस्तक मी वाचते, मला आनंद होतो. सरांची आवर्जून आठवण येते, पण तो आनंद मी केवळ माझ्या एकटीसाठी ठेवत नाही. मी तो बोराटे सरांसारखा सर्वांमध्ये वाटण्याच्या प्रयत्नात असते. कारण सर म्हणायचे की, 'आपल्याजवळील जी उत्कृष्ट सेवा असेल ती देणगी म्हणून दुसऱ्यास देणे हीच खरी सेवा आहे.' मी या पाऊलखुणांवरून चालते आहे.

✤✤✤

# माझा अवीदादा

साठ-सत्तरीच्या दशकात जन्माला आलेल्या आमच्या बहुतेक सर्वच पिढीला आजोळ, मामाचं गाव, गावपण, चाळ किंवा वाडा संस्कृती, सासर-माहेर इत्यादी सुंदर गोष्टी बऱ्यापैकी अनुभवण्यास मिळाल्या. नात्यांची वीण इतकी घट्ट आणि स्वाभाविकतेची की, सगळीच माणसं आपलीच आहेत, असंच वाटे, त्यावेळी.

त्यात आमची भार्गवेची माणसं म्हणजे अहाहा... चांगली उंचनिंच देहयष्टीची. दिसायला अगदी देखणी, रुबाबदार नाहीत, पण त्यांच्या चालण्या-बोलण्यात एक गर्विष्ट डामडौल. मनाने हळवी, पण बोलण्यात चांगलीच रफटफ वाटणारी. बायका नाहीत, पण पुरुष मंडळी म्हणजे पाहताक्षणी त्यांचा धाक-दरारा वाटेच कुणालाही. एकूण काय तर तऱ्हेवाईकपणा, नको इतकी शिस्तीचं, नीती-नियमांचा एक जरब म्हणावा असा आजही त्यांच्याठायी आहेच आहे.

मला नेहमी वाटतं की, हे काय उगीच इतका शिष्टपणा. माणसानं कसं छान अघळपघळ, लाघवी, प्रेमळ, साधं, सोपं सर्वांना जिंकणारं असं रहावं, वागावं. पण नाहीच, आमची माणसं सदैव घुश्श्यात असल्यासारखीच किंवा आपण कुणीतरी 'थोर' माणसं आहोत, असं त्यांचं त्यांनाच वाटत आलंय. हा त्यांचा मनस्वी रुबाब कुठे हटल्याचं किंवा कमीबिमी झाल्याचं निदान माझ्यातरी पाहण्यात नाही.

खरं तर भार्गवेंची, आमची माणसं मुळात प्रेमळ, साधीच, पण का कुणास ठाऊक, एक खोट्या प्रतिष्ठेचा अहंम त्यांच्या मनात मला जाणवतच



आलाय. मग ते माझे वडील आबा असोत, पमाकाका असोत किंवा माझी चुलत भावंडं अवीदादा, रवीदादा असोत. आर्थिक परिस्थिती बेतास बात, पण वागणं मात्र एखाद्या घरंदाज इनामदारांसारखं. आम्ही बायका-मुलं या दादा-काका मंडळींना कायमच टरकून असायचो. आजही यात फरक म्हणून असा पडलेला नाहीये.

माझ्या वरील मताला छेद देणारं एक व्यक्तिमत्त्व माझ्या जीवनात मला वेगळं नि महत्त्वाचं वाटत राहीलं ते अवीदादाचं. रक्ताच्या नात्याने असेल, त्याच्या एकंदरीतच मनस्वीपणामुळे असेल, मला तो नेहमीच माझ्या लहानपणापासूनच प्रिय असा वाटत आला आहे.

उगीच मुलींमध्ये लुडबूड नाही, चिडचिड, आदळआपट नाही. मोठ्या भावाची म्हणून असणारी तथाकथित दादागिरी नाही. मुळात तो अबोलच होता, पण घुम्याही नव्हता. आवश्यक तेवढंच बोलायचा. एक छोटी बहीण म्हणून माझी बाजू घेणं, मला समजून घेणं हे त्याने चोखपणे स्वीकारलेलं होतं. रवीदादा मात्र मोठेपणाचा हक्क छान निभावून नेई. आजही आम्हा सर्व बहिणींना त्याची आदरयुक्त भीती वाटते.

अवीदादा थोडा तापट स्वभावाचा. लहानपणीही छान रुबाबदार दिसायचा. हसणं तर एखाद्या बादशहासारखं खानदानी. लहानपणी तो खेळायला बाहेर निघाला की, माझं लोढणं त्याच्यापाठी असायचंच. तो खेळकर होताच, त्याला मित्रही भरपूर. त्यावेळी मी त्याच्यामागे लागून त्याच्या खेळण्यात व्यत्यय आणी. मी त्याचं शेपूट धरून गेले की तो चिडे. त्याला मी असं मुलांच्यात खेळायला येणं आवडत नसायचं, पण त्याची आई, म्हणजे माझी काकू आणि माझी आई त्याला समजावे, तेव्हा कुठे तो काहीसा नाखुशीनेच मला खेळायला घेऊन जायला तयार व्हायचा.

एकदा घराबाहेर आला की, तो पुन्हा कठोर वगैरे व्हायचा. माझं बखोटं पकडून मला झाडाच्या जवळच्या फांदीवर बोचक्यासारखं ठेवून स्वत: मनसोक्त खेळायचा. मला तरी कुठे त्यांच्यात खेळायचं असायचं? फक्त खेळण्याची गंमत पाहणे मला आवडे. अवीदादाबरोबर मी असे कितीतरी वेळा मागे लागून खेळायला किंवा ते खेळ पहायला त्यांच्यासोबत गेल्याचं मला स्वच्छ आठवतं.

आम्ही लहान असतानाची एक आठवण आहे. त्याच्याकडून दिवाळीचे फटाके उडवताना माझ्या मनगटाला भाजले. अजूनही ती जखमेची खूण माझ्या हातावर आहे. या खुणेसंबंधी सहज म्हणून जरी काही बोलणं झालं तर तो लहान मुलासारखा चिडून म्हणे, 'मनीषा, सांग हं सगळ्यांना...' माझी ही चूक माझ्याच नंतर लक्षात आली. अन् मग पुन्हा मी कधीच कुणाकडे अवीदादाची तक्रार केली नाही.

पण अशा एखाद्या बालिश आठवणीत माझा अवीदादा नंतरच्या आयुष्यात मला दिसला तो एक प्रेमळ अन् हक्काचा एक प्रिय भाऊ म्हणूनच! काकू नेहमी चांगले पदार्थ बनवत असे. त्यावेळी तो आईला आवर्जून म्हणायचा, 'आई, मनीषाला विसरलीस का?आधी तिला खाऊ दे.' आज अवीदादाचे प्रेमळ बोल आठवले की काळीज भरून येतं आणि बंधुप्रेमाने डोळे झरू लागतात.

नंतरच्या मोठेपणाच्या (!) आयुष्यात मी नेहमीच थोरली झाले. अगोदर सर्वांचं, मग माझं. चांगलं-चुंगलं खाण्याचं म्हणून वयही बालपणातच संपतं, पण मी लहान म्हणून 'तिला अगोदर द्या!' म्हणणारा अवीदादा हमखासच आठवतो. तो होताच मुळात तेवढा प्रेमळ, पण त्याचं असं हे लाघवी मन आणखी काही लोकांना का नाही जाणवलं? याचं आजही मला आश्चर्य वाटतं.

हो, त्याला असा खोटा, पाघळ लावायला नाही कधीच आवडलं. तो म्हणायचा नेहमीच, 'हो, मी वागेन नम्रपणाने, सर्वांचा मानही ठेवीन, पण समोरच्यानेही मला समजून घेतलं पाहिजे.' मला खूपदा वाटे, अवीदादाचा हा काय मानीपणा? घेतला कमीपणा, घेतली जरा कुठे माघार तर काय बिघडणारहे त्यात एवढं? पण... माझं हे वाटणं केवळ माझ्यापुरतंच राहिलं. तो मात्र नेहमीच त्याच्या त्याच्या डौलात राहिला.

माझं लग्न झालं तेव्हा राखीपौर्णिमेला अवीदादा, रवीदादा दोघे राखी बांधण्यासाठी माझ्या घरी आले. मी औक्षण केले. राखी बांधली, दादाला वाटलं, हिने राखी तर बांधली आपल्याला, पण सासरच्यांसमोर ही आपल्याला नमस्कार करते की नाही? म्हणून त्याने मला तसं खुणावलं. मी चटकन नमस्कार केला, पण माझे मन त्यावेळी जरा दुखावलेच. हे



काय? कशाकरता मला अवीदादाने असे सुचवले? मी नमस्कार तर करणारच होते त्याला...मी आपली मनोमन खट्टू झाले.

रक्षाबंधन आटोपलं. मी त्यावेळी दादाला सोडण्यासाठी म्हणून कोपऱ्यापर्यंत गेले. तेव्हा मी नाराजीनेच त्याला नमस्काराचं विचारलं. तर तो मोठ्या समजुतीने म्हणाला, 'रागावलीस का? अगं, मी मोठा भाऊ आहेय तुझा. तुझ्या घरच्यांना वाटायला नको की, भावाशी छोट्या बहिणीने उद्धटपणा केला म्हणून!' त्यावेळी कुठे माझं समाधान झालं. मग मी नि दोघे दादा हसलो. माझा राग कुठल्या कुठे पळून गेला.

दर दिवाळीला, भाऊबिजेला, राखपौर्णिमेला तो आठवणीने माझ्या घरी यायचाच. एरवी माझ्या घरी त्याचं येणं व्हायचंच नाही. त्याला काही न्यूनगंड तर नव्हता, पण त्याच्या मनात एक अहम मात्र नक्कीच होता. त्याला काही माणसांशी नाही जुळवून घेता आलं. त्यात आमचं घरही होतंच. विचार केला की, काही सूर का नाही जुळत? मग मीही हट्ट सोडून दिलेला. तो अलिप्त-आम्हीही अलिप्त. आला वाहवा, नाही आला राहिलं. पण तरी मात्र रक्ताचे नाते कुठे तुटले होते? नाशिक गावात (शहरात) आमचं जाणं झालं की एवढ्या मेनरोडच्या गर्दीतही तो मला अगदी दिसेच. दामोदर थिएटरच्या जवळच्या रसवंतीत, हॉटेलमध्ये, तिवंध्यात, मेनरोडला तो मित्रांमध्ये, कधी एकटाच उभा असलेला मला दिसे. माझ्या मुलींना म्हणजे त्याच्या भाच्यांना पाहून त्याची कळी खुले. रस किंवा एखादा खाऊ घेण्याविषयी भाच्यांना व मला आग्रह होई. माझ्या मैत्रिणी सोबत असतील तर त्यांनाही म्हणे, 'चला, तुमचा भाऊ तुम्हाला आग्रह करतोय.' त्याचं बोलावणं प्रेमळ आणि मनातून असायचं.

अवीदादाचं असं आग्रही बोलणं असलं तरी मनोमन मला त्याचा नेहमीच धाकही वाटे. मित्र सोबत असले की बोलायचं नाही. मान खालीच हवी, असे काही त्याचे नियम होतेच. कधी मुलींचे वडील सोबत असले की, आपण यांच्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून तसेच पुढे निघालो तर 'काय गं, तुला रस्त्याने तुझा दादा दिसत नाही का?' रस्त्यात त्याला काय नि कसं समजावणार? ह्यांचा मान मोठा, तर तो मानी. अन् मी सगळ्याच बाबतीत नेहमीच लहान. मनाची उलघाल होई. त्याची चिडही

येई. कधी कधी कीवही येई. हसून वेळ मारून डोळे डबडबणं तेवढं माझ्या हाती असे. मला नेहमी असंच वाटतं, माणसं एवढी अहंकारी का वागत असतील? मग तो अवीदादाही असेल म्हणून त्याच्या अशा या वागण्याचं मी समर्थनही कधीच केलं नाही.

भाऊबीज, रक्षाबंधन या दोन सणांना आमच्याकडे यायचं तो कधीही चुकवायचा नाही. येई, शांतपणे औक्षण करून मला भाऊबीजही देई. मनमोकळं बोलणं, हसणं, संवाद असा काहीच तेव्हा घडायचा नाही. एक अपार कर्तव्यातून त्याचं एवढं येणं झालं की, वर्षभर मग त्याचा आमच्या दारावर जणू बहिष्कारच असायचा. मनोमन माझं मन त्याच्यावर कातवे. हा कसला आलाय मान? अन् घेतली थोडी पडीची बाजू, पण नाही! अवीदादा त्याचा अभिमान जपतच राहिला. मला वेड्या बहिणीला कुठलं आलंय समजायला त्याचं किंवा माझ्या घरच्यांचं मन? मी या गोष्टीने सतत दुखावतच राहिले.

एका वर्षी अवीदादाची कंपनी त्यांच्याकडील अंतर्गत संपामुळे बंद होती. त्यातच माझ्या मोठ्या जाऊबाईंना बरे नव्हते, म्हणून मलाही राखीपौर्णिमेला परगावी जावे लागले. घाईगर्दीत दादाला फोन वगैरे करायचं मी विसरूनच गेले आणि गेले निघून जाऊबाईंकडे. संध्याकाळी दादा-वहिनी घरी आले. माझ्या मुलीने त्यांना सांगितले, 'मामा, आई गावाला गेलीय. ९-९॥ वाजेपर्यंत येईल परत. तू परत ये हं.'

मुली लहान नि घरी एकट्याच होत्या. म्हणून काळजीने मी नऊ-साडेनऊपर्यंत घरी परत आले. माझ्यापाठोपाठ दहा-पंधरा मिनिटांत दादा-वहिनी परत माझ्या घरी आले. त्यांना पाहून मला खूपच आनंद झाला. त्याला मी अचानक परगावी जावे लागण्याचं व फोन न करण्याचं कारण सांगितलं. 'ठीक आहे... ठीक आहे...' म्हणून त्याला ते पटलंही. मलाही बरं वाटलं. नंतर मी मन:पूर्वक त्याला औक्षण केलं. राखी बांधली. त्याने औक्षणाच्या ताटात अकरा रुपये ठेवले. चहा वगैरे झाला. जुजबी बोलणं झालं. एरवी तो थांबतच नाही म्हणून तो 'येतो' म्हणाला. मग मीही त्याला आग्रह न करता त्यांना सोडवायला म्हणून घराच्या गेटपर्यंत गेले. दारासमोर दादाची बाईक दिसत नव्हती. मी काळजीने त्याला विचारलं, 'दादा, गाडी



रेऽऽ? गाडी कुठेय?' लागलीच माझ्या डोक्यावर शपथेसारखा हात ठेवत समजुतीच्या स्वरात तो म्हणाला, 'गाडी विकली बाई. मी अन् तुझी वहिनी पायीपायीच आलो.. चल येतो.'

दादा-वहिनी तर गेले, पण माझं मन त्यावेळी आतल्या आत आक्रंदू लागलं. जिवाचा नुस्ता नुस्ता तडफडाट झाला. 'देवा, दादा-वहिनी पायी आले. मी घरी नाही म्हणून परत ते दोघे एवढ्या लांबपर्यंत चालत आले. त्याचं आणि आमच्या घरात चांगलं चार-पाच किलोमीटर तरी अंतर असेल. मनोमन मी दादा-वहिनीची माफी मागितली.

घरात आले. औक्षणाच्या ताटातले त्याने ठेवलेले अकरा रुपये मला कितीतरी अमूल्य वाटले. त्याचं मोल थोडंच होणार होतं? एकदा वाटलं, असंच धावत जावं दादाच्या पाठोपाठ. वहिनीच्या हातात गुपचूप हे पैसे द्यावेत, पण ते कधीच शक्य नव्हतं. मला अवीदादाचा स्वाभिमानी स्वभाव माहीत होता. चहासुद्धा घेताना त्याच्या अगदी मिनतवाऱ्या मला कराव्या लागायच्या. तो माझ्याकडून काय प्रवासाचे पैसे घेणार? मला त्याचा तो अहंकार दुखावणं काही प्रशस्त वाटेना. मोठी भयंकर वेळ होती ती. वाईट वाईट वाटलं त्यावेळी मला. मन भूतकाळात गेलं. माझ्या याच दोन मुलींच्या बाळंतपणात दादा दवाखान्यात येऊन मला म्हणे, 'काय चिऊताई? काय झालं?' त्याचं हे लाडिक, प्रेमळ बोलणं मला आवडे. लहान असल्याचं सुख वाटे. त्यावेळी त्याचं मामापण खूपसं कौतुकाचंही असे. आता मेनरोडला रस्त्यात कधी दादाचे मित्र दिसले, दादाच्या लग्नाचे मंगलकार्यालय दिसले, त्याची उभी राहण्याची तिवंधा, रसवंतीसारखी ठिकाणं दिसली की मन गलबलून येतं. कारण माझ्या लग्नात मी सासरी जायला निघाले, दादाला नमस्कार केला. माझी बॅग अवीदादाच्या हातात. छानसा ड्रेस त्याने इन केलेला. माझा अवीदादा त्यावेळी एकदम छोटासा झाला. अन् हुंदके देऊन रडायलाच लागला. दादाने माझी बॅग रिक्षेत ठेवली, 'सांभाळा तिला.' असे रडत मेहुण्यांना म्हणाला. वळून कार्यालयाकडे जातानाचा माझा अवीदादा माझ्या मनात तसा-तस्साच अजूनही आहे.

त्यानंतर आमच्या घरात मावस, चुलत, मामेबहिणींची कुणाकुणाची

लग्नं झाली, पण माझ्या लग्नात अवीदादाचं, भावनाविवश होणं पुन्हा कधीच झालं नाही. अवीदादा त्यानंतर खरंच मोठा झाला होता.

या प्रसंगाने मी इतकी हळवी, भावविभोर झाले की मला आजही कुणी सासरी जाताना पाहवत नाही. मला त्या मुलीच्या माहेरच्या माणसांत माझा अवीदादाच दिसत असतो. माझ्या अवीदादाची फार इच्छा होती, माझ्या दोन्ही मुलींच्या लग्नात त्याला मामा म्हणून उभे रहायचे होते. अन् मीही ठरवले होते की, खूप सोसलं साले-मेहुण्यांचं शीतयुद्ध. मुलींच्या लग्नात त्याला भारीतला फेटा बांधून मला कौतुकाने पहायचे होते. मुलींचा मामा लग्नात कसा उठून दिसतो ते! पण...अवीदादा अचानकच गेला. माझं हे चिमुकलं स्वप्न पूर्ण न करताच गेला.

त्याच्या जाण्यानंतरही माझ्याइतकं फारसं कुणी हळहळलं नाही, पण मी मात्र मनोमन विलक्षण दु:खी झाले. अलिप्त होता, थोडा अहंकारीही होता, पण एक छोटी बहीण म्हणून त्याने जपलेलं आणि निभावलेलं 'दादा'पण मला खूपच आश्वासक वाटायचं. बिचाऱ्या वहिनीचं तर दु:ख पहाडाएवढं! अशी मनाची समजूत घालून मी माझ्या मनाला सावरले.

जगालेखी अवीदादासारखी माणसं केवळ एक व्यक्ती असतात, ती विशेष नसतात, हे खरंच. दिवाळी-भाऊबीज येते, राखीपौर्णिमा येते तेव्हा एक चिऊताईच्या मनाची बहीण अविदादासारख्या भावाच्या विरहात चिवचिवत असते, त्याचं काय? काळ कुणासाठी थांबलाय? माझ्याही मुली लग्नाच्या झाल्याहेत. उद्या त्यांचीही लग्नं होतील, तेव्हा मला समजावणारा आणि समजून घेणारा माझा अवीदादा त्या गर्दीत नसेल! ही भावना काळीज कुरडत राहते. असो.

अवीदादा गेला, भाच्यांच्या लग्नात भारीतला फेटा न बांधताच गेला. सर्वजण आपापल्या व्यापात गुंग आहेत. स्मरणरंजनात तरी कुणाला गुंतून घ्यायचं? पण दिवाळी येत राहील, फटाकेही फुटतील. मीही अवीदादाला चिडवणार नाही, पण नजरचुकीने त्याने उडवलेल्या फटाक्याचा चटका माझ्या हातावर आहेच आहे, त्यात मला माझा अवीदादा दिसत राहील...

✤✤✤



# मी वडनेरेसाहेब बोलतोय

सतत टीव्हीचं माध्यम आणि त्यामधून दाखविल्या जाणाऱ्या शेकडो जाहिरातींचा पाऊस, 'पप्पा, ॲडजेलचा पेन हवा, मम्मी, मॅगी.' अशा मुलांकडून विविध मागण्या. वर्तमानपत्रात जाहिरात, शहरामध्ये ठिकठिकाणी जाहिरात. एवढेच काय, पण सार्वजनिक गणपतीच्या पुढेदेखील आपल्या उत्पादनाची जाहिरात करतो तेव्हा इतका भरगच्च असा जाहिरातींचा पाऊस बघितल्यावर विशेष वाटते. आधुनिक युगात जाहिरात ही पासष्टावी कला समजली जातेय. कुठलाही चौक, गल्ली किंवा मोकळी जागा म्हणून ठेवलेली नाही की, ज्यावर जाहिरातींनी अतिक्रमण केलेलं नाही. रेडिओ, टीव्हीवर तर जाहिराती अक्षरश: अंगावर कोसळत असतात. कार्यक्रम कमी अन् जाहिराती जास्त. साधं कुठे कधी एखाद्या सांस्कृतिक कार्यक्रमाला जावं तरी तिथे कुणीतरी धनदांडगा माणूस प्रायोजक असतो. त्याला स्वत:ची जाहिरात करायची असते. एकूण काय, तर जाहिराती पिच्छा सोडत नाहीत. लहानगी मुलंही टीव्हीवर, पेपरात-मासिकात जे पाहणार तेच आठवणीने मागणार. मग आईबाबाही त्याचा हट्ट पुरविणार. एकावर एक फ्री आपल्यालाही हवंच असतं. यात फसवणूकही खूपदा होते. पण जाहिरातींच्या नादी लागून नको त्या वस्तू आपण अंगावर मारून घेतो. त्यात शरीराचं काही नुकसानही होतं. पैसे तर जातातच व्यर्थ! आयडॉल म्हणावे असे खेळाडू, कलावंत, सेलिब्रिटीही जाहिराती करण्यात आघाडीवर असतात. तेव्हा जाहिरातींचं प्रचंड मायाजाल पाहिलं, त्यात जाहिरात करणाऱ्यांना मिळणाऱ्या पैशाचे आकडे पाहिले, वाचले की आपले डोळे

फिरावेत असे ते आकडे असतात. ऋत्विक, कॅटरिनासारखे बडे स्टार मिनिटाला एक करोड रुपये घेतात, असं टीव्हीवर पाहिलं तेव्हा आवर्जून एक व्यक्ती मला आठवत राहते. ती म्हणजे आमच्या नाशिकचे वडनेरेसाहेब.

त्यांना 'साहेब' म्हणायचे ते एवढ्यासाठीच की, खिसे फाटके असूनही हा भला माणूस 'साहेबी' पोशाखात रहायचा. डोक्यावर साहेबी हॅट, अंगात शर्ट-पँट, पायात चामडी बूट, खांद्याला शबनम पिशवी त्यात जाहिरातींची हँडबिलं, हातात जाहिरातींसाठी धरलेला भोंगा. अशा वेषातले गोलमटोल असलेले स्नेहार्द नजरेचे, बोलके असलेले वडनेरे आजोबा मेनरोडवर काही दुकानांसाठी, एखाद्या प्रॉडक्टसाठी जाहिरात करताना नाशिककरांनी कितीतरी वर्षे जवळून अनुभवलेले आहेत.

७०-८०च्या दशकात हे चालतं-बोलतं जाहिरातीचं केंद्र माझ्या कुतूहलाचा, आनंदाचा असा भाग होता. नाशिक शहरातील कितीतरी लोक त्यांना भोंग्यावरून तोंडाने जाहिरात करत फिरताना हमखास पहायचे.

आईच्या मामांच्या घरी, सोमवार पेठेत गायधनी वाड्यात राहणारे वडनेरेसाहेब हे नाशिकच्या गतवैभावाचं एक मानाचं नव्हे, पण अविभाज्य असं नाव होतं. आईबरोबर आम्ही मामांच्या वाड्यात जात असू तेव्हा वाड्याच्या पायऱ्या चढून गेल्यावर आतल्या बाजूस उजव्या हाताला खालीच एक खोली होती. तिथेच वडनेरे आजी-आजोबा राहत असत.

इतका महत्त्वाचा (!) माणूस आपल्या ओळखीच्या वाड्यात राहतो, याचं मला अप्रूप वाटे. मी त्यांना अगदी कौतुकाने न्याहाळत असे. की कसं करत असतील, हे आजोबा इतके अचूक जाहिरातीचं काम? तेव्हा वाटायचं की, वडनेरेसाहेब म्हणजे कुणी मोठाच माणूस आहे. आम्ही कधी या वाड्यात सकाळी गेलो तर हे आजोबा बाहेरच्या ओट्यावर चौरंगावर वही ठेवून काहीतरी हिशेब लिहीत बसलेले असायचे. त्यावेळी ते आईची, वडिलांची आवर्जून चौकशी करीत. कधी आईला म्हणत, 'जावईबापूंना नमस्कार सांग हं कृष्णाबाई आमचा.' त्यांचा आवाज ऐकून वडनेरे आजीही बाहेर येत. त्याही आईची चौकशी करत. ती फक्त खुणेने.

जगाशी अखंड बोलणाऱ्या वडनेरेसाहेबांना घरात मात्र मुकी पत्नी मिळालेली होती. याचं खूपच आश्चर्य वाटे. केवळ जाहिरातींच्या तुटपुंज्या



रकमेवर प्रपंच चालविण्यासाठी त्यांना कोण बोलकी बायको देईल? असं आज वाटतं, पण तेव्हा कुठे काही कळत होतं आम्हाला? ते दोघेजण आईशी बोलेपर्यंत त्या आजी आमच्या हातावर काहीतरी खाऊ देत असत. मग आई, मामांना भेटायला आत गेली की, आख्खा वाडा आम्हाला खेळण्यासाठी मिळे. त्यात वडनेरे आजोबा, त्यांचा तो जाहिरातींचा भोंगा पाहणं त्या भोंग्याची मधून मधून निगुतीने धुवून-पुसून केलेली स्वच्छता पाहणं, हा माझ्या कुतुहलाचा भाग होता. चांगला पोषाख, हातात भोंगा, खांद्याला बॅग अशा वेशात ते एखाद्या वीरासारखे वाड्यातून निघायचे. तेव्हा मोठं कौतुक वाटायचं मला त्यांचं. आम्ही मेनरोडवर वगैरे वडिलांबरोबर फिरताना लांबूनच त्यांना वडील दिसले की, ते मोठ्या भोंग्यातून आवाज देत, 'काय जावईबापू, नमस्कार.'

वडिलांचा प्रतिनमस्कार झाला की, मग 'आमच्या भाचीला त्रास नको म्हणून तुम्ही राजेशचा प्रेशर कुकर घ्यायचा बरं का?' वडील हसून 'हो... हो...' म्हणायचे. मला मोठी गंमत वाटायची. त्या आजोबांची, त्यांच्या भोंग्यातून बोलण्याची. मग आमच्या जवळ आले की, म्हणत, 'साठे बिस्किटं, रावळगाव चॉकलेट्स खायचे, पण शाळेचा ड्रेस मात्र अमक्याच दुकानातून घ्यायचा हं.' या हाकेने तर आम्हाला कोण कौतुक वाटे, खूप मजा वाटायची. मेनरोडची गर्दी, त्यांची जाहिरातीची पद्धत इतकी वैशिष्ट्यपूर्ण की, त्यांच्याकडे बघत राहत, आमच्यासारखी मुलं. गर्दीमध्ये आवाज देत जाणारे वडनेरेसाहेब हे दुर्लक्ष करावेत, असं माणूसच नव्हते. एखाद्या प्रेमळ आजोबांसारखे त्यावेळच्या प्रत्येक मुलाला त्यांनी भुरळ पाडली होती. इतकं सुंदर निवेदन, शब्दसंवाद आणि चालणं होतं वडनेरेसाहेबांचं! नवरात्रीमध्ये सकाळ-संध्याकाळ दोन वेळा ते जाहिरातींसाठी कालिका मंदिरापर्यंत चालत जायचे. भगवंतराव मिठाईवाले, बुधाशेठची जिलेबी, राजेश प्रेशर कुकर, महालेंच्या दुधाची इत्यादी कितीतरी जाहिराती ते आपल्या खड्या आवाजात ऐकवत ऐकवत शहरातून फिरत राहत. ओळखीची माणसं भेटली की, नावानिशी आवाज देणे होई. ज्याला हाक मारली, त्यालाही बरं वाटे. लोकही वळून वळून पाहत. मजा यायची क्षणभर. त्यावेळी वडनेरेसाहेब हे सर्वांनाच परिचित असं नाव होतं.

नव्हे-वडनेरेसाहेब सगळ्यांसाठी एक आदरयुक्त कुतूहलाचा विषय होता.

मूळात ते तसे मिश्किल स्वभावाचे होते. लहान मूल रडत असले की, त्यांनी स्वत: घोंगडी पांघरून रडणाऱ्या पोरासाठी भोकाडी बाबा व्हावे, मुलगा वठणीवर आला की, पुन्हा कसल्या तरी हिशेबात बुडून जावे. आजही वाटतं ते त्या वह्यांमध्ये नेमकं काय लिहीत असावेत? हिशेब लिहून ठेवावा, इतकं त्यांच्याकडे काय महत्त्वाचं काम होतं, असंही वाटे त्यावेळी. वाड्यात सुरुवातीलाच त्यांचं घर असल्यामुळे वाड्यात शिरण्याची बाहेरच्या माणसाची हिंमत होत नसे. पण आलेल्या पै-पाहुण्याला चार शब्द त्यांच्याशी बोलल्याशिवाय परवानगीच नव्हती जणू. वडनेरेसाहेब सगळ्यांशी आपुलकीने बोलत, सगळ्यांची चौकशी करत. जवळपास पन्नास एक वर्षे ते या वाड्यात दोघंच राहिले. त्यांना मूलबाळ नव्हतं, पण म्हणून ते दु:खीही कधी दिसले नाहीत. गोड स्वभावामुळे असंख्य माणसं मात्र त्यांनी जोडली होती. त्याअर्थी त्यांचा गोतावळा मोठा होता. अगोदर त्या आजी आणि मग हे वडनेरे आजोबा, दोघेही देवाघरी गेले. आज इतक्या वर्षांनंतर त्या वाड्यात, मेनरोडला जावं तर नुसते भासच होत राहतात की, वडनेरेसाहेब त्याच पोशाखात भोंग्यातून प्रेमळपणे आवाज देतील, 'काय भाच्याबाई, आल्या का?' पण आजोबा आता कधीच येणार नाहीत, हेही मनाला पटलेलं एक वास्तव आहे. वडनेरे आजोबा गेले. त्यांची ती जाहिरातीची वैशिष्ट्यपूर्ण पद्धत गेली. त्यांचा तो भोंगा गेला, पण या वडनेरेसाहेबांच्या कितीतरी जाहिराती मनात रुतून बसलेल्या आहेत. त्या आठवल्या की, माझी होते एक लहानगी पोर आणि याच पार्श्वभूमीवर मी प्रत्येक जाहिरात खूप कौतुकाने, गमतीने, मन लावून पाहत असते की, आमचे ते प्रेमळ, निरागस वडनेरे आजोबा त्यात कुठे दिसताहेत का? हो, मला प्रत्येक जाहिरात पाहताना असं वाटतं की, आपलं हरवलेलं पोरवय या जाहिरातीतून मला पुन्हा पुन्हा भेटत राहतं. म्हणूनच की काय लोकही जाहिराती अशाच एखाद्या सुंदर आठवणीत तर 'पाहत नसतील...'

✤✤✤



# आमच्या आक्का

सत्याऐंशी साली माझं लग्न झालं.एका मोठ्या कुटुंबात मी सासरी आले. सासरी पाच भाऊ, दोन बहिणी, त्यांचे आईवडील- म्हणजे सासू-सासरे. असे एकंदर नऊजण, शिवाय आम्ही तिघी सुना. एवढं मोठं कुटुंब. मोठ्या जाऊबाईंना तीन मुले. माझे वडील आबा, या घराला 'भरलं गोकुळ' म्हणाले होते. खरं तर मनातून मी धास्तावलेच होते. कसं काय निभावणार होतं. मी एवढ्या मोठ्या घरात. साखरपुड्यात आणि एका कुळधर्माच्या निमित्ताने सासूबाई व मोठ्या जाऊबाईंची माझी ओळख झाली होती. हाच काय तो आधार वाटत होता.

माझ्या मोठ्या जाऊबाईंचं माहेर मुंबईचं, पण अगत्यशील, कामसू, सुग्रण. शिवाय दिसायलाही देखण्या. पाहताक्षणी त्यांनी मला आपलंसं केलं. कुलकर्ण्यांच्या घरात मुळात बोलणं तसं कमीच. बेतासबेत, अगदी अलिप्तसं किंवा तोलून मापूनच. त्यामुळे घरात कुणी पै-पाव्हणं, आलं गेलं हे सर्व जाऊबाई व्यवस्थितपणे सांभाळीत. त्या घराच्या अघोषित अशा प्रवक्त्या होत्या. त्यांच्या मध्यस्थीमुळे घर कसं छान, एक सूत्रात बांधलं गेलंय, असंच वाटे मला. सर्वांचा राग-लोभ, देणं-घेणं, उणं-दुणं, आनंद, सर्व कसं छान बॅलन्स करावं ते त्यांनीच.

वडिलकीचं आणि प्रेमाचं असं जाऊबाईंसारखं माणूस घरात मिळाल्यामुळे मी काहीशी निर्धास्त झाले. त्यांच्याशी माझे सूर जुळायला वेळ लागला नाही.

त्यानंतर मग सासूबाई-त्यांना सर्वजण अक्का म्हणतात. त्यांनाही

बोलायला असे कमीच लागते. अगदीच गरजेपुरतं बोलतात. त्यावेळी घरात चहा सारखा उकळत असायचा. इतकी घरातली माणसं, शिवाय बाहेरचंही सारखं कुणी-कुणी चालूच असे, पण आक्का मात्र स्वत: कॉफीच घ्यायच्या. आठवणीने आक्कांसाठी चहाबरोबर कॉफी उकळावी लागे. फार मोठ्यानं ओरडणं नाही, आदळआपट नाही, पण जे म्हणून शांत-नाजूक आवाजात सांगतील ते निमूटपणे सर्वजण ऐकत. आमचा तर प्रश्नच नव्हता, आम्ही मनातून त्यांना दबूनच असायचो.

आक्का दिसायला तशा खूपच साध्या. चारचौघींसारख्या सावळ्या रंगाच्या, शिडशिडीत अंगकाठीच्या, फार उंच नाहीत, कपाळावर मोठी टिकली, लांबसडक केस, त्याचा मानेवर अंबाडा, अंबाड्यावर कुठलं का होईना, फूल हे हवेच. साडी नऊवारीच, पण ती फक्त पॉलिएस्टरचीच. नाजूक डिझाईन्सची. त्यावर मॅचिंग ब्लाऊज. त्यात आजही खंड पडलेला नाही. राहणं टापटिपीचं, ब्राह्मणी पद्धतीचं, स्वच्छ!

पण त्यांना लग्न कार्यात, सणावाराला पहावं. मोठ्या उत्साहात असतात. भरभादर काठापदराचं पातळ नेसावं, बोलणं फार नाही, पण नजर छान निरीक्षण करणारी, बारकाई असे त्यात. कोण काय करतंय, कुठं काय चाललंय, याचं अचूक टिपण मनात जणू सुरू असे.

आक्का सकाळी लवकर उठत. कॉफी आंघोळ वगैरे सगळं आवरलं की दारात विविध तऱ्हेच्या बारीक रेषेच्या रांगोळ्या घालत. देवापुढे काढायच्या भरपूर अशा रांगोळ्यांचा त्यांच्याकडे साठा होता. त्या दररोज देवापुढे व दारात नवनवीन रांगोळ्या काढायच्या. घरी आलेला पेपरही सविस्तर व मन लावून वाचायलाही त्या कधी चुकल्या नाहीत.

दिवसभर मग एखाद्या कथा-कादंबरीचं पुस्तक त्यांच्या हातात असे. भरपूर वाचन त्या आजही करतात. परंतु एवढं सगळं असलं तरी सासूपणा म्हणून त्यांनी कधी आम्हाला दाखवलाच नाही, असंही नाही. प्रसंगी त्या रागावत, चिडत, पण त्यात आब होती. त्यांच्या बोलण्याचा धाक वाटत राही. रागावणं सौम्य आणि मार्मिक असलं तरी आक्कांना गृहित धरणं अगदी कुणालाच शक्य झालं नाही, इतक्या त्या व्यवस्थित राहिल्या, याचं मला आश्चर्य वाटतं.



आमचं लग्न झालं तेव्हा जमलेली माणसं आपापल्या घरी गेली. मला आधार वाटणाऱ्या जाऊबाईही गेल्या. मग लहान जाऊबाई आणि आक्का हे माझे सासरे एवढंच आम्ही घरात राहिलो. मग इतरांच्या चहाबरोबर आक्कांना कॉफी देण्याचं काम माझ्याकडे आलं. ती मी त्यांना देई. सासरे माझी चेष्टा करायचे, 'आक्काला आधी कॉफी, मजा आहे सासूबाईंची.' आक्का मात्र शांत असत. तसं विशेष न दाखवता शांतपणे कॉफी पीत.

साधारण महिन्याभरात मी नाशिकला रहायला आले. मग सणावारी अधूनमधून गावी आक्कांकडे जावे लागे. मला त्यांची वाचनाची आवड लक्षात होती. म्हणून घरी जाताना त्यांना वाचण्यासाठी मासिके, चांगले लेख, पेपरमधील कात्रणे मी त्यांना नेऊ लागले. आक्काही छान मन लावून वाचायच्या. मला बरं वाटे. रणजित देसाईंची 'स्वामी, श्रीमान योगी', शिवाजी सावंतांची 'मृत्युंजय, राजा शिवछत्रपती' ही काही त्यांची आवडती पुस्तके.

आक्कांनी त्यांचं सासूपण छान जपलेलं आहे. वाचणाऱ्या आहेत, शांतपणे वागतात, पण आपला दाब सुना-मुलांवर कायम रहावा असेही अचूक वागतात. म्हणजे आम्हाला हाका मारताना त्यांनी कधीच नावाने हाक मारलेली नाही. नेहमी त्या म्हणणार, 'अगं ए, इकडे ये गं.' 'अमूक कर गं...' असं त्यांनी म्हणावे. अशावेळी त्या नेमक्या कुणाला बोलवताहेत नि कुणाला काम सांगताहेत हे दोन्ही मोठ्या सुनांना अचूक कळे. मी मात्र गोंधळून जाई. सवयीने मीही त्यात परिचित झाले. अशा आक्का. 'लई बोलंना अन् वाट भुलेना'. मला मोठे कौतुक वाटे, त्यांच्या अशा वागण्याचं. कुठून बरं इतकं अचूक समजत असेल त्यांना? उलट आपण किती ऐसपैस नि मोकळे असतो?

कळवण, कनाशीसारख्या खेडेवजा आदिवासी गावातच त्यांचं जीवन गेलं. तेराव्या वर्षी त्या या गावात सून म्हणून आल्या. पण वागणं असं बांधीव, ठाशीव नि नेटकं, पण मी आपली मोकळी ढाकळी, बडबडी, बोलकी, पण माझ्यामागून त्यांच्याकडे माझ्यासाठी कॉमेंट्स असते 'मिठ्ठास!'

मधून मधून वेळ मिळाला की मी त्यांना त्यांच्याबद्दल विचारायचीच.

तेव्हा त्यांनी स्वत:बद्दल सांगितलेलं आठवतंय... 'माझं लग्न वयाच्या तेराव्या वर्षी झाले. सासरे गावचे वतनदार कुलकर्णी होते. माझ्या लग्नात सासऱ्यांनी डोक्यामध्ये सोन्याच्या गुलाबाच्या फुलापासून पायातल्या साखळ्यांपर्यंत भरगच्च अंगभर दागिने घालून बैलगाडीतून मिरवीत आणले. अंगभर दागिन्यांमुळे अगदी वाकायला होई. पुढे कूळकायद्यात जमिनी गेल्या, वतनदारी गेली. स्वत:च्या हिश्श्याची जमीन मुलांचे वडील (सासरे) गडी माणसे लावून करू लागले.

एकूण काय, तर आक्कांनी वैभव पाहिलं आणि साधं जगणंही नंतर अनुभवलं. त्यावेळी मुलं मोठी होताना खूप व्याप सहन करावे लागले. घरातली माणसं, शेतीकामाचे गडी, कामाला येणाऱ्या बायका, पै-पाव्हणे, अशा सर्वांचं जेवण-खाणं आक्काच एकट्या करायच्या. शिवाय त्यांच्या माहेरीही त्या त्यांच्या वडिलांना एकटी मुलगी होत्या. म्हणून वडिलांचंही त्यांनाच करावं लागे. ते त्यांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत केलं. आणखी दीर, नणंदा, पुतणे, भाचे, शेतातलं, घरातलं असं सर्वकाही त्यांनाच पहावं लागे.

या सर्व परिस्थितीतून एक सोशिकपण आलं असावं आक्कांच्यात. त्यांच्या हाताची चवही वेगळी. लक्षात यावी अशी. त्यांच्या हातचं लोणचं ज्यांनी खाल्लं, त्यांना ती चव विसरता विसरत नाही, अशी त्यांची ख्याती.

दरम्यानच्या काळात मुलांच्या महाविद्यालयाचा खर्च वाढला. म्हणून त्यांनी खानावळीचे डबे केले. मेस चालवली. आपल्या सातही मुलांना पदवीधर करण्याचे प्रयत्न केले. कुठे म्हणून त्या कमी पडल्या नाहीत. या परिस्थितीमुळे किंवा त्या मातीचा गुणधर्म म्हणून की काय, त्यांच्यात एक कमालीचा अलिप्तपणा मला जाणवत राहिला. म्हणूनच त्यांच्या मुलांमध्येही हा गुण आलेला दिसतो. त्यांची सर्व मुलं अलिप्त, त्रयस्थ, कुणाशी गरजेपेक्षा जास्त न बोलणारी परंतु कामात मात्र अचूक नि भरपूर मेहनती. या सर्व माय-लेकरांचं मला आणि सर्व जाऊबाईंना विशेष वाटत राहतं.

आम्ही सर्व सुना तुलनेनं बोलक्या, माणूसवेड्या, हौशी. म्हणून मग मुलांची म्हणून तक्रार त्यांच्याकडे कधी केलीच तर त्या शांतपणे ऐकून



घेत. विरोध करायच्या नाहीत, पण पाठिंबाही द्यायच्या नाहीत. त्या केवळ त्यांच्याच मुलांच्या आई होत्या. त्यांच्यात आम्हाला हवी असलेली आई कधी दिसलीच नाही.

परंतु आक्का टिपिकल सासू नाहीत. खडूस, खाष्ट असे अवगुण त्यांच्यात नाहीत. इतक्या खेडेगावात राहून देवधर्माचं फार 'स्तोम' त्यांना नसे. आल्या गेल्या माणसाला त्या विन्मुख पाठवत नसत. आलेला प्रत्येक माणूस बहुधा जेवूनच जात असे. घरात देवधर्माचा, सणावाराचा स्वयंपाक सुरू असेल त्यावेळी एखाद्या लहान मुलाने तो खाण्याचा हट्ट धरला तर त्या समजुतीने सांगत, 'द्या त्या मुलाला. त्यांच्यातच देव पहावा, देव काय, वासाचा भुकेला असतो.' मग पुरण असो, भजी असो, नैवेद्याआधी मुलांच्या हातावर ठेवलं जायचं. एरव्ही आक्कांना स्वत:ला पाच मुलगे असल्याचा फार अभिमान वाटे. मला मात्र दोन्ही मुली झाल्या म्हटल्यावर त्या थोड्याशा नाराजच झाल्या होत्या, पण एकदा आम्ही सर्वजण त्रिपुरी पौर्णिमेला कुलदेवतेला गेलो होतो. तेथे त्रिपूरवाती जाळणार होतो. मुलगा असणाऱ्या आयांनीच फक्त वाती जाळाव्यात, असे मी ऐकलेही होते, पण आक्कांनी घरातून निघताना खूप वाती भिजवून घेतल्या. मला म्हणाल्या, 'तुला मुली तरी आहेत ना? तू फक्त वाती जाळायच्याहेत.' मी त्यांच्या सांगण्यानुसार वाती जाळल्या. मला तेव्हा त्यांचं असं सुचवणं मनाला समाधान देऊन गेलं. आक्कांनी थोडसं वैचारिक वाचन केलं असतं, थोरा-मोठ्यांची व्याख्यानं ऐकली असती तर त्या आहेत त्यापेक्षा आणखी प्रेमळ झाल्या असत्या, असं मला नेहमी वाटतं, पण आक्का सुधारणावादी आहेत, हे मात्र नक्की. पैशाअडक्यांचे, बँकांचे व्यवहार त्या अचूक करतात. राहणीमान साधे, पण नीटनेटके. म्हातारपणी माणसं उगीच ओंगळवाणी दिसतात. जास्तीचं बडबडतात, नको तिथं लुडबूड करतात, लक्ष वेधावं म्हणून हेतूत: कण्हतात, कुंथतात, आपल्या आजारपणाचा नको इतका बाऊ करतात. आक्का मात्र आपलं दुखणं-खुपणं, हवं नको हे फक्त आपल्या मुलांजवळच सांगतात. स्वत:चं स्वत: औषधपाणी घेतात. कुणावर विसंबत नाहीत. स्वत:ची बचत, गुंतवणूक, पैशांच्या, दागिन्यांच्या व्यवहाराचं मुलांशी बोलतात. सुनांसमोर असे विषय वयाच्या पंचाहत्तरीतही

त्यांना नको असतात, याचं राहून राहून आश्चर्य वाटतं.

आता थकल्या म्हणाव्या तरी त्यांचं राहणीमान स्वच्छ, नेटकेपणा जराही बदललेला नाही. छोटासा आंबाडा घालणार, स्वच्छ पातळाचा दोन्ही खांद्यावरून पदर घेणार, सासरे नाहीत म्हणून कपाळावर टिकली काळी आलीय, एवढंच. आपले दुखरे गुडघे सांभाळत समवयस्क बायकांमध्ये दोन-तीन तास गप्पा, भजन यात वेळ घालवतात. मोजकेच बोलतात. त्यांच्या उत्तम प्रकृतीचं रहस्य म्हणजे त्या इवलुसंच खातात. मंदिरात जाणं सहसा चुकत नाही. उरलेला वेळ थोडंसं घरकाम, टीव्हीवर उत्तम उत्तम मराठी मालिका पाहणं, जुने छानसे सिनेमे, त्या सिनेमाला 'खेळ' म्हणतात, ते पाहणं त्यांचं सुरू असतं.

मध्यंतरी आम्ही सर्व मुंबईला लग्नाला गेलो होतो. त्यांनी छान जरीकाठाची नऊवारी साडी नसलेली. त्या छान खुर्चीत बसून लग्नसोहळा कौतुकाने पाहत होत्या. तेव्हा त्यांच्या पुण्याच्या नातजावयाने त्यांना उत्स्फूर्त कॉम्प्लिमेंट दिली, 'आजी, तुम्ही किती सुंदर दिसताय हो...' बस! त्यावेळी त्या जे काही लाजल्या, ते लाजणं पाहून प्रत्येकालाच त्यांचं कौतुक वाटलं. वयाच्या ऐंशीनंतरही आक्का अशा स्वत:बद्दल छान सजग आहेत. प्रत्येक नातवाच्या लग्न-मौंजीत त्या आजीचा म्हणून स्वतंत्र आहेर करतात. असं वेगळेपण त्यांनी आयुष्यभर जपलंय. कुळधर्माचा स्वयंपाक करताना आम्ही सर्व सुना असतानाही त्यांना आपल्या त्या दिवसांची आठवण येते. मग त्या पोळ्या काय करतात, वाढायचं वगैरे सांगतात, पण हे फारच क्वचित. उगीच लहर आली म्हणून विक्षिप्तपणा नाही. जे करतील ते अगदी नेटकं. वयाच्या पंचाऐंशीतही त्यांना असं छान राहणं कसं साधत असेल?

व. पु. काळे एके ठिकाणी म्हणतात, 'आवश्यक तेथे सहभाग, नको असेल तेथे अलिप्तपणा व मागितल्याशिवाय सल्ला देऊ नये!' हे खरं घरातल्या ज्येष्ठ माणसाचं लक्षण. आमच्या आक्का या संज्ञेत अगदी चपखल बसतात.

✤✤✤



# माझ्या मुलींचा बाबा

अगदी लहानपणापासूनच मला वाचनाचा छंद लागला, ती आवड टिकून राहिली. त्यातील काही पुस्तकं, लेख, व्यक्तिचित्रं मनाला भावली. विशेषत: स्मरणरंजनात्मक असे लेख मला जास्त प्रिय. त्यामुळे नकळत आपणही काही लिहून पहावं, असं मला वाटलं. परंतु सुरुवात होत नव्हती. स्वभाव लाजाळू म्हणजे भिडस्त. त्यासाठीचं मार्गदर्शन मला सुरुवातीला मिळालं नाही. नाही म्हणायला दिंडोरी शाळेतील बोराटे सरांनी आम्हाला उत्तम वाचनाचे संस्कार दिलेले होते. त्यातूनच निवडक वाचन करता करता एक दिवस मी लेखनाकडे वळाले, असे म्हणता येईल.

अगोदर 'मी वडनेरेसाहेब बोलतोय हे छोटेखानी व्यक्तिचित्र मी व्यासपीठ या दिवाळी अंकातून लिहिलं. चित्रकार धनंजय गोवर्धने यांनी त्याला एक सुंदर रेखाटन काढलं. त्यावेळी माझा हा छोटेखानी लेख वाचून गोवर्धने असं म्हणाले की, 'तुम्ही छानच लिहिलंय. मग हे आणखी सविस्तर का नाही लिहिलंत?'

खरं तर हा लेख व्यासपीठाला देतानाही मी संकोचले होते की, आपलं लेखन छापतात की नाही? आपलं लेखन छापण्यायोग्य आहे किंवा कसे? पण या लेखासंबंधी मिळालेल्या आणखी काही चांगल्या अभिप्रायांनी माझा उत्साह दुणावला. आपणही लिहून पहावं, या विचाराने मूळ धरलं, ते तेव्हाच. त्यातच माझं भरपूर वाचन, यामुळे मला 'सर्वोत्कृष्ट वाचक' पुरस्कारही त्या दरम्यान मिळाला. आकाशवाणी नाशिकचे तत्कालीन कार्यक्रम अधिकारी श्री. लियाकतअली सय्यद यांनी माझी मुलाखत

घेतली. त्यात 'आपणही काही लेखन वगैरे करता का?' असा प्रश्न त्यांनी विचारला. तेव्हा त्या प्रश्नाचं उत्तर देताना माझा गोंधळ झाला खरा. तो यामुळेच की, तोपर्यंत एकच लेख मी लिहिलेला होता किंवा तो प्रसिद्ध झालेला होता आणि या पद्धतीचे अजून लेख लिहावेत, या विचारात मी होते. म्हणून त्यावेळी 'नाही, पण तसा विचार आहे!' असं काही उत्तर दिल्याचे माझ्या आठवणीत आहे.

मात्र त्यानंतर एलटीसी, एमएससी-आयटी कोर्स, साहित्यभूषण परीक्षा, बी.ए. प्रथम वर्ष असे पूरक शिक्षण करता करता माझ्या लेखन करण्याच्या विचारांनी उचल खाल्ली. मी कशी नि काय लिहिती झाले, झाडाला पानं फुटावं किंवा कळीचं फूल व्हावं इतका हा विषय सहज झाला, असे नाही, पण 'एक स्वच्छ गुलाबी मनसोक्त आंघोळ' हा लेख लिहिला आणि विशेष म्हणजे अगदी सर्वांनीच त्या लेखाचं कौतुक केलं. माझं लेखन मग एकदम झपाटल्यासारखं सुरू झालं. (दरम्यान, हा लेख 'ऊर्जा' दिवाळी अंकाने स्वीकारला. त्यास उत्कृष्ट लेखनाचा पुरस्कारही मिळाला.)

या व अशाच काही चांगल्या प्रतिक्रियांनी मी एकापाठोपाठ एक लेख लिहिण्याचा अगदी धडाकाच लावला. लेख पूर्ण झाला की, माझ्या चार-दोन हक्काच्या श्रोत्यांना मी ते लेख ऐकवीत असे. माझं कौतुक वगैरे होई. काही सूचनाही येत. कुणी लेख-ललित वाचून अस्वस्थ, आनंदी होत तर काहीजण चक्क रडलेसुद्धा. तेव्हा मला समजलं की, आपला लेखन प्रवास योग्य दिशेने सुरू आहे.

नात्यातल्या, ओळखीच्या, घरातल्या कुणाकुणाच्या विषयी मी लिहीत होते. 'हे' उत्सुकतेने डोकावून विचारत, 'काय चाललंय? आता कुणावर लेख?' हक्काच्या श्रोत्यात हेही होतेच. परंतु त्यांच्या आई, म्हणजे अक्कांविषयी मी लिहिलं तेव्हा ते उत्स्फूर्तपणे मला म्हणाले, 'छान. माझ्या आईविषयी तू खूपच छान लिहिलंय. माझी आई असूनही मला ती तितकीशी कळली नव्हती, असंच म्हणावं लागेल; पण तू लिहिलेला प्रत्येक शब्दन् शब्द खरा आहे, पण मग माझ्यावर केव्हा लिहिणार?' असंही त्यांनी विचारलं.



त्यांनी विचारलं, तेव्हा असा काही प्रश्न ते स्वत: करतील असं मला अजिबात वाटलं नव्हतं. कारण तो त्यांचा स्वभावच नाही. म्हणून आश्चर्य वाटलं. कारण आजवरच्या आयुष्यात त्यांनी जीवन जवळून पाहिलं, पैसाही पाहिला, पण प्रसिद्धीची सिद्धी त्यांना कधी गरजेची वाटली नाही किंवा ते या वाटेवरचे प्रवासी कधीच नव्हते. आपण आणि आपला प्रपंच! यात त्यांना अशा गोष्टींची कधी गरजच पडली नाही. पेपरात, मासिकात सहकार्य, उपस्थितीत वगैरे त्यांचं नाव आलं असेल. कधीतरी एवढीच काय ती त्यांची प्रसिद्धीची मिळकत, पण चक्क लेख आणि तोही स्वत:हून! हा विचार मला आश्चर्यकारक वाटला, परंतु हे मात्र खरं की, त्यांचं हे असं सुचवणं म्हणजे एक गंमतच होती, पण मी मात्र त्यांच्यावर लिहायचं ठरवून टाकलं होतं.

पण त्यांच्यावर लेख लिहिताना कुठून सुरुवात करावी? या लेखात कुठले संदर्भ यावेत, कुठले टाळावेत याबद्दल मनात द्वंद्व सुरू झालं. कारण 'एक कॉमन मॅन' अशीच त्यांची इमेज राहिलेली आहे. मुळात ते अबोल आहेत. त्यांना टीव्ही पाहणं, एखादा पेपर वाचणं याशिवाय इतर गोष्टींची फारशी आवड नाही. परंतु आमच्या संसारातही ते फार कुठे कमी पडले असंही झालं नाही, पण पुस्तकं वाचावीत, व्याख्यानं ऐकावीत, काही लिहून वाचून पहावं, पर्यटन, खवय्येगिरी, खेळ, राजकारण, समाजसेवा आदी गोष्टीत त्यांनी समरसून रस घेतल्याचं मी अनुभवलेलं नाही. त्यामुळे त्यांचं व्यक्तिमत्त्व साकारताना त्यांच्यातलं रसिकपण, चांगुलपण कसं अधोरेखित करावं, असा मला विचार पडला.

तसे ते अरसिक आहेत, असंही नाही, पण प्रत्येक कलेचा किंवा जीवनातल्या हरेक गोष्टीचा अनुभव घेताना 'जेवणात जसं मिठाचं स्थान तेवढंच आपल्याला आवडतं.' असं त्यांचं म्हणणं, म्हणूनच त्यांच्या इच्छेत इच्छा मिळवून मी राहिले. त्यावरून मी त्यांना कधी दुखावलं वगैरे नाही.

पती-पत्नी नात्यांमध्ये मोकळेपणाने लिहू शकणाऱ्या लेखिका माधवी देसाई, सुनीता देशपांडे, कमल पाध्ये, मल्लिका अमरशेख, तस्लिमा नसरीन किंवा सुशील पगारियायांच्या इतकी मी काही विदुषी नाही अन् तेवढी

वैचारिक प्रगल्भताही माझ्यात नाही.

आणि एक लेखन-वाचन किंवा साहित्यादी कलांची आवड सोडली तर ते माझ्यापेक्षा प्रत्येक बाबतीत उजवेच ठरले आहेत. व्यवहारी आणि यशस्वीदेखील आहेत. मी मुलींची एक आई असूनही त्यांचे आवडते वडील म्हणून त्यांनीच बाजी मारली आणि एक उत्तम, प्रेमळ पिता म्हणूनही मुलींचे ते लाडके 'बाबा' झाले. त्यांचं हे यशस्वी असं 'बाबा'पण अधोरेखित करावं इतकं उत्तम वागणं आणि कर्तव्यता त्यांच्या ठायी आहे, हे मी नम्रपणे कबूल करते.

कदाचित 'आई' मुलींना काही शिकवताना घडवताना नकळत कठोर होते, तिच्या हातात सत्ता किंवा पैसाही नसतो. घरातली छोटी-मोठी कामं सांगताना, शिकवत, सवरताना आईच कायम पुढे असते. म्हणून पुढे मुलं मोठी झाली की, आईपासून दुरावत असावीत किंवा ती मुलांच्या दृष्टीने मागासलेली तरी वाटत राहते. कधी ती टीकेची, तिरस्काराची धनी होऊ शकते. यादृष्टीने मुलींमध्ये हे सेफ नि वरचढ ठरले असावेत.

मुळातच ते वाईटच कोठे आहेत? आणि आपल्या मुलींसाठी तर अजिबातच नाही. दोन्ही मुली म्हणजे त्यांचा जीव की प्राण. त्यामुळे त्यांना दुखावणं, असं त्यांच्याकडून होणंही शक्यच नाहीय.

खरं तर कनाशीसारख्या दुर्गम, आदिवासी गावात ते जन्मले. तिथेच त्यांचं शिक्षण वगैरे झालं. सरकारी नोकरीही त्यांना मिळाली. नाशिकसारख्या मोठ्या शहरात नोकरी करायला मिळते, याचा त्यांना कोण अभिमान! त्यामुळे नोकरी त्यांच्यासाठी नेहमीच विशेष राहिली. ना त्यांनी कामात कधी हलगर्जीपणा केला, ना कोणत्या कामाचा कधी कंटाळा केला.

घरीरी त्यांना नेहमीच कार्यालयातल्या कामाचे विचार येत राहतात. त्यामुळे त्यांना फारसं बोलायला, गप्पा मारायला आवडतच नाही. लवकर चिडणार, रागावणार आणि तितक्याच लवकर शांत होणार! हा त्यांचा स्वभाव. एखादी गोष्ट मनात धरून बसले की, त्यांना बदलवणं कुणालाच शक्य होत नाही. 'फॅक्झिबिलिटी' हा शब्द त्यांच्यासाठी दुर्मिळ असा आहे. तो त्यांचा दोष आहे, असंही नाही, पण गुणही कसा म्हणता येईल? माझं मात्र सगळंच वेगळं. मी एखाद्याशी भांडण करेन, दुसऱ्या दिवशी



'चुकले' म्हणून स्वत:च माफी मागेन. त्यांचं तसं नाही. पण म्हणून ते कठोर स्वभावाचे आहेत, असं म्हणता येणार नाही. दुसऱ्या मुलीच्या जन्माच्या वेळेस बाळ गुदमरलं. त्यांनी चटकन निर्णय घेऊन डॉक्टरांना सांगून टाकले, 'आता मात्र काहीही होवो, तुम्ही तिचं ऑपरेशन करून टाका.'

मला वाटतं की, त्यांच्या या निर्णयामुळे मी त्यांच्याविषयी नेहमीच कृतज्ञ राहिले. हे बाळ आम्हाला झालं, तेव्हा ते रंगाने निळं-जांभळं अन् अखंड मोठ्याने रडणारं. त्यावेळी मोठी लेक तीन वर्षांची होती. ते तिला घरी व्यवस्थित सांभाळायचे. रात्री व्यवस्थित झोपवायचे. दवाखान्यातून आम्ही मायलेकी घरी आलो. धाकटी रात्रभर टाहो फोडायची. ते तिला हातात घेऊन रात्रभर फिरवायचे. मोठीही हाताशी असायचीच. ती त्यांच्या मागेमागे करायची. तेव्हा त्यांचं पिता असणं मला समाधानाचं वाटलेलं होतं.

दोन्हीही मुलींच्या वेळी सिझेरियन झालेलं. मला जास्त उठबस करता यायची नाही. 'मुलगी'च झाली, मुलगा का नाही? असले प्रश्न त्यांनी आजवर मला केलेले नाही. उलट मुलींचे भरपूर लाड त्यांनी अगदी नेहमीच केले, करताहेत.

दोन्ही मुलींना त्यांनी अगदी लाडात वाढवलं. शाळेत घालताना चांगल्यातल्या चांगल्या शाळेत डोनेशन भरून प्रवेश घेतले. मुलींच्या शिकवण्या, परीक्षा, अभ्यासाची पुस्तके, निकाल याबाबत ते नेहमीच हळवे नि सतर्क राहिले. मुलींना उत्तम गुण मिळाल्यावर त्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहण्यासारखं असतं.

आणि हे लाड केवळ अभ्यासापुरतेच नाही तर त्यांचे कपडेलत्ते, खाऊ, खेळणी, आजार या प्रत्येकात त्यांनी विलक्षण मऊसूत होऊन जावं. मात्र मुलींच्या शाळेचे विविध कार्यक्रम, स्नेहसंमेलनं, पालकसभा, शिक्षकांना वगैरे भेटणं ही सारी कामं मात्र माझ्याकडे.

लग्नानंतर माझ्या लक्षात आले की, एक वर्तमानपत्राखेरीज त्यांना फारसं काही वाचायला आवडत नाही. त्यात सिनेमा, नाटक, साहित्यिक सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानं, गेट टूगेदर असल्या कुठल्याच गोष्टीत

त्यांना रुची नाही.

पण त्याउलट माझं वाचनाचं आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना जाण्याचं वेड त्यांनी समजून घेतलं. मला वाचनालय लावून दिलं. पुस्तक बदलवून आणणं किंवा त्यासाठीचे पैसे खर्च होण्यावरून ते कधीच रागावलेले नाहीत. तुला आवडतं तू वाच. हा त्यांचा स्वभाव एखादं चांगलं पुस्तक, लेख, कविता मला आवडली नि त्यांना ऐकवावी म्हटलं तरी नाराजीनेच ते तयार होणार. शांतपणे ऐकून घेणार. 'छान' एवढीच काय ती त्यांची प्रतिक्रिया.

घर उत्तम ठेवावं, घरात अत्यावश्यक व आधुनिक असं फर्निचर, वस्तू, भांडीकुंडी असावीत, हे त्यांना आवडतं. कुठे काही चांगली वस्तू पाहिली की, नि ती बजेटमध्ये असली की, ती त्यांनी आणलीच म्हणून समजा. खरेदीचा त्यांचा उत्साह तेव्हा पाहण्यासारखा असतो. त्यावेळची त्यांची उत्सुकता, ध्यास विलक्षणच असतो.

खाण्यापिण्याचे फारसे चोचले नाहीत. आवडीनिवडी अशा खास नाहीतच. फक्त दोन्ही वेळच्या जेवणात पोळी ही हवीच, हा नियम आहे. दरवर्षीचे, वर्षाचे गहू भरताना उत्तमातला उत्तम गहू ते भरून आणतात.

त्यांची 'दाद' मात्र कंजूष म्हणावी इतकी दुर्मिळ आहे. अन्नात, स्वयंपाकात काही कमी असले तर पटकन सांगणार. हे जमले नाही, बेत उत्तम झाला तरी शांतपणे, पोटभर जेवणार, फक्त 'जेवण उत्तम झालं!' असं सांगत नाहीत. याचं आश्चर्य वाटतं. घरी असो वा बाहेर, स्वत:पेक्षा मुलींच्या आवडी-निवडीचा, त्यांच्या भविष्याचा ते विचार करताना दिसतात, तेव्हा वाटतं की, असा पिता मिळायला भाग्यच लागतं. लग्नापासून माझ्या आई-वडिलांचं नि त्यांचं फारसं सख्य राहिलेलं नाही. अगदी एखाद्या आजारासारख्या प्रसंगी ते जातीलही भेटायला, पण मग नंतर पुन्हा आपल्या कामात! पण असं असलं तरी गावातल्या गावात आई-वडिलांना मला भेटण्यासाठी त्यांनी कधी रोखलेलं नाही. आठवण आली की, 'जाऊन भेटून ये!' असे त्यांचे सांगणे.

खरंतर अशावेळी त्यांचा, त्यांच्या स्वभावाचा मला अंदाजच येत नाही, पण आजकाल मला त्यांच्या अशा वागण्याची सवयच होऊन



गेलीय. स्वत:च्या बहिणी, भाचे, पुतण्या सर्वांशी ते अगदी प्रेमाने वागतील. सर्व कसा अगदी आटोपशीर मामला. हे सर्व नातेबंध सांभाळणं त्यांना कसं जमतं, याचं आश्चर्य वाटतं.

आमचं लग्न झालं, तेव्हा माझ्या तिन्ही धाकट्या बहिणींशी त्यांचं छान जमायचं. मुली होईपर्यंत जणू काही ह्याच तिघी त्यांच्या मुली असायच्या. चिडचिड नाही, आदळआपट नाही, एखादा मोठा भाऊ बहिणीशी जसा प्रेमाने वागेल असं त्यांचं त्या तिघींशी वागणं. कधी चेष्टेत त्यांच्या वेण्या सोडून टाक, कधी त्यांच्या हातातलं चॉकलेट खाऊन टाक, अशी चेष्टा ते आवर्जून करायचे. परंतु माझ्याशी वागताना ते एक सभ्य पती असतात. मोजकं बोलणार. उगीच चेष्टा-मस्करी, लाड, कौतुक नाही. खोटी खोटी मनधरणी नाही. एकदम टिपिकल खान्देशी गृहस्थ! तोऱ्यात राहणार. चौकटीतच वागणार. मला वाटतं, त्या मातीतली माणसं अशीच साचेबद्ध वागत असावीत का? मला त्यांच्या या वागण्याची आता सवयच होऊन गेलीय. कुमुदिनी रांगणेकर, शैलजा राजे, योगिनी जोगळेकर, कुसुम अभ्यंकर यांच्या कादंबऱ्यात मी वाचलेले 'पती' या प्रतिमेला त्यांनी नेहमीच दूर ठेवलं. थिल्लरपणा , बायकी गोष्टीत त्यांना कधीच रस वाटला नाही.

त्यापेक्षा त्यांनी ऑफिसमध्ये स्वत:च्या कामाने अधिकारी व सहकाऱ्यांची वाहवा मिळवली. शनिवार, रविवारच्या सुटीतही त्यांना काम करायला आवडतं. उगाच लोळत पडायचं, काम टाळायचं, कुचाळक्या करायच्या, व्यर्थ भटकंती, नाहक पैसा खर्च करायचा हे त्यांच्या स्वभावाला मानवत नाही. खाणं, पिणं या गोष्टींपासून ते नेहमीच दूर राहिले. देवधेवही त्यांनी एका विशिष्ट मर्यादेतच केली.

दिवसभर मानेवर खडा ठेवून ऑफिसचं काम करून आले तरी घरी परतताना मुलींना फोनवरून हमखास विचारणारच, 'आज खाऊ काय आणायचाय?' धाकटी त्यांची खास लाडाची. तिचा खाऊ ते हमखास आणणारच. त्यांना स्वत:ला वाहन चालवता येत नाही, पण दोन्ही मुली त्यांना स्कूटीवरून मस्त फिरवून आणतात, तेव्हा ते सर्वाधिक खूश असे बाबा असतात.

मुली आता कॉलेजात जातात. आधुनिक पद्धतीने राहतात. त्याउलट त्यांचा बाबा शर्ट इन करत नाही, केसांची स्टाईलही साधीशीच, पायात शूज घालत नाहीत, म्हणून ते त्यांना साधेसे वाटतात. त्याचं मात्र त्यांच्या गावी कधीच काही नसतं. ते आपल्याच मस्तीत राहतात. काम करतात, आनंदानं जगतात असं वाटत राहतं, त्यांना बदलवणं ना त्यांच्या आई-वडिलांना शक्य झालं, ना त्यांच्या लाडक्या मुलींना, मग माझी तर गोष्टच वेगळी.

होय, ते टिपिकल आहेत. कार्यालयात ते नेहमीच कामसू नि कष्टाळू राहिलेले आहेत. अबोल नि गूढही आहेत. मुलींसाठी प्रचंड प्रेमळ असा बाबा आहेत, हीच त्यांची खरी ओळख. याशिवाय त्यांची खरी ओळख सांगणे खरोखरीच अवघड आहे. त्यांना चाकोरीबद्द रहायला, वागायला आवडतं. ते स्वत:च्या मुलींचा सर्वाधिक विचार करतात. त्यासाठीच त्यांचा अट्टाहास सुरू असतो, हे प्रकर्षाने जाणवत राहतं.

सुप्रसिद्ध लेखक राजन खान असं म्हणतात की, प्रत्येक स्त्री आपल्या पतीमध्ये एक पिता शोधत असते. त्याप्रमाणे मला मात्र मिळाला त्यांच्यात एक आदर्श पिता. होय ते इतर सर्व नात्यांच्या त्यांच्या मुलींचा बाबा म्हणून सर्वाधिक खूश नि प्रेमळ असे राहिलेले आहेत. माझा पुनर्जन्मावर विश्वास आहे. तेव्हा मी परमेश्वराकडे प्रार्थना करते की, पुढील जन्मात ते माझे 'बाबा' असावेत!

❖❖❖



# ताई नावाच्या आई!

थोडसं अंतर ठेवून वागावं, असं पूर्वापार चालत आलेलं नातं म्हणजे सासूचं. आपल्याकडे अगोदर एकत्र कुटुंबपद्धती होती किंवा आजची 'चौकोनी' कुटुंबं असली तरी सासू-सुनेचं नातं कधीच सौहार्दपूर्ण वगैरे नव्हतं. 'घरोघरी मातीच्याच चुली' म्हणून चित्रपटांनी, टीव्ही मालिका किंवा साहित्यातूनही सासू-सुनेच्या नात्याला अधोरेखित करताना त्याला कडवटपणाचा वास हा राहिलाच.

अर्थात नियमाला किंवा या पारंपरिक समजाला अपवाद हा असतोच. तसं माझी मैत्रीण उषा चौधरी हिच्या सासूबाई म्हणजे आमच्या 'ताई'. याही 'सासू' या व्याख्येत शब्दश: अजिबात बसत नाही. त्यांना सर्वजण ताई म्हणतात आणि एखादी गोड-प्रेमळ मैत्रीण, जीवाभावाची सखी असावी अशाच त्या आहेत.

ताई या उषाकडे रहायला आल्या की, आम्ही तिघी घट्ट मैत्रिणी म्हणजे उषा, वासंती आणि मी यांच्यासाठी त्या बरोबरीची एखादी मैत्रीणच जणू खूप दिवसांनी भेटावी असा आनंद आम्हाला होई. आमची घरं जवळ जवळ. संसार, मुलंही बरोबरीचीच. त्यामुळे ताईंच्या सहा मुलांच्या मुलांबरोबरच आम्हा सर्वांनाच ताईआजी हवी असायची.

ताई गावाकडे म्हणजे धुळ्याला रहायच्या, पण श्रावणात त्या नाशिकला आल्या की, थेट दिवाळीपर्यंत इकडेच रहायला यायच्या. मग काय, ताई आपल्या 'विठू माझा लेकुरवाळा'सारख्या नातवांपैकी कुणाला ना कुणाला घेऊन बसायच्या. एखादी दुसरी सूनही असेच जवळ. कारण

ताईंजवळ बसणं म्हणजे अखंड श्रवणभक्तीचा अनुभव येई. सगळी व्रत-वैकल्ये, सणवार यांची अचूक माहिती, ते साजरे करण्याची पद्धत, त्या स्वत:ही सर्व मनोभावे करायच्या. उगाच चिडचिड, आदळआपट वगैरे नाही. सर्व कसं छान प्रेमाने, समजुतीने करून घ्यायच्या.

त्यामुळे की काय, आम्ही तिघी मैत्रिणी त्यांच्याजवळ बसण्यासाठी घरकामं लवकर उरकून घेत असू. त्या ओट्यावर बसलेल्या असायच्या, पण हात-तोंड मात्र चालूच. भाजी निवडणं, वाती वळणं, मुलांना गोष्टी सांगणं, रडणारी बाळं शांत करणं, कुणाची बाजू घेऊन दुसऱ्याला समजावून सांगणं, पण हे सारं मात्र हसतमुखाने.

ताई छान अहिराणीत बोलतात. मोठं गोड वाटतं त्यांचं बोलणं. ऐकत रहावं वाटतं. बहिणाबाईंच्या पुष्कळशा कविता त्यांना तोंडपाठ आहेत. बोलण्याच्या ओघात या कविता आपसूक येणारच. आमची चेष्टा करताना त्या हाका मारून म्हणायच्या, 'या गं, सासू आलीय. आई आली असती तर गेटच्या बाहेर उभ्या राहिल्या असत्या तिघीजणी. म्हणून माझी बहिणाबाई म्हणते,

'माय म्हणता म्हणता होट होटाला गे भिडे, आत्या म्हणता म्हणता केवढं अंतर पडे.'

मग आमच्यातली वासंती म्हणे, 'नाही हो माय, तुमीच शे तसं आमनी माय.' मग अंगणातच नमस्काराचा सोपस्कार उरकला जायचा. आई प्रत्येकीला जवळ घेऊन पापी घेत. कानशिलांवरून अलाबला घेत.

बरं समजही इतकी की, आमच्या आधी ताईच आम्हाला विचारत, 'पोरींनो, तब्बेत बरी आहे ना?' खूप बरं वाटे. मग ताई आल्याचा आनंद द्विगुणित होऊन जाई. त्या असेपर्यंत आमच्या गप्पांच्या मैफिली दररोजच झडत.

मी वाचत असले तर ताई येऊन बसत नि कौतुक केल्यासारखे म्हणत, 'बघा, माझी सून कशी गुणाची आहे. मला पण सांग ना, काय वाचलं?' मग इच्छा असो-नसो, ताईंना सांगावंच लागे. काही वेळा मी अनुवादित आधुनिकसं काही वाचे. पण ताईंना तेही सांगत असे. त्या आवडीने ऐकून घ्यायच्या. त्यातून मग एक एक गोष्ट ताईंना आठवे. मग त्याही त्या



अनुषंगानेच काही सांगत-बोलत. बरोबरीच्या इतर बायकांना वाटे, 'काय बरं बोलत असतील या दोघी? ताई अन् ही काय बरोबरीच्या आहेत? पण ताई अशा बोलण्याकडे कधीच लक्ष द्यायच्या नाहीत. त्या त्यांच्या ठिकाणी नेहमीच बरोबर असायच्या.

वास्तविक ताईंनी खूप गरिबीत, कष्टात दिवस काढले, पण त्या परिस्थितीचे गाणे कधीच त्यांनी उदासपणे गायले नाही. हसत-खेळत, गेले ते दिवस, चिल्ले-पिल्ले मोठे झाले! असं काहीसं म्हणून त्या पुन्हा नॉर्मल होऊन जात. जुनी माणसं इतकी सहनशील कशी? असाही प्रश्न मला नेहमी पडतो.

ताईंना स्वत:ला सहा मुले, तीन मुली. पण गेल्या २० वर्षांत ताईंकडून मी कधीच एखादीचे गाऱ्हाणे म्हणून ऐकले नाही. तसं एकदम अळी मिळी गुपचिळीही नसत किंवा खाष्टपणाही नाही. निव्वळ समंजस अन् कल्पकतेने समजून द्यावं ते फक्त ताईंनीच. त्यांना त्यांच्या अण्णांची (पती) छान साथ मिळाली. दोघांचे सूर नेहमीच छान जुळले.

सासू म्हटली की, कुरकूर, उखाळ्या पाखाळ्या, निंदानालस्ती, सासुरवास करणं वगैरे आलंच, पण ताई नेहमीच म्हणायच्या, 'जाऊ द्या आपल्याला काय, कमवणारे ते, करणारेही तेच! सुखाचे राहो. कुठेही गेलं की, आपण आनंदानं रहावं. चार समजुतीच्या गोष्टी सांगाव्यात.' वाचताही न येणाऱ्या ताईंनी हे शहाणपण कुठून बरं मिळवलं असेल? उलट शिकलेली, वाचणारी माणसंही खूपदा मनानं कोतीच असतात.

नऊवारी लुगडं, हाता-पायात चांदीचे कडे, पायात ठसठशीत जोडवे, कपाळावर मोठ्ठं रुपयाएवढं कुंकू त्या रेखतात. ब्लाऊजही मस्त मॅचिंगचा. अशा रूपातल्या ठेंगण्या-ठुसक्या म्हणता येतील अशा चणीच्या ताई त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे दिसतात मात्र एकदम अप्रतिम.

आम्ही काय, म्हातारी माणसं! असा सूर त्या कधीच आळवीत नाहीत. देवाची गाणी गुणगुणतील. गप्पाचा फड रंगवतील. त्यात अहिराणी म्हणी, कविता, उखाणे घेतील. नातींच्या स्कूटीवरही आनंदाने बसतील. देवधर्मही करतील.

त्यांचे पती, अण्णा वयामुळे जरा थकलेहेत. त्यात त्यांना डायबेटिस.

म्हणून त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणं, त्यांचा प्रवास, मुक्काम, औषधपाणी यांची काळजी त्या स्वत:च घेतात. प्रसंगी कठोरही होतात. अण्णांना सोडून रहाणं त्यांना काळजीचं वाटतं. त्या आई-अण्णांच्या संसाराला 'बागबान'ची कथा म्हणतात. 'पोरींनो, हसू नका. आमच्याएवढ्या व्हा, म्हणजे समजेल तुम्हाला.'

उषा आजारी असली तरी त्यांचा जीव इतका खालीवर व्हायचा की, दहादा त्या 'उषा उषा' करीत हाका मारायच्या. स्वत: स्वयंपाक करतील, जेऊ घालतील. ताई नाशिकला आल्या की, आमचीही जेवणाची ताटं आम्ही त्यांच्या सोबतच मांडत असू. मग काय जेवण-गप्पा यात खूप छान वेळ जाई. ऐकत रहावं ताईंना, असंच वाटत राही.

परंतु ताईंचा समंजसपणा इतका नेटका की, आमच्यातून केव्हा उठून जावं, आम्हा मैत्रिणींना एकटं केव्हा सोडावं, हे ताईंना अचूक समजे. आमची 'स्पेस' त्यांनी केव्हाच 'ॲक्वायर' केली नाही. एकूणच काय, तर आईसारखीच गोड सासूबाई असं त्यांच्याविषयी विनयानं सांगता येईल.

बरं 'माझ्याकडे पहा नि पानफूल वहा' असं त्या कधीच वागल्या नाहीत. उषाच्या आईवडिलांनाही त्या मान देत. त्यांच्याशी प्रेमाने वागत. एखाद्या श्रावणात पोथीच्या निमित्ताने त्या उषाच्या आईवडिलांना रहायलाच बोलवीत व महिना-दीड महिना त्यांच्याशी अगदी प्रेमाने राहत. येणाऱ्या कुणी त्यांना विहिण-व्याह्यांविषयी विचारलंच तर मोठ्या कौतुकाने सांगायच्या, 'हे घर माझ्या मुलाबरोबरच सुनेचंही आहे. मग असा भेदभाव कशाला? उलट आम्हालाही त्यांची सोबत होते. बरोबरीचे आहोत तर गप्पांनाही मजा येते.' नुसतं बोलणं वेगळं अन् प्रत्यक्ष प्रेमाने वागणं वेगळं, पण ताई यासाठी एक मूर्तिमंत उदाहरण म्हणून मी प्रत्यक्ष अनुभवलंय.

अशा वेळी आपल्या सुनांना वाईट वाटू नये, तिला कुठे उणेपणा, कमीपणा वाटू नये म्हणून अशा भोचक बायकांना ताई पद्धतशीरपणे वाटे लावत. त्यांच्या धाकट्या सुनेला छायाला मूल खूप उशिराने झालं, पण त्याचं हे उणेपण त्यांनी न सुनेला जाणवू दिलं ना मुलाला. उलट त्या इतर सुनांना, घरातल्या-बाहेरच्यांना समजावून सांगायच्या, पण ताईंचं म्हणणं होतं की, 'होईलच तुला मुलगा मी असेपर्यंत.' हेही त्यांचे बोल



पुढे खरे ठरले.

ताईंचे सांगावेत तितके गुण कमीच आहेत. स्वतंत्र चरित्राचा विषय घेऊन त्यांच्यावर भरभरून लिहिता येईल, पण मनाने अत्यंत निर्मळ, समंजस, प्रेमळ असणाऱ्या नि वागणाऱ्या ताई सर्वांशी प्रेमाने बोलतात. देवधर्म करतात. सणवार करतात. कुणाला दुखवत नाहीत. अहिराणी लोकगीते, लोककथा, म्हणी आणि उखाणे तर इतके मोठे आणि पानभर लांबलचक, की ऐकताना गंमत नि आश्चर्यही वाटते. असं खूपकाही त्यांच्याकडेच चांगलं खच्चून भरलेलं आहे.

स्वत: एक उत्साहमूर्ती आणि मनाची गर्भश्रीमंती लाभलेल्या आमच्या ताई व अण्णा या केवळ उषाच्या किंवा त्यांच्या कुटुंबियांच्याच नसतात. त्या वासंती व माझ्यासह अनेकींच्याही असतात. त्यांना दीर्घायुष्य लाभावं, ही प्रार्थना! म्हणूनच खूपदा वाटलं, त्या ग्रेट आहेत, गोड नि प्रेमळ आहेत; पण एक मात्र निश्चित, त्या ताई नावाच्या आमच्या कित्येकींच्या आईच आहेत. तिच्या माऊलीपणाला आमचा हा मनोभावे नमस्कार.

✤✤✤

# तिची कहाणी

खरं तर ती एका मोठ्या शहरात जन्माला आलेली. तिथेच वाढलेली. ती स्वत: एक बहीण, दोन भाऊ आणि आईवडील असं सहाजणांचं कुटुंब. परिस्थिती बेतसबेत.

स्वत: ती दिसायला जेमतेम. काळीसावळी, उंच, बारीकशी अंगकाठी, दात काहीसे पुढे आलेले, पण अभ्यासात हुशार. वडील महानगरपालिकेत चतुर्थश्रेणी कर्मचारी, पण त्यांनी मुलांना आपल्या परीने उत्तम शिकवले. प्रोत्साहन दिले. त्यांची चारपैकी तीन मुलं पोस्टग्रॅज्युएट झाली.

तिचं पदवीपर्यंतचं शिक्षण पूर्ण झालं. लग्न होईपर्यंत पुढे आणखी एक वर्ष झालं आणि तिला एक स्थळ मिळालं. सरकारी नोकरी, स्थळ ओळखीतलं. सर्वांनीच सुस्कारा टाकला. चला, आयुष्याची चिंताच मिटली.

तरुणपणी कुणीही सुंदरच दिसतं. या नात्याने तीही लग्नात खुललेली. हसरी, डाव्या गालावर छोटीशी खळी पडायची. किती स्वप्नं घेऊन आली होती ती सोबत. मनपाखरू नुसतं भिरभिरत होतं फुलपाखरासारखं. सावळी असूनही मोठी गोड वाटत होती ती लग्नात. लग्नात मुली सुंदरच दिसतात का? का पाहणाऱ्याच्या डोळ्यात तेव्हा सुंदरता असते?

सासरी घर भरलेलं होतं. सासू-सासरे, जावा, दीर त्यांची मुले-तिने पहिल्या उत्साहात सर्वांचं मन जिंकलं. बायकांना नवीन नवीन उत्साहही फार असतो. कंटाळवाणी कामंदेखील 'यूंऽऽ' होऊन जातात. मनाला उगीच गुदगुल्या होत राहतात. लपवू म्हटलं तरी नवीनता नुसती ओसंडूनच



राहते. आईवडिलांचे संस्कारही असतात. माणूस प्यारं नसतं, त्याचं काम प्यारं असतं.

लग्नाच्या सुट्या संपल्या. जमलेली माणसं आपापल्या घरी पांगली. तिचा व नवऱ्याचा मुक्काम नोकरीच्या ठिकाणी हलणार होता. राजा-राणीचा संसार. स्वप्नांना आणि ती पुरी करण्याच्या विचारांना नुसतं उधाण आलेले, निदान तिच्यातरी.

भरगच्च अशा स्वप्नांत तिने संसाराची सुरुवात उत्साहाने केली. छोटंसं घर आणि आभाळभर स्वप्न. घरात तो आणि तीच! संसार सुरू झाला. प्रचंड उत्सुकता आणि हौस मनात... अपेक्षा फार नव्हत्या, पण जीव चुटपुटताच असतो ना नवीन नवीन.

एवढं छान गर्दीचं गाव, उत्साही वातावरण, मागे कुठलीच म्हणून भानगड नाही. नो पोरं, ना म्हातारी माणसं. म्हणून घरातलं काम आटोपून जोडीनं बाहेर फिरायला जावं, एखादा सिनेमा टाकावा, कुठेतरी काही छानपैकी खावं-प्यावं, बजेट बिघडायचा प्रश्नच नव्हता. महिन्याकाठी पाच-पन्नास रुपये! बस्स...

पण यजमान बिचारे जात्याच शुष्क. कोरडेठाक बायकांच्या शरीरात मन नावाची काही जिन्नस असते, हे तर कुणाच्या खिजगणतीतही नव्हतं. उमेदीने नवनवीन क्लृप्त्या वापरून सुचवून पाहिलं, पण सारेच प्रयत्न फोल! त्याचा तटस्थपणा विलक्षण होता. पुढे तिची उमेद खचली. खरं तर कोमेजलीच म्हणूयात. अर्थात हे सर्व हळूहळू घडलं. तिला रोमँटिक वगैरे जगावं वाटे आणि तो बिचारा पैशाच्यामागे. मग तिला समजलंच पक्कं की, जोडी चुकलीच आपली.

तिलाच आश्चर्य वाटे की, लग्नाआधी किती वाचायचो आपण, रोजनिशी लिहायचो, आठवणीनं... कुठला म्हणून विषय अभ्यासासाठी आपल्याला वर्ज्य नव्हता. राजकारण, घरगुती औषधे, किचन टिप्स, ज्योतिष, जीवनाचा आनंद घ्यायला प्रचंड ऊर्जा होती, त्यावेळी मनात. ते सर्व पडलंय मागं, नि सुकलंय पूर्णपणे इथे येऊन. हे जाणवत जाणवत ती झाली हडकुळी, कृश, खचलेली, उदास. हे कुणी विचारलं त्यावरून तर म्हणायची, ती समंजसपणे, 'काही नाही हो, मला इथलं हवामान

मानवत नाहीए...'

पण बायका असतातच सोशिक बिशीक. म्हणून मन दाबून घरात राबणं, राहणं सवयीचं झालं. आईवडिलांना आपलं हे दु:ख दिसू नये म्हणून जीवाचा आटापिटा असतो बायकांचा. तसा तिचाही. माहेरी जाणंही कमी झालेलं. एक एक दिवस उजाडत नि मावळत जीवन पुढे पुढे सरकत रहातं फक्त, असं तिला वाटे.

पण, या मनाच्या वेदना बाहेरच्यांना कुठे जाणवतात? त्यांना सारंच आलबेल वाटत असतं. थोड्याशा खर्चाने किंवा घर-संसारासाठीच्या खर्चानेही तो वैतागे. हे मात्र अतीच होतंय, त्यामुळे तिला हे पटेना. मग वाद व्हायला लागले. मग टोकाची भांडणं, तोही चिडून म्हणे, 'रहायचं तर रहा, नाही तर जा माहेरी निघून.' त्याला कुठे तिची गरज होती, हा त्याचा नेहमीचा पवित्रा. तिला या गोष्टींचा खूप संताप येई.

विस्कटलेल्या मनाने ती खरंच एकदा माहेरी आली की, आपल्या पश्चात तिकडे काही पश्चात्ताप वगैरे होतोय की काय हे पहावं. आईवडील आणि मोठ्या भावाने तिचं म्हणणंऐकून घेतलं. तिला आसरा-आधार दिला. मग काय, शेजारी पाजारी, नातेवाईक, समाज असतोच टोकायला. ते टोकदार बाणही तिने खालमानेने झेलले. मनाला आईकडे रहाणं पटत नव्हतं, पण तो म्हणजे भयंकर कोरडा पाषाण. आपल्या पदरी पडलाय, हे आठवलं की तिचा उत्साह मावळे. आपलं तिथे रुजणं कठीण आहे, असंच तिला वाटत राही.

परंतु माहेरी येऊन तिने उमेद सोडली नव्हती. शॉर्टहॅण्ड, टायपिंग, शिकवण्या असं काय काय तिचं सुरूच होतं. तिला पुन्हा उमेदीने उभं रहायचं होतं, पण एके दिवशी तिच्या सासऱ्यांची मरणासन्न अवस्थेतली तार आली. 'मला भेटायचंय, तू ये.' तिच्या वडिलांनी विचार केला, मरत्या जीवाची आशा आहे, मोडू नये. ते तिला पुन्हा सासरी घेऊन आले. तिनेही मनाची जुळवाजुळव केली.

सासऱ्यांनी दोघांना समजावून सांगितले, 'व्यवस्थित वागेन, तिला सांभाळेन' असं वचन त्याच्याकडून घेतलं. मग ती तेथेच राहिली. पंधरा दिवसांत सासऱ्यांचं निधन झालं. वडिलांना दिलेलं वचन म्हणून की काय,



त्याने तिला पुन्हा 'घराबाहेर जा' असं म्हटलं नाही. पुन्हा संसार सुरू झाला.

माहेरच्या दीड वर्षाने तिला खूपकाही शिकवलं होतं! समंजसपणा म्हणजे तडजोड करायला आता तिने शिकून घेतलं होतं. अकालीचं प्रौढपण तिच्याजवळ आलं होतं. 'माझ्या मना बन दगड' असं काही.

तिने आता मनाशी ठरवून टाकलं की, 'तो' बदलत नाहीएना, ठीकेय. आता आपण बदलूयात. स्वत:साठी बदलू. मग तिने पुन्हा वाचायला सुरुवात केली. रेडिओ आता तिचा मित्र झाला. काही मैत्रिणीही तिने मिळवल्या. त्यातून एक समंजसपणाही तिच्या मनात आपोआप येत गेला. तिने स्वत:ला रुळवून घेण्याचा प्रयत्न केला. मनापासून!

तिचा हा बदलत गेलेला स्वभाव जवळच्यांना आपसूक लक्षात यावा, इतकं तिने स्वत:ला बदलवलं. लग्नात तिला कुणी नवी साडी द्यावी, ती तिने एखाद्या भिकारणीला देऊन टाकावी, कुणा गरजू मुलाला फुकट शिकवावं, देवळाबाहेर बसणाऱ्या भिकाऱ्याला समजून घ्यावं, गरीब, वंचित मुलांत तिने आनंद पेरावा, असा विचार तिच्या मनात आलेला. तिचं आता सगळं वेगळंच चाललेलं.

समाजसेविका मदर तेरेसा, मेधा पाटकरांसारखं साधसुधं रहाणं, दोन साड्या, कपाळावर टिकली, पायात साध्याशा चपला बस्स. आता नव्या साड्यांसाठी कधी हट्ट नाही, मागणं नाही, जोडीने फिरणं नाही. साधा गजरा मागणं वा तो माळणं नाही. सिनेमा-नाटक नाही. दोन वेळचं जेवण, घरकाम पत्नीधर्मात बसतील तेवढी आवश्यक कर्तव्य करीत दिवस ढकलणं, हेच जीवन.

ती माहेरी गेली होती, त्या वेळेस त्याने कुठून तरी पैसे व्याजाने घेतले होते. तिला त्याबद्दल काहीएक माहीत नव्हते. त्यानेही तिला सांगितलेले नव्हते. एकदा तो आईला भेटायला म्हणून गावी गेलेला. ती एकटीच घरात शांतशी झोपलेली. मध्यरात्री दार जोरजोरात वाजू लागलेलं. तिने अंदाज घेत भीतभीत विचारलं, 'कोण आहे?'. बाहेर त्याच्या नावाच्या हाका. पुरुषी, राकट 'दार उघडा, आम्ही आहोत!' बिल्डिंगमध्ये राहत असल्याने तशी काही भीती नव्हती, म्हणून हिंमत धरून तिने घराचा

दरवाजा उघडला. दारासमोर तीन-चार उग्र चेहऱ्याची माणसं उभी. नाही म्हटलं तरी तिचा जीव घाबरलाच. कशीबशी ती त्यांना विनवल्यासारखी म्हणाली, 'आईला भेटायला ते गावी गेलेत. निरोप सांगा. उद्या ते आल्यावर मी सांगते त्यांना.'

माणसं ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हती. अरेरावी, अर्वाच्य शिवीगाळ वगैरे सुरू झालं. परंतु गर्भगळीत न होता, तिने धैर्य एकवटलं आणि त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. 'हे पहा, तुम्ही सगळी माणसं वयानं मोठी आहात. काय काम होतं तुमचं त्यांच्याकडे?'

जरबेने त्यातला एक म्हणाला, 'पैसे दिले आहेत त्याला, ते मागायला आलोय.'

प्रसंगावधान राखून तिने त्यातील एक वयस्कर माणसाला विनंती केली, 'काका, एवढ्या मध्यरात्री तुम्ही यायलाच नको होतं, पण ठीकेय. तुम्ही आलात. मला तुमची रक्कम सांगा. मी शिकलेली आहे. नोकरी करीन, कष्ट करीन, पण तुमचे सर्व पैसे मी व्याजासहित फेडेन. काळजी करू नका. धर्माच्या लेकीचं एवढं ऐका...'

तिच्या या युक्तीवादामुळे माणसं आतून हलली. आपले नाव, पत्ता सांगून निमूटपणे निघून गेली. पोरीने वेळ मारून नेली.

गंभीर वेळ तर टळली. परंतु त्या माणसांचे उग्र डोळे, राकट भाव तिला स्वस्थ बसू देत नव्हते. पैसे परत करण्याचं कठीण आव्हान समोर होतं. म्हणून तिने कंबर कसली. जिथे जिथे म्हणून शक्य आहे, तिथे तिथे तिने नोकरीसाठी अर्ज केले. एका स्थानिक वृत्तपत्रात तिला तात्पुरती नोकरी मिळाली. जाणं-येणं, तिथलं काम, घरसंसार साराच द्राविडी प्राणायाम! पण ती हिंमत हरली नाही. पहिला पगार झाला. त्याचा कुठलाही लाभ न ठेवता दिलेल्या पत्त्यावर झोपडपट्टीवजा भागात त्या माणसाच्या घरी जाऊन ती पैसे देऊन आली.

असं एकदा-दोनदा तिचं त्या वस्तीत जाणं झालं. मग त्या माणसाला तिची दया आली. 'पोरी, तू नको येत जाऊस. मीच येईल तुझ्या कार्यालयाच्या जवळपास रस्त्यावर. माझी लेक आहेस ना तू...' मोठ्या हिकमतीने तिने त्या माणसाचे सर्व पैसे फेडले. आता तिला हलकं नि



मोकळं वाटू लागलं. ती फक्त त्याला म्हणाली, 'बाबा रे... अशी वेळ माझ्यावर पुन्हा आणू नकोस.'

अडचणीचे दिवस संपले. कसातरी संसार मार्गी लागला. दोन मुलगेही झाले. तिने मागे लागून त्याच्याकडून रहातं घर बांधून घेतलं. मग तिला त्याने दुकान काढून दिले. जवळच आता मुलांचा अभ्यास असतोच. घरात व दुकानात वेळ कसा, कुठे निघून जातो, तिचं तिलाच समजत नाही.

मुलं मोठी होताहेत. घरसंसार सुरूचेय. तो कुठेतरी मार्गी लागल्यासारखा संसार रेटतोय. वरवर कसं ठीक, बरं, चांगलं. असं शेऱ्यातलं घर. आता तिचीही काही तक्रार नाही, पण कधीकाळी पाहिलेली ती इवलुशी स्वप्नं! त्यांचा मात्र चोळामोळा झालेला. मनाची पालवी करपून गेली. तिचं ते निर्व्याज हसू, तिची ती गालावरची खळी, तिचं ते वाचन, संग्रह करण्याची, रोजनिशी लिहिण्याची सर्व उमेद संपूनच गेली.

असं वाटतं, आज तिने त्यावेळसारखी रोजनिशी लिहिली असती आणि कुणी ती वाचली असती तर त्यात दिसले असते एकच एक संदर्भ... 'तेच ते ... तेच ते... तेच ते'.

अशा किती मुली असतील, बायका असतील की, ज्यांची स्वप्नं मुठीत मावतील इतकी छोटी आणि मनस्वी असतात. परंतु तथाकथित पुरुषी अहंकार, व्यवस्थेची उतरंड आणि दगडी मानसिकता यात ही स्वप्नं कधीतरी हळूहळू गळून जातात. संसाराचा गाडा ओढता ओढता हातपाय, मन सारंच निबर होतं. कोवळे निरागस हातपाय राठ, भेगाळून जातात. कुणा संवेदनशील मनाच्या माणसाला ते जाणवतात व तो लिहून जातो,

*माझ्या मायपुढे थिटे*
*सम्दे देऊळ राऊळ*
*तिच्या पायांच्या चिऱ्यात*
*महे अजिंठा यरुळ ॥*

हो, तिला एवढीच एक आशा शेवटी उरते की, कुणीतरी हे दुःख जाणून घ्यावं, आपल्याला समजून घ्यावं, मोठं व्हावं. सुखी व्हावं, खरंच, तिला आणखी काय हवं असतं हो?

आज ही 'ती' म्हणजे कोण? तिचं नाव, गाव काय? पुढे तिचं काय

झालं? असे कितीतरी प्रश्न कुणाच्याही मनात सहज येतील, पण मला तिचं नाव, गाव, पत्ता मुळीच सांगायचे नाही.

कारण ती म्हणजे खरंच केवळ कुणी अबकड नाहीएच मुळी. ती घराघरातून तुम्हाला दिसेल, जाणवेल. गरज आहे ती फक्त तिला संवेदनशीलपणे समजून घेण्याची. बऱ्याचशा लोकांना ती म्हणजे एक बाई वाटते हक्काची, कामवाली, मिरवण्यापुरती, असहाय्य, मुलं जन्माला घालणारी, कमवणारा, राबणारा एक हात, राबणारा जीव आदी आदी.

पण काही माणसांना ती वाटत असते 'आई'देखील. याच एका वेड्या आशेवर, मायेवर, स्वप्नांवर, नात्यांवर 'ती' जगत असते. हेही एक वैश्विक सत्य. तिचं तिचंच! स्वत:ला पुन्हा पुन्हा उभं करणारं...

मला वाटतं, तिच्या कहाणीतील 'ती' कोण? हे आता आपल्या 'नेमकं' लक्षात आलं असावं!

✤✤✤



# धाकटी

दहा-अकरा वर्षांची होते मी. आम्ही दोघी बहिणी शाळेसाठी परगावी बसने जात असू. आमची तीन नंबरची बहीण तीनेक वर्षांची असेल. एके दिवशी आमची शाळा सुटली. मैत्रिणींबरोबर बसमध्ये बसताना गाडीचे ड्रायव्हर काका हाक मारून मला म्हणाले, 'प्रतिभा, तुला बहीण झालीये... तुम्हाला घ्यायला निघालो, तेव्हा तुझ्या वडिलांनीच सांगितले मला...'

फारसं काही कळण्याचं वय नव्हतंच आमचं. की आपल्याला बहीण (!) झालीये. म्हणजे आपल्या आईवडिलांना आम्हा तिघींच्या पाठीवर मुलगीच झालीय. आम्हाला त्यावेळी खूप आनंद झालेला. केव्हा एकदा घरी जातो, असं होऊन गेलेलं. आमच्या गाडीत दहावी-अकरावीच्या मुली होत्या. त्यातल्या एकदोघी एखाद्या पोक्त बायकांसारखं म्हणाल्या, (म्हणजे हळहळल्या) 'बाई गं, चौथी मुलगीच... मुलगा हवा होता.'

'एक तरी भाऊ हवा होता तुम्हाला!'

असं काही तरी त्यांचं चाललेलं. आम्ही त्यांच्याकडे पाहत राहिलो फक्त. धावतच घरी आलो. आईजवळ छोटंसं बाळ झोपलेलं होतं. आई म्हणाली, 'हातपाय धुवून मग या गं बाळ बघायला.' तसं आम्ही बाळ बघायला गेलो आणि आणखीच आनंदलो. निळ्या पिटुकल्या डोळ्यांचं बाळ आम्हा तिघींनाही खूप आवडलं.

वडिलांची आई म्हणजे आमची आजी, मुलगी झाल्यामुळे काहीशी नाराज झालेली दिसत होती. दोन-चार दिवसांत दुसऱ्या काकूंचं बाळंतपण

करायला ती निघूनही गेली. मग काय, आम्ही दोघी मोठ्या बहिणी, वडील, कामवाल्या काकू असं मिळून आम्ही आईचं-बाळाचं छान निभावून नेलं.

घरामध्ये छोटी, म्हणून आम्हा तिघी बहिणींची खूप लाडकी बाळी झाली होती ती. मी तिचे नाव 'नीला' ठेवले. दुसऱ्या नंबरच्या माधुरीने तिने नाव 'गौरी' ठेवले. तिसऱ्या नंबरच्या वैजूला घरात अखंड खेळायला एक बाळ हक्काचं मिळालं होतं. आईवडील मनोमन निराश वगैरे झालेही असतील, पण ते दोघेही समंजस, विचारी म्हणून त्यावेळीही आणि त्यानंतरही त्यांनी आपल्याला 'मुलगा' नसल्याचं कधीच दाखवलं नाही. ते दोघे खूश होते, अर्थात त्यामुळे आम्हीही.

तिचं नाव मग विद्या ठेवलं गेलं. आम्हालाही ते आवडलं. विद्या हळूहळू मोठी व्हायला लागली. सगळ्यांकडून भरपूर लाड करून घ्यायला तिला आवडे. आम्ही खेळायला जाणार म्हटल्यावर ती दोन्ही हात वर करून 'मला घ्या', अशा अर्थी 'माना... माना...' म्हणून मागे लागण्याचा हट्ट करी. मग तिला कडेवर उचलून घ्यावेच लागे; तेव्हा कुठे खेळायला जाणे होई, पण ही पठ्ठी बिलंदर... खाली म्हणून उतरायचं नावच घ्यायची नाही.

मग आमचा खेळ फक्त इतरांचा खेळ पाहण्यापुरता असे. तासन्‌तास ती कडेवर रुतून बसे. आम्हाला जसा दुसरा अवयवच फुटला होता, त्यावेळी तिच्या रूपात. इतकी ती आमच्या कडेवर असे. आपण नंतर खेळू म्हणून मनाला आम्ही समजावीत असू. कवी किरण भावसारांच्या शब्दांत सांगायचे तर 'आम्ही मनातच खेळलो त्यावेळी.'

विद्या तिसरी-चौथीत असताना माझे लग्न ठरले. फ्रॉक, दोन जाड वेण्या, चेहऱ्यावर 'हट्टी' अशा भावात म्हणाली, 'ही जर 'त्यांच्या'बरोबर फिरायला वगैरे जाणार असेल तर मी आधी जाणार एकटी. मग ताईला न्यायचंय!' मग एके दिवशी मेहुण्यांना हट्टाने म्हणालीच, 'चला, आज मी तुमच्याबरोबर चक्कर मारायला येणारच. फिरायला जाऊ, पिक्चरमध्ये गजरा घेतात तसा गजरा तुम्ही मला घ्यायला हवा.' आणि एवढं म्हणून ती गेलीच त्यांच्याबरोबर.



तिला सुटी असली की, तिचा मुक्काम माझ्या घरी. म्हणे, 'ताई, मी आराम करायला आलेय. मी झोपणार आहे दिवसभर छाऽन.' एक-दीड वर्षांनी आम्हाला मुलगी झाली. त्यावेळी आम्ही आमचं घर आईवडिलांच्या जवळच घेतलं होतं. मग काय, विद्या सकाळीच उठून पळत येई. अन् बाळ दुपट्यात गुंडाळून छान आडवं धरून चार जिने उतरून घरी नेई. तिकडेच तिला खेळवत बसे.

एकेक करत बाकीच्या बहिणींची लग्नं झाली. त्यांनाही मुलं झाली. मग ती तीन-चार भाच्यांची मावशी झाली. तरी मात्र ती स्वत:ला लहानच समजत असे. आता ती समंजस झाली होती, पण तिचा हा समंजसपणा आमच्या घरी कुठल्या कुठे पळून जाई. मुलींशी भांडणं, हट्ट, रागावणं, रुसणं असं तिचं चालतच असे. समजावणीच्या सुरात आपण तिला बोललोच, 'तू मावशी आहेस आता. मोठी झालीस ना तू आता.'

त्यावर, 'तुमच्या मुली काय माझ्यापेक्षा लाडक्या आहेत का तुमच्या?' असा तिचा बिनतोड जवाब असे. आम्हाला तिच्या बोलण्याचं हसू येई, कौतुकही वाटे. लहान म्हणता म्हणता विद्या तशा लाडातच वाढली. त्यामुळे लवकर मोठीही दिसायला लागली. रंगाने थोडी निमगोरीच, पण नाकी-डोळी तरतरीत, उंच, सडपातळ अंगकाठी, लाघवी हसणं यामुळे तर ती अधिकच सुंदर दिसे. नवनवीन फॅशन्सचे ड्रेस, उंची साड्या यामुळे ती सर्वांपेक्षा उजवी दिसते. तिच्यात एक निरागस अल्लडपणा असल्यामुळे आम्हा सर्व बहिणींपेक्षा ती अधिकच देखणी दिसते. असं सर्व तिचं लाडाकोडात चाललेलं. माझ्या दोन नंबरच्या बहिणीने म्हणजे माधुरीने आपल्याच नात्यातला एक मुलगा बघून विद्याचं लग्न ठरवलं. आपल्या लग्नात विद्याने कुणी काय काय द्यावं, याची एक लिस्टच आपल्या मेहुण्यांना करून दिली. शेवटचं कार्य आणि सर्वांची लाडकी म्हणून सर्वांनीच तिचा शब्द पाळला. मोठ्या हौसे-मौजेने तिचं लग्न संपन्न झालं.

हो, तिच्या लग्नात तिने छान जांभळ्या रंगाचा शालू नेसला होता. तिचं मूळचं सौंदर्य त्यात अधिकच खुललं होतं. लग्नात मुलाकडच्यांनीही तिच्या रूपाची खूप तारीफ केली. आमचा जीव भांड्यात पडला की, चला, विद्याला छान घर मिळालं.

विद्या सासरी निघाली, तेव्हा आईबाबांसह आम्हाला सर्वांना खूपच वाईट वाटलं. जणू काही आमचीच मुलगी सासरी निघाली होती, पण ती मात्र खुशीत होती. हसणे बरे दिसले नसते, म्हणून हसली नाही, इतकंच! छान बाय-बाय करत अगदी शांतपणे ती सासरी गेली.

नाशिकसारख्या मोठ्या शहरात वाढलेली, शिकलेली, सगळ्यांकडूनच भरपूर लाड करून घेतलेली आमची लाडकी विद्या, विंचूरसारख्या खेडेवजा गावात छान रमली. इकडे सर्वांचं लाडकं पिलू असलेली विद्या तिकडे सगळ्यात मोठी सून झाली आणि म्हणूनच सगळ्यांच्या अगोदर उठून झाडलोट, सडारांगोळी, कुटुंबाच्या स्वयंपाकात सासूबाईंना मदत, नवऱ्याच्या टेलरिंगच्या व्यवसायात मदत करणे, तिच्या मुलाचं-साहिलचं करणं म्हणजेही एक दिव्यच. इतका तो खोडकर, मस्तीखोर नि तिचा प्रिय असा आहे. हे सर्व करता-करता विद्या एकदम मोठी झाली, असं म्हणावं लागेल.

गावामध्ये तिच्या सासूबाईंचा लौकिक मोठा. सासूबाई सरपंच होत्या गावच्या. शिवाय पै-पाहुण्यांचं येणं-जाणंही ती आदबीने सांभाळते. कुठली म्हणून तक्रार नाही.

पण एकदा का विद्या माहेरी आली की, ती येथे पूर्ण धाकटी होऊन राहते. तिघी बहिणींकडे ती चार-पाच दिवस मजेत राहते आणि पुन्हा मोठे होऊन सासरी जाते, याचं आम्हाला कौतुक वाटत राहतं.

तिच्या बाळंतपणाच्या वेळेस आमची आई थकलेलीच होती. शहराबाहेरच्या वस्तीत राहत होती. नाही म्हणायला मी अन् माधुरी मोठ्या, म्हणून आम्ही दोघी-तिघींनी तिच्या बाळंतपणाची जबाबदारी हौसेने नि व्यवस्थित पार पाडली. हो, विद्या आता एका बाळाची आई झाली होती. आमच्या बाळालाच आता बाळ झालं होतं.

तिचा साहिल तिच्यासारखाच हट्टी, खोडकर, विंचूरची संस्कृती पुरेपूर मुरलेला. विलक्षण करामती, उचापती करणारा, चटपटीत. पण आम्हाला सर्वांनाच तो खूप आवडतो. त्याचं हवं नको पाहताना कौतुक तर वाटतं, पण दमायलाही होतं. विद्या ते काम आनंदाने करते.

आई आम्हाला सांगते, 'नाही हं, आपली विद्या आता खरंच मोठी



झालीय.' शिवाय आम्ही तिघी बहिणी खुद्द नाशिकमध्ये राहतो आणि विद्या पन्नास-साठ किलोमीटर दूर विंचूरमध्ये राहते, म्हणून तिला आमची अन् आईआबांची ओढ साहजिकच आहे. म्हणून ती आईआबांकडे नियमित येते. त्यांचं छान करते. ती आली की शेंडेफळ म्हणून आईआबाही खूश असतात.

आता आम्हाला पटतंय की, हो, आपली विद्या खरंच मोठी झालीय. समंजसही. त्याचं समाधानही वाटतंय. एक लाडूबाई तिकडे मोठी सून झालीय. साहिलची आईही झालीय. घरसंसार छान चालवतेय. एकंदरीत तिचं सारं काही रांकेलाच लागलंय, असं वाटतं.

पण आजही एखादं लहानगं मूल पाहिलं आणि ते उचलून घेण्यासाठी हट्ट करील, हात उंचावेल असं दिसलं की, आम्हाला आठवते ती फक्त विद्या किंवा कुठलंही छोटं बाळ उचलून घ्यावं आणि त्याने आपल्याला घट्ट बिलगून बसावं तेव्हा त्याच्यात आम्हाला विद्याच दिसत असते किंवा आजही ती आली तर आम्ही तिच्यात अन् आमच्या मुलात भेदभाव करत नाही. न जाणो ती त्यावेळसारखी म्हणून जायची, 'तुमच्या मुली माझ्यापेक्षा...!' अशी ही गोड, लाडिक, खेळकर, आनंदी, लाघवी आणि निरागस विद्या ही शाळेत आपण म्हणायचो तसं,

*छडी लागे छमछम विद्या येई घमघम ।*

ही त्यातील विद्या नसली तरी आमच्या कुणाच्या घरी ती येते तेव्हा मोगरीच्या फुलांचा किंवा एखाद्या सुवासिक फुलांचा घमघमाट यावा तशी ती घरभर घमघमत राहते. ती आणि तिचा साहिल म्हणजे गाय-वासराची जोडी. मोठं प्रसन्न वाटतं, त्यांना पाहताना. चार-आठ दिवस तिचं राहून झालं की, ती पुन्हा घरओढीनं तिच्या पतीबरोबर-शैलेशबरोबर विंचूरला परत जाते. तेव्हा वाटतं की, आपली धाकटी बहीण नाही, आपली लेकच निघालीय सासरी जायला. पण जातानाही ती जाम खुशच असते. याचं कौतुक अन् समाधान वाटतं. हो, ती पुन्हा केव्हाही तिच्या माहेरी आमच्या कुणाकडेही येवो, आम्हाला एकच छानपैकी जावणत राहतं, 'विद्या येई घम घम!'

✤✤✤

# स्वच्छ, गुलाबी, मनसोक्त आंघोळ!

नाशिक शहरात स्वत:चं घर असणं, ही प्रत्येक माणसासाठी एक मोठी अशी गोष्ट आहे. विशेषत: प्रत्येक मध्यमवर्गीय माणसाचं ते एक स्वप्नच होतं. साधारण १५ वर्षांपूर्वी आम्हीही ते स्वप्न पाहिलं, पण बजेट कमी, खर्च वाढता. पगाराला सतराशे साठ पाय. त्यामुळे आम्हीही एक फ्लॅट घेतला, पण तो शहरापासून बऱ्यापैकी दूर. लांबच्या उपनगरात. वास्तविक मुलांच्या शाळा, ह्यांचे ऑफिस, शहर सगळंच तसं खूप लांब वाटायचं असं, पण स्वत:ची वास्तु असावी एवढ्याच ध्येयाने आम्ही इथे रहायला आलेलो!

आमच्या दोन्ही मुली खूप लहान. वय वर्षे ३ व ६ वर्षे. त्यांना शाळेत नेणं-आणणं, त्यांची आजारपणं, रोजची आवश्यक भाजीसारखी खरेदी, नवी वसाहत, अनोळखी परिसर, पण आमच्या फ्लॅटच्या शेजारी असलेल्या बंगल्याच्या मालकीणबाईंना सांगितलं, 'एखादी कामवाली बाई असेल तर सांगा. निदान भांडी घासली तरी पुष्कळ.' त्यांनी होकार दिला. मला बरं वाटलं.

दुसऱ्या दिवशी १० वाजता दरवाज्यात १०-११ वर्षांची मुलगी येऊन उभी राहिली. 'मावशी, शेजारच्या मावशींनी पाठवलंय मला.' मी आश्चर्याने बघतच राहिले. अगदी न घाबरता, धीटपणे ती बोलत होती. तिला घरात बोलावलं. तिच्या वयाकडे पाहून तिला विचारलं, 'तू गं बाई काय काम करशील?' यावर ती म्हणाली, 'मावशी, माझं नाव संगीता. माझे आईवडील बाजूच्या बांधकामावर बिल्डिंगच्या कामाला जातात. मी



भांडे सोच्छ घासते. तुम्हाला पहायचे का? द्या आत्ताच, जेवढे असतील तेवढे.'

तिचं बोलणं, तिचा आत्मविश्वास, तिची धिटाई मी पाहतच राहिले. तिच्या नजरेत चमक होती. पाठ्यपुस्तकात इयत्ता ८वीला असताना एक कविता होती,

*'गाई पाण्यावर काय म्हणूनी आल्या,*
*का गं गंगा यमुनाही मिळाल्या*
*उभय पितरांच्या चित्तचोरटीला,*
*कोण माझ्या गं बोलले गोरटीला.'*

या कवितेसह सोबतच्या छायाचित्रातील मुलीची आठवण झाली.

तोपर्यंत घरात असलेली खरकटी भांडी घेऊन संगीता बाथरूममध्ये गेलीही, पण भांडी खाली ठेवून ती आमचं बाथरूम पाहतच राहिली. फ्लोअरिंगचं व्हाईट मार्बल अन् छतापर्यंत छान गुलाबी टाईल्स पाहून पोरगी एकदम खूश झाली.

याच आनंदात पोरगी स्वच्छ भांडे घासून आलीही बाहेर. अन् मस्त हसून म्हणाली, 'मावशी, बघा हं भांडी, तुमचं घर छान आहे. मला आवडलं.'

थोड्याच वेळात संगीताने मला जिंकून घेतलं होतं. खूप जुनी ओळख असल्यासारखी ती माझ्या दोन्ही मुलींशी बोलायलाही लागली. धाकटीला तिने छान कडेवरही उचलून घेतले. नवीन जागा, ओळखीचं कोणी नाही. मुली काहीशा रडवेल्या, उदासल्या होत्या. त्या आता थोड्याशा खुशारल्या. मला वाटलं, चला, भांड्यालाही माणूस मिळालं अन् मुलींना एक मैत्रीण.

दुसऱ्या दिवसापासूनच ती घरात छान रुळल्यासारखी झाली. विटके पण स्वच्छ धुतलेलं कपडे, चेहऱ्यावर एक चैतन्य. माझी इतर कामं होईपर्यंत धाकटीला ती सांभाळायची. मोठीशी थोडंसं भांडायचीही. मग मला मध्यस्थी करावी लागे. 'भांडू नका गं, संगीता, तू मोठी आहेस ना?' असं म्हणून तिलाही दटावी आणि मुलींनाही समजावून सांगे, 'पोरींनो, ती गेल्यावर कोण खेळेल तुमच्याशी?' मुली मग जमवून घ्यायला लागल्या. माझा जीव भांड्यात पडला.

जूननंतर मुलींच्या शाळा सुरू झाल्या. दोघींची शाळा मागे-पुढे असायची. एकट्या असल्या की, त्या संगीताची आठवण काढायच्या. 'आई, संगीता केव्हा येईल.'

सकाळी, दुपारी ती जेव्हा येई, तेव्हा पोरीचं तिच्यासोबतच खेळणं, टीव्ही पाहणं, खाऊ खाणं, असं काहीतरी सुरू असायचं. काहीतरी गमतीचं त्यांना, एकट्या संगीतालाच सांगायचं असायचं. मलाही कौतुक वाटायचं.

एकदा सकाळी संगीता कामासाठी घरी आली. मी धाकटीला शॉवरखाली न्हायला घालत होते. शाम्पूचा फेस करून ती मनसोक्त पाणी-पाणी खेळत होती. संगीता मात्र धाकटीची आंघोळ, हसऱ्या-बोलक्या चेहऱ्याने बघत होती आणि तेव्हाच उत्स्फूर्तपणे म्हणालीही, 'मावशी, मज्जा येत असेल ना हो अशी डोका-आंघोळ करायला?'

मी कौतुकाने तिच्याकडे पाहिलं, ती पटकन आईकडे सांगावं तशी मला म्हणाली, 'मावशी, मलापण वाटतं... अशा गुलाबी, गुलाबी बाथरूममध्ये आंघोळ करायला... डोका आंघोळ करायला किती मज्जा येईल ना?'

तिचे हे धिटूकले बोल ऐकून, मलाही काहीसं गलबलून आलं. वाटलं, जवळपास माझ्याच मुलींच्या वयाची ही पोर, किती आतूर आहे अशी आंघोळ करायला. नि आपल्या मुली! किती बळजबरीने घालावी लागते त्यांना आंघोळ, आणि ही पोरगी! किती छोट्याशा अपेक्षा असतात ना या चिमुकल्यांच्या?

मग मात्र मी केवळ भावनिक न होता तिला हसून म्हणाले, 'तुला करायचीय का अशी आंघोळ? ये, तुझे कपडे घेऊन ये. अन् करून पहा अशी मस्त आंघोळ.'

माझ्या या प्रतिसादावर संगीता इतकी खूश झाली की, बस्स. मी पहातच राहिले. जाताना सांगून गेली, 'मी आईला सांगते मावशी, अन् घेऊन येते हं कपडे.'

चार-पाच दिवस झाले. सकाळीच बाजूच्या दोन घरांची कामं करून संगीता माझ्याकडे उत्साहाने तिचा धुवट फ्रॉक घेऊन आली. मग मीही



तिला एका मगात शाम्पू काढून दिला. म्हटलं, 'कर आता आंघोळ. गिझरचं गरम पाणी आहे, शॉवर आहे. सर्वकाही दिलंय तुला. आता होऊन जाऊ दे मनसोक्त आंघोळ.'

छोटसं मन आनंदानं हरखून गेलं. पोरगी अगदी लाजून पटकन बाथरूममध्ये गेली. आतून छान दरवाजा लावून घेतला. स्वच्छ आंघोळीचा आवाज येत होता. मधून मधून तिचं गाणं गुणगुणंही सुरू होतं. 'तू चीज बडी है मस्त मस्त' असं काहीसं. मग प्रसन्न मनाने व सहजतेने ती बाहेर आली. आपल्याच नादात तिने माझ्यासाठीही दोन ओळी उत्स्फूर्तपणे पेश केल्या, पण माझं लक्ष तिच्या नाचऱ्या डोळ्यांकडे. तिच्या डोळ्यात आंघोळीचा आनंद अन् माझ्या मनात तो आनंदाला निमित्त झाल्याचा आनंद. 'मावशीऽऽ' म्हणून ती जे काही लाजून पळाली, तेवढं छान लक्षात आहे माझ्या.

प्रसंग चिमुकला अन् विलक्षण साधाही, पण रोजच्या जगण्यात असे निखळ आनंदाचे क्षण वेचताना एक आई असण्याचं समाधान मनाला खूप आनंद देऊन जातं.

त्यानंतर घरं बदलली. पुन्हा आमचं स्वत:चं घर झालं. कामवाल्या बायका येतात, क्वचित त्यांची मुलंही सोबत असतात. आताही तसंच मोठं बाथरूम आहे. मुलीही आहेत, पण ती त्यावेळची संगीता, तिच्या डोळ्यातली चमक, तिची ती आंघोळ नि आमचं ते खुश होणं, पुन्हा कधीच जुळून आलं नाही. आताही घरात मुली आंघोळीला जातात. गाणं गुणगुणत असतात. क्षणभर मला वाटतं, येईल का ती संगीता छान स्वच्छ, गुलाबी, मनसोक्त आंघोळ करून बाहेर! नि म्हणेल लाजून, 'मावशीऽऽ!'

# आईची जेव्हा मुलगी होते!

काही गोष्टी नशिबात असाव्या लागतात. उत्तम शाळा, घर, आईवडील, शिक्षक, मित्र-मैत्रिणी मिळणं. प्रत्येकालाच हे सारं मिळतं असं नाही. मग आपलं आयुष्य कुठेतरी कुंठित होतं. प्रसंगी आपण हिरमुसतो. खुरटतो अन् मग त्याचीच सवय होऊन आपलं जगणं नीरस होऊन जातं. तसं माझ्याबाबतीत शाळेच्या मित्र-मैत्रिणींच्या व शिक्षकांच्या फारशा आठवणी नाहीत. वडिलांच्या बदल्यांमुळे माझं शिक्षणही विस्कळीत आणि जेमतेम असं झालं. लग्नानंतर तर शिक्षणाचं राहूनच गेलं. संसाराच्या व्यापात शिक्षणाचं फारसं कौतुकही नव्हतंच मुळात कुणाला. आणि मीही मुळात आळशी, भित्री. त्यामुळे पास-नापासच्या धाकाने शिक्षणाचं खरं तर राहूनच गेलेलं. संसाराच्या व्यापात मग घरकाम, मुलं, त्यांचं बालपण, त्यांच्या शाळा असं सगळं चक्र सुरू झालं. बघता बघता दोन्ही मुली मोठ्या होऊन महाविद्यालयातही जाऊ लागल्या. चाळिशीमध्ये मन पुन्हा एकदा अंकुरतं म्हणतात; तसं मलाही वाटलं की, बारावीनंतरचं आपलं अपूर्ण राहिलेलं शिक्षण पूर्ण करावं. मुक्तविद्यापीठाची छान सोय आहे. कला शाखा घ्यावी. दररोजचं कॉलेज नाही. आठवड्यातून एकदाच कॉलेजला जायचं. जमेल तसा अभ्यास करू, आणि होऊ पदवीधर. असा विचार केला नि घेऊन टाकली तिसऱ्या वर्षाला ॲडमिशन. ॲडमिशनची प्रक्रिया पूर्ण केली. मनाचीही तयारी झाली. मैत्रिणींही सोबत जायला मिळणार होत्या, पण घरात माझ्या या 'डंगरी' कॉलेजची छान थट्टा चाललेली. चेष्टेचा सूर आळवला जात होता, पण मी मात्र माझ्या या



निर्णयावर ठाम होते. माझ्या मोठ्या लेकीने माझी कड घेतली. 'ती उमेदीने शिकतेय ना. मी स्वत: घेऊन जाईन तिला आणि आई, तू घाबरायचं नाही. मी येतेय तुला सोडवायला.' मग काय, आम्हा मायलेकींची जोडी तिच्या स्कूटीवरून छान कॉलेजला निघालीही. मला भारी कौतुक वाटलं तेव्हा तिचं. एरव्ही मी तिच्या गाडीवर बसले नव्हते, असे नाही, पण आज मला कॉलेजला सोडण्यासाठी ती येतेय म्हटल्यावर माझं मलाच विशेष वाटलं. मला त्यावेळेस तिचा शाळेचा पहिला दिवस आठवला. नाजूकशी, इवलुशी, डाव्या हाताची दोन बोटे तोंडात घालून ती मला सारखे विचारत असायची, 'आई, मी केव्हा शाळेत जायचं? मला शाळेत नेऊन सोड ना.' तिचा हा बालहट्ट वेळीच आम्ही पुरवलाही. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या शाळेत तिचा प्रवेश घेतला, पण एक आईचं मन म्हणून काळज्यांचा डोंगर मला सतावत होता. मन खरोखरी साशंक होतं, 'एवढुसा जीव कसा शाळेत जाईल? तिला झेपेल का शाळा? घर सोडून ही कशी काय राहील शाळेत?' एक ना दोन, अनेक विचार मनात येत होते. जीव अगदी कसानुसा होऊन जाई माझा, विचार करून करून. त्यात माझी धाकटी मुलगी ऋतुजा, तिला कुठे ठेवावं? मग आपल्याला तिला शाळेत सोडायला जाता येणार नाही. बघता बघता शाळेत जाण्याचा तिचा दिवस उजडला आणि माझी घालमेल सुरू... पण माझी ही थोरली लेक अगदी सकाळपासूनच छान तयार होऊन बसलेली आणि विचारायचीही मला, 'आई गं, केव्हा जायचं शाळेत?' मग तिचे वडील तिला घेऊन शाळेत सोडायला गेले, पण माझे तर इकडे आतडे तटतट तुटत होते. कशात म्हणून लक्ष लागेना, पण ती मात्र जाताना मला 'अच्छा'! म्हणून निघूनही गेली शाळेत. तन्वी शाळेत गेली, अन् माझं मन आतल्या आत हजार काळज्यांनी हंबरू लागलं. कशी काय राहील पोर शाळेत? अजून ही आपल्याला सोडून कुठेच म्हणून राहिली नाही. हिला भूक लागली, काही हवं-नको ही कसं सांगणार बाईंना? शाळेच्या पहिल्या दिवसाचे ते तिचे ३-३॥ तास मी अगदी केविलवाणे म्हणण्यापेक्षा रडूनच काढले. तन्वी घरी आली, ती वडिलांच्या खांद्यावर छान झोपूनच. ते म्हणाले, 'मी हिला घ्यायला गेलो तर बाईंनी वर्गात बोलावले व बोट दाखवून

म्हणाल्या, ‘ती बघा, तन्वी झोपलीय, उचलून घेऊन जा.’ त्यानंतर कधी म्हणून तन्वीने शाळेत जायला कुरकूर केली नाही. रोज शाळेत जाणं, घरी आल्यावर शाळेत शिकवलेला अभ्यास करणं, गाणी-गोष्टी सांगणं, गमती-जमती असं सगळं शहाणपणाचं ती वागत होती. आज सतरा-अठरा वर्षांनी तेच मला काळजी वाटणारं शहाणं बाळ मोठे होऊन प्रत्यक्ष आपल्या आईलाच शाळेत नेऊन सोडणार होतं. सफाईदार ड्रायव्हिंग करत आम्ही कॉलेजला पोहोचलो. मग तिने पुढाकार घेऊन मला एक मैत्रीणही शोधून दिली. वर्ग शोधून देऊन आम्हा मैत्रिणींना वर्गात सोडून दिले आणि ‘वर्गात मॅडम आहेत हं’, हेही मला सांगितले.

मी वर्गात गेले. ती दरवाज्यातून ‘बाऽऽय’ करून स्कूटीवर बसली आणि भर्रकन निघूनही गेली. क्षणभर मी तिच्या जाण्याकडेच कौतुकाने पाहत राहिले. आज जणू मीच तिची लेक झाले होते आणि ती स्मार्ट आई! तन्वी शाळेत गेल्यावर मी जशी एकटी झाले होते तशीच आज मी ती घरी निघून गेल्यावर मला एकटं वाटलं. काळजात धस्स झालं. उगाच रडू येईल की काय, असंही वाटलं क्षणभर. वाटलं, आजची पिढीच अशी धीट. हीच मुलं पुढं जातील. त्यांची मुलं वाढवताना, त्यांना शाळेत सोडवताना ती अशी आपल्यासारखी भावनाविवश होणार नाहीत. जनरेशन गॅप तर आहेच, पण त्यांचा धीटपणा, विश्वास, व्यावहारिक पातळीवर विचार करणं, करिअरला अग्रक्रम देताना अतीसंवेदनशील न होणं हे यांनाच जमेल हो. असं त्यांचं वागणंही बरोबरच आहे म्हणा. एक चिनी म्हण आहे, ‘मुलाला समजून घेणं म्हणजे आपल्यातलंच लपलेलं मूल ओळखणं.’ मी ते ओळखले व शांतावले. माझ्या या शिक्षणावरून कुणी करोत माझी थट्टा-मस्करी किंवा नसेल माझ्या शिक्षणाचा उपयोग कुणाला, पण आज किती वर्षांनी मला शाळेसारख्या निरलस मैत्रिणी पुन्हा मिळाल्या. ते दिवस पुन्हा उमलून आलेत माझ्या आयुष्यात. ती शाळा, ते वातावरण, त्या परीक्षा, ती ‘शाळीक’ हुरहूर, त्या गप्पा आणि एक विद्यार्थी असणं ही भावना तर खपूच ग्रेट. खरं तर माझं प्रौढत्वच या सगळ्यात छान विरघळून गेलं.

✤✤✤



# एक गुणी लेक : अंकिता

एप्रिल महिन्याचे कडक उन्हाळ्याचे दिवस होते. सकाळी दहा वाजता आईचा मला फोन आला. ‘ताई, तू लवकर ये, तू मावशी झालीयेस. माधुरीला (म्हणजेच माझ्या धाकट्या बहिणीला) मुलगी झालीय.’ ठेंगणी, गोरीपान, दिसायला देखणी अशी माधुरी माझ्यापेक्षा वयाने धाकटी. माझ्या मुलींमुळे ती चार-पाच वर्षांआधीच मावशी झालेली होती. मला भारी हौस होती, मलाही मावशी म्हणावं कुणीतरी.

घाईघाईने घरातलं आवरून मुलींना घेऊन मी दवाखान्यात गेले. कॉटच्या बाजूला चक्क साडीची झोळी केलेली होती, तिकडे तिने बोट दाखवले. मोठ्या उत्सुकतेने मी झोळी उघडून बघितले. सावळ्या रंगाचं, कुरळ्या केसांचं बाळ. डोकं मात्र मोठ्ठं. झोळीत शांत झोपलेलं होतं. दोन मिनिटे वाटलं, बाळ काही तिच्या आईसारखं देखणं नाहीये, पण त्या शांत, निरागस बाळाकडे बघत असताना मला जाणवलं, इतकी शांत, निरागस झोपलीय ही की, देवाने तिच्या चेहऱ्यावर समाधान, समंजसपणा देऊनच हे बाळ पाठवलंय. पण मग विलक्षण आवडलं मला हे बाळ. तीच ही अंकिता.

बाळाच्या आईने मोठ्या हौसेने बाळाचे नाव अंकिता ठेवले. तान्ही असताना अंकिता दिवसभर अगदी कुणी हलवून जागे केले तरी झोपेतून उठत नसे, पण पहिले तीन-चार महिने रोज रात्री ती एकदाची जागी झाली रे झाली की, रात्रभर मग तिला मांडीवरच हवं असायचं. अंकिता पहिले काही दिवस तिच्या धाकट्या मावशीला व पुढे तिच्या आई-वडिलांना

असे चार महिने रात्रभर रडून ती चांगलाच गोंधळ घातला असे. पुन्हा दिवसा येणाऱ्या लोकांना बाळ शांत झोपलेलेच बघायला मिळे.

कसं नि काय चार महिन्यांनंतर हे रडकं बाळ एकदम शहाणं झालं. सगळ्यांची रात्रपाळीतून सुटका झाली. बहीण मग तिला घेऊन आमच्याकडे यायला लागली, तेव्हा अंकिता अगदी शांत असे. फक्त आईचा पदर धरून आईच्या जवळपासच खेळे.

माझी धाकटी तिच्यापेक्षा दहा-अकरा महिन्यांनी मोठी आहे. ती मात्र अंकूला ती आली की खूप त्रास देई. आपली खेळणी घेऊ देत नसे. तिला मार देत असे. अंकूही मग फार हट्ट न करता शांतपणे बघत असे. मी बहिणीला म्हणे, 'किती शांत आहे ना? मनात म्हणत असेल, नको देऊ बाई मला काही, पण तू जरा शांत रहा.' त्यावर बहिणीला खूप हसू येई.

अंकू आमच्या घरी आल्यावर ती माझ्याकडून छान आवरून घ्यायची. माझ्या हातून मोजकंच जेवायची, दूध प्यायची. तेही अगदी शहाण्यासारखं कुठलाच हट्ट म्हणून करत नसे. उगाच काही मागत नसे. ती आल्यावर मी म्हणे, 'अंकू, मावशी म्हण मला.' ती एक-दीड वर्षांची झाली असेल, अंकिताची आई (म्हणजे माझी बहीण) मला ताई म्हणते. हे ऐकून ऐकून ती मला 'ताई मावशी' म्हणू लागली. मला तर खूपच आनंद झाला. अंकूचा आवाज हे तिचे खूप मोठे वेगळेपण आहे. अंकू नेहमीच नाजुक, मंजुळ आवाजात व खालच्या पट्टीत बोलते. माझे मामा म्हणजे अंकिताचे मामा आजोबा तिला गमतीने काली कुऽऽहूऽऽच म्हणतात.

तिच्यामुळे तिच्यानंतर आलेली माझी भाचे कंपनी मला सगळेच ताईमावशी म्हणतात. अंकूबद्दल सांगायचं तर ती अगदी सालस, शांत, काही मागणार नाही, कुणाशी कधी म्हणून भांडणार नाही. काळजीने तिच्या आईने तिला पाच-सहा महिने उशिराच शाळेत घातले.

अंकिता शाळेत गेली. अन् तिचं सगळं शहाणपण, तिच्या अभ्यासातल्या प्रगतीतून दिसायला लागले. विलक्षण हुशार अशी अंकिता शाळेत पहिला क्रमांक मिळवी. नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त मार्क्स नेहमीच तिला असायचे. ती लहान होती, तेव्हा तिचे आईवडील एका आडगावी



रहायचे म्हणून पाचवीला तिला मी माझ्याकडे आणले, पण अंकूला आईवाचून अगदीच करमेना. शाळेतून येताक्षणी ती रडवेली होऊन मला म्हणे, 'ताई मावशी, मला आईकडे जायचंय गं.' त्यामुळे मला खूप वाईट वाटे. महिनाभर कशीबशी अंकू राहिली अन् अंकू तिचा प्रवेश रद्द करून पुन्हा आईजवळ शिकायला गेली.

खरं तर मुली आता मोठ्या झाल्याहेत. त्यांची आपसात भांडणंही होत नाहीत. दरम्यान, अंकू सात-आठ वर्षांची झाल्यावर तिला छोटी बहीण हनी झाली. त्यावेळी अंकूने तिची मोठी दीदी होऊन तिचे लहानपणी खूप लाड केले. तिला पाळण्यात, मांडीवर छानपैकी जोजवले. लहानग्या हनीला ती अभ्यासातही मार्गदर्शन करते. दंगामस्ती करणाऱ्या बडबड्या हनीशी अंकू छान जमवून घेते. तिच्याशी भांडत-तंडत नाही.

पण अंकू, अन् मी यावर मला सांगितलं पाहिजे. ती माझं पहिलंच भाचरं म्हणून असेल. तिच्या माझ्या स्वभावातील शांतपणाचं साधर्म्य यामुळे आमच्या दोघांचे खूप छान टच्यूनिंग जमले आहे. अंकू व मी आम्हा दोघींच्या स्वभावात, खाण्यापिण्याच्या, गोड वागण्याच्या समजावून घेण्याच्या सवयीत असे कितीतरी समान गुण आहेत. अंकूला दहावीला खेड्यातल्या शाळेत शिकूनही तिच्या हुशारीमुळे एक्याण्णव टक्के मार्क्स मिळाले. आमच्या माहेरी व तिच्याही घरी कुणालाच इतके छान मार्क्स मिळालेले नाहीत.

त्यावेळी आम्हा सगळ्यांनाच तिचा खूप अभिमान वाटला. आनंद झाला. मध्यंतरी मी, अंकू व माझी धाकटी मुलगी असा आम्ही तिघींनी कॉम्प्युटरचा एमएससी-आयटीचा कोर्स केला. त्यावेळी तिला त्यात सर्वाधिक मार्क्स मिळाले. त्या परीक्षेच्या वेळेस अंकूने मला छान धीर दिला. तिच्या परीने छान समजावून सांगितले. ही परीक्षा मी दुसऱ्या प्रयत्नात पास झाले तरी अंकू मला न हसता आनंदाने म्हणाली, 'अगं, तू घरचं, नोकरी सगळं सांभाळून पास झालीस. मला आनंद वाटतो हं.' एखाद्या समंजस अशा छोटीचे हे मोठे बोल मला फार कौतुकाचे वाटले.

या कोर्सच्या वेळेस माझ्याजवळ ती छानपैकी तीन महिने राहिली. त्यावेळेस आम्ही दोघीजणी मनाने आणखीनच जवळ आलो. मावशी-

भाचीऐवजी जणू मैत्रिणीच झालो. अंकूला मी काहीतरी शिकतेय! म्हणून भारी कौतुक. प्रत्येक पेपरला ती मला 'बेस्ट लक' देते. माझा पेपर झाल्यावर आपुलकीने विचारते, 'ताई मावशी, कसा काय गेला पेपर?' माझा रिझल्ट आठवणीने विचारते. जणू काही माझ्या जवळच्या मैत्रिणीचे हे एक प्रकारचे प्रोत्साहनच आहे, असे मला वाटते.

अंकूने दहावीनंतर आयटीत प्रवेश घेतला. लहानपणी दोन मिनिटेही आईला नजरेआड न होऊ देणारी अंकू, आता छानपैकी दोन बस बदलत नंतर रिक्षा! अशी कसरत करत तिच्या इंजिनीअरिंग कॉलेजला जाते-येते. एरवी काहीशी अबोल, मितभाषी असणारी अंकू ताई मावशीशी कॉलेजच्या खूप गमती जमती छान शेअर करते. अंकू तिला मैत्रिणींकडून आलेले सुंदर सुंदर एसएमएस आम्ही भेटलो की ती हमखास उघडून देणार, ते मला वाचायला लावणार. तिच्या कॉलेजच्या मासिकातील तिला आवडलेले लेख, कविता मला वाचायला देणार.

हे सर्व करताना आम्ही मावशी-भाची नसतो. आमच्या वयातलं अंतर गळून पडतं. मीही कुणी भरपूर वाचणारी वाचक वगैरे नसते. आम्ही त्यावेळी मैत्रिणी झालेल्या असतो. मला आवडतं ते तिचं मनस्वीपण. ती मला आमच्यातली जनरेशन गॅप वगैरे न जाणवू देता खूपदा मोठीच होते. मीही तिच्या वयाची होते. अन् मग आमचे असे काही मस्त सूर जुळतात की, 'मिले सूर मेरा तुम्हारा'! ती जितकी अबोल आहे तितकीच ती प्रेमळ आहे. ती जितकी हुशार आहे तितकीच नम्रही आहे. ती जितकी वयाने छोटी आहे तितकीच विचाराने ती प्रगल्भ आहे, असं मला जाणवत राहतं. नाही म्हणायला, आता ती जीन-टॉपच्या आधुनिक वेषात असते, पण ती मुळात खूपच साधी, शांत नि समंजस आहे. आज ती डिप्लोमाची कॉलेजकन्यका आहे, पण उगाच पॉकेटमनी उडवणं, घरकामात मदत न करता इकडे तिकडे हुंदडणं, मोठ्यांना उत्तरं न देणं, आईने किंवा कुणीही केलेल्या पदार्थांची माफक स्तुती करत शांतपणे जेवणं, मोठ्यांचा योग्य तो आदर ठेवणं, काटकसरीनं वगैरे रहाणं, असे एक ना हजार गुण तिच्यात पुरेपूर भरलेहेत.

पण, असं सर्व असलं तरी अंकू म्हणजे एखादी छान काकूबाई मुळीच



नाही. तिला नाविन्याची हौस आहे. आधुनिकताही तिला मनापासून आवडते. विनोद, चेष्टामस्करीतही ती सहभागी होते. एखद्याचं आवश्यक ते कौतुक करण्यात ती कुठलीच कसूर करत नाही. सर्वांमध्ये असताना उगीच हे नको, ते नको, मला नाही आवडत म्हणून ती वेगळी नसते. ती सर्वांसारखीच एक असतेच. असं जुळवून घेण्याची तिची स्वाभाविकता स्तिमित करणारी असते. परंतु, अंकू ही माझी भाची म्हणून तिची मुक्तकंठाने स्तुती करणं, हा माझा मुळीच हेतू नाही. एखादी समंजस नि गुणी लेक म्हणून तिचा विचार केला तर असं खात्रीनं म्हणता येईल की, इतकी शहाणी बाळं ज्यांना लाभतात त्या आईबाबाचं सुखही काही औरच असतं.

माझी धाकटी आणि ती जवळपास एकाच वयाच्या. म्हणून आई म्हणून तिला वाढवताना, भरवताना आणि आता तिला मोठं होताना पाहताना मी तिची आईच झालेली असते. का कुणास ठाऊक, एक अभ्यासातली हुशारी सोडली तर मला वाटतं की, मला पुन्हा लहानपण मिळालं तर मी आमच्या अंकूसारखी एक गोड मुलगी म्हणून जगेन, असं मला सारखं वाटतं. माझ्या माहेरी नि सासरी, मुली काय कमीहेत का? पण अंकूसारखी फक्त अंकूच! देवाने तिला सौंदर्य देताना जरा कंजूषपणाच केला, पण मीच काय कुणीही तिच्याशी बोललं किंवा थोडंफार तिच्या सोबतच्या सहवासाने लगेचच जाणवतं की, या पोरीचं आंतरिक सौंदर्य निखालस मोठंय. जीवनाच्या शाळेत माणूस नेहमीच शिकतो. मी स्वत: या शाळेत शिकताना माझी भाची, अंकिताला आदर्श मानते. उत्तमोत्तम गुणांनी अंकिता खरंच परिपूर्ण मुलगी आहे. उद्या ती इंजिनीअर होईल. ती पैसा व नावलौकिक मिळवेल. सुंदर संसार करेल. उत्तमोत्तमपणे जबाबदाऱ्या लीलया पेलेल. आणखी खूपकाही ती होईलही, पण या सर्वांपेक्षा ती एक अतिशय संवेदनशील आणि मनाने श्रीमंत तर खात्रीने होईलच होईल. इतकं परफेक्ट नि नितळपणे वागताना सर्वांनीच तिला पाहिलंय.

होय, मला तिचा खूप अभिमान वाटतो.

# फोटो आईचा

जुन्या-नव्या फोटोंचा अल्बम म्हणजे काय? तर आपल्याच नकळत आपल्याला हुलकावणी देऊन गेलेलं वय आपल्याला फोटोतून साक्षात भेटायला येतं. निसटून गेलेल्या त्या वयाशी मनोमन संवाद साधण्याचा आनंद किंवा शेअरिंग किती किती अवर्णनीय! ना?

तर अशाच अनुभूतीत आई आपल्या मुलीचे वेगवेगळ्या मूड्सचे फोटो बघत होती. अगदी दोन महिन्यांच्या तान्ह्या बाळापासून तर अगदी कालपरवाच्या म्हणजे आज १३-१४ वर्षे वयाची आपली बाळी इतकी पटकन मोठी कशी झाली? यावर तिचा विश्वासच बसेना.

एवढ्या तेवढ्या कारणांवरून रागावणारी ही मुलगी लहानपणी किती शांत होती? एक-दीड वर्षांची असताना रोज रात्री आईला जागवून ग्लासभर दूध मागणारी अन् त्यानंतर दोन-तीन वर्षांची असताना घराबाहेर सगळ्यांशी मस्त भांडणारी, मारामारी करणारी, दादागिरी करून घरात येणारी आपली मुलगी बघता बघता आता दहावीत गेली की! खरंच?

तिच्या लहानपणच्या गमती-जमती, गाल टम्म फुगवून पाय आपटणारी, खूपशी हट्टी आपली मुलगी आता किती उंच झालीय. चक्क आईपेक्षाही अधिक उंच, छान... एवढंच नाही, तर रस्त्याने चालताना जणू ती आईला संरक्षण देत असते. तिचा माझ्या खांद्यावरील हात मला खूपच आश्वासक वाटतो.

ती माझ्यासोबत कुठे नसते? भाजी मंडईत, वाण दुकानावर, बाजारात, बँकेत म्हणजे सगळीकडेच तिची सोबत मला हवीहवीशी आणि सुखावणारी



असते खरं तर तिचे हे उमलायचे दिवस. म्हणून ती मोठी गोड दिसते. मग या कौतुकात तिचा रुबाब ती दाखवते. बाबा आईला काही रागवत असले तर ही छान मध्ये पडते. आईची कड घेते, असं खूपकाही.

वाटतं, मुलगी असली म्हणून काय झालं? मुलाप्रमाणेच भक्कम आधार देते. आईपणाचं विलक्षण सुख देते. म्हणून ही मुलगी मला खूप मोठा आधार वाटते.

हं, तर याच चिमुरडीसाठी तिच्याच आग्रहावरून आम्ही दोघी फोटो स्टुडिओत गेलो. तिला शाळेसाठी म्हणून काही फोटो हवे होते. त्यातच एक आणखी 'आमच्या दोघीं'चा फोटो तिने कुमारीहट्टाने काढून घेतला.

हा फोटोही अल्बमध्ये लावताना आणि आईला तिचे फोटो पाहताना असं जाणवलं की, खरंच आज किती देखणी दिसतेय आपली मुलगी? पण तिच्या लहानपणी अशाच एकत्र फोटोत दिसणारी तिची आई आजच्या फोटोत किती गंभीर दिसतेय. तिचा मस्त मस्त उतार तिने स्वीकारलेला... एक प्रौढ.. समंजस वगैरे.

आईचं बदललेलं हे रूप पाहताना मुलीला चिक्कार हसू आले. तिने मावशीला बोलावून आपल्या आईचा हा एकत्रित आणि जुने, फोटो दाखवले. त्या हसण्यात असूया, चेष्टा नव्हती, पण वास्तव मात्र होतंच. त्यानुषंगाने चर्चा सुरूच होती.

चेष्टा, चर्चा, गमतीच्या पातळीवर चाललेली पाहून एकदम धीरगंभीर होत शिक्षिका असलेली तिची मावशी मध्येच बोलून गेली, 'मुलींनो, माझ्या ताईला हसायचं नाही हं. कितीही वयस्कर झाली तरी तो फोटो 'आईचा फोटो' आहे आणि आई ही नेहमी सुंदरच असते...'

आई म्हणून जगताना कितीही कष्ट, यातना पडू देत, कितीही चेष्टा, अपमान होऊ देत, पण असं एखादं वाक्यही आईला प्रचंड बळ देत राहतं, नि आई पुन्हा पुन्हा 'आई' म्हणून उभी राहत असते, असं मला वाटतं.

✤✤✤

# तिच्या लेकी अन् मी

सन २०००पर्यंत आम्ही एरिगेशन कॉलनीत रहायला होतो. तेव्हाची गोष्ट! कॉलनीत असलेलं आमचं हे घर तळमजल्यावर होतं. शेजारी माझ्या दोन-तीन छान मैत्रिणी. उषा, वासंती, मीना वहिनी यांच्यात माझा मजेत दिवस जाई. मुलीही लहानच होत्या. या घरात त्या त्यांचं त्यांचं करायला शिकल्या होत्या. अन् मीही थोडी कामातून मोकळी होत होते. दररोजची घरकामं होतीच, पण मोकळा वेळ अगदी मिळेच.

मग काय, वाचत पडावं, मैत्रिणींशी गप्पा माराव्यात. रेडिओ, टीव्ही, सांस्कृतिक कार्यक्रमांना अधून मधून जाणं होई. दिवस छान जात होते. मला वाटतं की, मनाची अवस्था चांगली असली की, सर्व जग कसं मायाळू, आनंदी, ताजं, टवटवीत वाटतं. त्यामुळे असेल, थॉयरॉईडच्या आजारातही मला एक प्रसन्न दृष्टी मिळालीय असं वाटे.

घराच्या मागे एक परसबाग होती. चांगलं दगडी वॉल कम्पाऊंड होतं. कपडे वाळवायला, भांडी घासायला, आम्हा मैत्रिणींना गप्पा मारायला छान ऐसपैस जागा होती. आंबा, जास्वंदी, गुलाब, मे-फ्लॉवर, तुळस, ब्रह्मकमळ अशी छोटीशी, पण मनाला आनंद देणारी बाग होती. तीत छोटी-मोठी झाडं होती.

त्यापैकीच सुरुवातीची अन् तिथल्या वास्तव्यात मनात गच्च रुतून बसलेली एक आठवण सांगते. याच कॉलनीतल्या घराच्या मागच्या अंगणात एकदा ५-६ शेळ्यांचा बेंऽऽ बेंऽऽ असा आवाज ऐकू आला. म्हटलं, बकऱ्या कुठून आल्या पहाव्यात, म्हणून मागे डोकावले तर घराच्या



वॉल कम्पाऊंडवर दोन पाय उभे करून, काही बकऱ्या चक्क कम्पाऊंडवर चढून एकमेकींना साद घालत होत्या. माझं बालपण खेड्यात गेल्यामुळे बकऱ्या अन् त्यांना चारणारी म्हातारी पाहून गंमत वाटली.

मग मी त्या बकऱ्यांना न्याहाळू लागले, तर त्यांना चारणारी म्हातारी माझ्या कुतूहलाचा विषय ठरली. कारण ती म्हातारी कम्पाऊंडवर चढलेल्या शेळ्यांना अगदी कौतुकाने, आपल्या वत्सल डोळ्यांनी काही सांगत होती. 'चल बाई गंगा, खाली ये' शेळ्यांना जणू म्हातारीची भाषा समजली, अशा प्रकारे त्या शेळ्या निमूट खाली उतरून म्हातारीजवळ उभ्या राहिल्या.

मशेरी लावून काळे झालेले काही दात व काही पडलेले दात असलेली म्हातारी छान माझ्याकडेच पाहून हसत होती. उंच, बारीकशी, पांढऱ्या केसांचा छोटासा अंबाडा घातलेली व उपरवट्या म्हणावं असं लुगडं नेसलेली, कृश, काळी कुळकुळीत म्हातारी बोळक्यातून हसली तेव्हा वाटलं, छानेय म्हातारी. अन् मी आत निघून आले.

मग आजी मला रोजच दिसू लागली. ती यापूर्वीही कॉलनीत शेळ्या चारायला येत असावी, पण माझं मुद्दाम म्हणून लक्ष तिच्याकडे गेलं नसावं. आता मात्र आजीचा रोजचा वेळ, तिच्या बकऱ्यांचं बेंऽऽ बेंऽऽ करत हुंदडणं, म्हातारीचं त्यांच्याशी बोलणं माझ्या सवयीचं होऊ लागलं. शेळ्याही रोज कम्पाऊंड वॉलवर चढून मस्त उभ्या रहायच्या.

एके दिवशी, मी घरातल्या शिळ्या पोळ्या त्या बकऱ्यांना देऊ लागले, तर म्हातारी मध्येच म्हणाली, 'ताई, तू मला देत जा, काही उरलं सुरलं तर. मी खात जाईन.' बस्स! मग काय, आमची जणू काही मैत्रीच झाली, या वाक्यावर! कम्पाऊंड वॉलच्या दोन्ही बाजूला उभ्या राहून आम्ही नेहमीच बोलू लागलो.

आजीने आपल्या मुलांची, नातवांची ओळख करून द्यावी, तशी बकऱ्यांची ओळख करून दिली. त्यांना तिने नद्यांची नावे ठेवली होती. अन् आपलं हे नाव ठेवणं यावर तिलाच प्रसन्न हसू आलं अन् काळ्या-बोचऱ्या दातांनी ती किनऱ्या आवाजात हसली. मला आजीचा हा गुण विलक्षण आवडला. जणू मी आजीची एक मैत्रीणच झाले होते.

यावर मी आजीला काही प्रश्न विचारले, 'आजी, कुठे राहता तुम्ही?

घरी कोण कोण असतं? बकऱ्या का चारता?' अशांपैकी माझ्या मनात अनेक प्रश्न होते. त्यावर आजीनेही न संकोचता मनमोकळेपणाने सांगून टाकलं.

'ताई, मी एकटीच राहते. महागाईमुळे सून-मुलांत राहणं नाही जमत, पण माझ्या बकऱ्या आहेत ना, त्या माझ्या पोरीचाहेत.'

कुठलाही तक्रारीचा सूर नाही, चीड, संताप नाही. म्हटलं, कुणी दिलं असेल या म्हातारीला हे शहाणपण?

एक दिवशी ती राहत असलेल्या समोरच्या झोपडपट्टी पुनर्वसनासाठीच्या मोर्चात टीव्हीच्या लोकल चॅनलवर आजी मला दिसली. मी तसं आजीला भेटल्यावर सांगितलं, 'आजी, मला तुम्ही काल टीव्हीवर दिसलात. मी पाहिलं तुम्हाला.' बस्स, एवढी साधी गोष्ट, पण आजी अशी काही खूश होऊन लाजली की, मी पाहतच राहिले आजीकडे. आमच्या दोघींचं हे हसणं मी अजून आठवणीत ठेवलं आहे.

एकूण काय, तर आजीची नि माझी गट्टीच जमून गेली होती. एकदा हीच आजी मला हाका मारून बोलवायला लागली. 'वो ताई, मी उद्या शिव्हिलला जाऊन माझ्या डोळ्याचं आपरेशन करून येते.' मला पहिला प्रश्न पडला तिच्या शेळ्यांचा. त्यावर आजी म्हणाली, 'सून घेऊन जाईल शेळ्यांना, शिव्हिलात जेवणबी भेटतं. मी चेस्मा दिल्यावर येईल हं.'

मी 'बरं' म्हणाले.

एव्हाना रोज दुपारी मला तिच्या येण्याची अगदी सवय झाली होती. मी आजीची ओळख माझ्या मैत्रिणींशी-बहिणींशी करून दिलेली होती. त्या मला मनोमन हसायच्याही, पण मला त्यात काही गैर वाटायचं नाही.

आठ-दहा दिवसांनी आजी काळा चष्मा लावून नेहमीप्रमाणे आपल्या बकऱ्या घेऊन आली. अन् मला म्हणाली, 'लेकी, झालं बरंका माझं आपरेशन, डोळा काढला अन् चांगलं दिसाया लागलं बघ मला. ताई, तुही लई आठवण काढली म्या दवाखान्यात.'

क्षणभर मला एकदम चरकल्यासारखं झालं. खरं तर माझं घर ते सिव्हिल हे अंतर पायी जाऊन येण्याइतकं अगदी जवळच. मी आजीला सिव्हिलला जाऊन पाहून यायला हवं होतं. पण माझ्या मनाला असं का



नसेल सुचलं? आजी आपल्याला लेक मानते, ताई-ताई असं प्रेमाने म्हणते, माझ्याशी अगदी घरगुती, मोकळेपणाने बोलते, आपण मात्र तिला घरातलं उरलं सुरलं देऊनच वेगळं ठेवलं. का? खरं सांगायचं तर एकदम ओशाळल्यागत झालं तेव्हा.

आपल्या हिंदीच्या पाठ्यपुस्तकातले चुडीवाले बाबा जमीरखाँ जसे त्यांच्या गाढवीशी गप्पा मारीत असायचे तशी ही आजी शेळ्यांशी खूप खूप बोलायची. माझा-तिचा संवाद दररोजचा केवळ पाचेक मिनिटांचा, पण माझ्या अपरोक्ष तिचा शेळ्यांशी जो काही संवाद चालायचा, तो मात्र ऐकण्यासारखा असायचा.

म्हणजे आजी आपल्या शेळ्यांना जणू समजुतीच्या गोष्टीच सांगायची. 'आगं, रोडावर जायाचं नाही. जोरजोरात गाड्या येत्यात. तुम्हाला लागंल बरं का. अन् सांच्याला घरी जायचं ना आपल्याला, घरी बटरवाला येईल. त्याच्याकडून आपून बटर घेऊ. चाला आता वजंवजं, कडाकडानं.' असं काहीबाही ती सारखं बोलत रहायची. ऐकायला मला खूपच गंमत वाटायची. म्हातारीचं कौतुकही वाटायचं.

असं छान आमचं पाच-सहा वर्षे अगदी नियमित गप्पाटप्पांचं नातं जमलं. एके दिवशी आम्ही स्वत:चं नवीन घर घेतलं. न राहवून मी आजीला तसं सांगितलं. काहीशा नाराजीनंच आजी म्हणाली, 'तू आता तिकडं लगेच राहाला जाशील का लेकी?'

मी म्हणाले, 'आहे अजून एक-दीड महिना.'

काहीतरी बोलायचं म्हणून आजी म्हणाली, 'बरं, पण तिकडं गेल्यावर वळख ठेव बाई.'

मी 'होय' म्हटले. पण काळजात कुठेतरी खोल कालवाकालव झालीच.

थोड्याच दिवसात आम्ही नवीन घरात रहायला आलो. माझी मैत्रीण उषा अजून त्याच शेजारच्या घरात राहते. तिला मी या शेळ्यावाल्या आजीची खुशाली विचारते. तिच्या बकऱ्यांचं, तब्बेतीचं वगैरे विचारते. आजीही तिकडून माझी खुशाली विचारत असते.

आजीच्या आता ५-६ शेळ्यांच्या खंडीभर शेळ्या झाल्यात. आजी

जराशी थकल्यासारखी दिसते. रस्त्याने जाताना-येताना आजी मला दिसतेही, पण थांबून बोलणं होत नाही. मुलीही मोठ्या झाल्याहेत. अन् जे घर आपण सोडतो त्या जुन्या जागेत जायला आपणही उगाच संकोचतो. असं सगळं प्रत्यक्षात तुटक तुटक होत गेलेलं.

तिकडे आई-आबाही (माझे आईवडील) थकलेहेत. मला त्यांची काळजी वाटत राहते. घरात मोठीहेना मी. लेक म्हणून त्यांना धीर देत राहते. मुद्दाम मधून मधून भेटूनही येते. तेव्हा काळजातल्या एका कप्प्यात कुठेतरी ही आजीही असते. जी मला तोंड भरून 'लेक' असं म्हणत होती.

✤✤✤



# माधवी, तुझी आठवण येते

'ग्रंथ आणि मित्र मोजकेच असावेत' असे म्हणतात. का कुणास ठाऊक, माझ्या जीवनात फारशा मैत्रिणी नाहीतच. ग्रंथ हे एक कारण असावं. कारण मी वाचते बऱ्यापैकी. म्हणून मैत्रिणींची संख्या कमी राहिली असावी. पण याचसंदर्भात ग्रंथ आणि मित्र अशा स्वरूपाची चुटपूट लावणारी एक मैत्रीण माझ्या आयुष्यात आली. आमची मैत्री उणीपुरी वर्ष-दोन वर्षांची. पण ती माझ्या आयुष्यात आली काय, नि क्षणार्धात वीज चमकून जावी तशी लुप्तही झाली. त्याची ही एक चटका लावणारी हकीकत...

वाचनाची आवड नि आपण कुठेतरी छानपैकी लायब्ररीयनचा आवडता जॉब करावा! या भावनेने 'लायब्ररी टेक्निशियन'चा तीन महिन्यांचा कोर्स मी २००७ साली केला. आमच्या त्या क्लासमध्ये आम्ही मुलं-मुली मिळून एकूण ६५ विद्यार्थी होतो. वेगवेगळ्या वयोगटाचे आम्ही विद्यार्थी बनून तो चिमुकला कोर्स छान एन्जॉय केला. सकाळी सात ते साडेअकरा असा आमचा दररोज क्लास असायचा. बहुतेकींना ग्रंथपालाची नोकरी होती. त्यामुळे त्यांना दुपारी ग्रंथालयात जावे लागे. एक-दोन आठवड्यात आमची छान गट्टी जमली. आम्ही साऱ्याजणी एकमेकींना नावानिशी ओळखू लागलो. काहीजणी बरोबरीच्या, तर काही थेट आमच्या मुलींच्या वयाच्या शोभतील अशा. एक बरं होतं, त्यातील आम्ही १५-२०जणी सारख्या वयोगटाच्या होतो. एकमेकींचे सूर जुळले. घरगुती परिचय झाला. आर्थिक परिस्थिती बहुतेकांची थोड्याफार फरकाने सारखीच, पण

जबाबदाऱ्याही प्रत्येकीवर वेगवेगळ्या होत्या. मी मात्र कोर्सची गरज आणि आवड अशा दुहेरी हेतूने येथे आलेले होते, पण काहीजणी तर केवळ आत्यंतिक गरज म्हणून कोर्सला जॉईन झालेल्या होत्या. हा छोटा कोर्स तर ग्रंथालयांनी आवश्यकच करून टाकल्यामुळे त्यांच्यासाठी हा हौसेचा मामला मुळीच नव्हता. तरी आम्ही साऱ्याजणी मिळून एक छान ग्रुप जमला. पुन्हा किती तरी वर्षांनी आम्ही शाळेचे दिवस अनुभवत होतो. मन लावून शिक्षण होई. नवनवीन ज्ञान मिळे. एखादा विषय बोअर वाटे. कधी गमती-जमतीही चालायच्या. मधल्या सुटीत आम्ही सहभोजनाचा आनंद लुटत असू. त्यावेळी तरी आमचं विश्व हे केवळ आनंदाचं असं होऊन जाई. मोठं समाधान वाटे, त्यावेळी कोर्सला आल्याचे. आता ती तेव्हाची जेवणं आठवली की, अरुण म्हात्रेंची कविता आठवते,

*'ते दिवस आता कुठे, जेव्हा फुले बोलायची...'*

आम्ही सगळ्याजणी मस्त मजा करायचो. चेष्टा-मस्करी, गप्पा-गोष्टी यांना अक्षरशः उधाण येई. जेवणाची सुटी म्हणजे आमच्यासाठी ब्रह्मानंदी टाळी. घरची सारी कामं आटोपून आम्ही जेवणाचा डबा अगदी आठवणीने आणत असू. खरं तर नुसता भाजी-पोळीचा डबा आणायलाही आमची धांदल उडे. धावपळ व्हायची हे सर्व जमवताना, पण आमच्या सगळ्यांमध्ये 'माधवी' मात्र रोज नवनवीन पदार्थ करून आणत असे आणि सगळ्यांना आग्रहाने खाऊही घालत असे. हळूहळू आमची तिघी-चौघींची तर विशेष गट्टी जमली. गोरीपान, घाऱ्या डोळ्यांची व सुरेख रंगसंगतीच्या साड्या नेसणारी माधवी सगळ्यांशी अगदी प्रेमाने वागे. हसून बोलायची. एखादी कंटाळली, घरातून वगैरे चिडून आली तर माधवीने तिला छान समजावून सांगावं. तिला प्रेमाने दोन घास खाऊ घालावेत. जणू ती आमची माधवीदीदी झाली होती. एकदा मी तिला विचारलं, 'माधवी, एवढ्या सकाळी तुला इडली, ढोकळे, नास्त्याचे वेगवेगळे पदार्थ आणि शिवाय भाजीपोळीचं कसं काय जमतं गं?' माधवी जराही तक्रारीचा सूर न लावता म्हणाली, 'अगं, ह्यांची नोकरी अगदी तात्पुरती आहे, मग मला हातभार लावावाच लागतो. म्हणून मी घरी डबे करते.' सकाळी नास्त्याचा व जेवणाचा असे. सर्व डबे करून मी आपल्या या क्लासला येते. त्यासाठी



मला पहाटे चार वाजताच उठावे लागते. त्यानंतर मी लायब्ररीत जाते. मुलगी लीना कॉलेजात शिकतेय. आता त्यासाठी थोडे जास्तीचे कष्ट करावे लागतात. काय करणार?'

माधवीचा हा दिनक्रम ऐकून आम्हाला सर्वांनाच खूप आश्चर्य वाटले. इतकी दगदग करते, एवढे कष्ट पडतात, पण माधवी तरीही हसतमुख कशी राहू शकते. याचं कौतुकही वाटलं. शिवाय आमच्यासारख्या वैतागलेल्या एखाद्या मैत्रिणीलाही ती प्रेमाने समजावते आणि आपण नुसतं घरचं करतो तरी किती चिडचिड होते आपली. माधवी वयाच्या मानाने छान उत्साही होती. वह्या उत्साहाने पूर्ण करणार. रात्री थोडा का होईना, अभ्यास करणार, अशी नियमितता तिच्यात होती. माधवी ज्या ग्रंथालयात काम करत होती, त्यांनी तिला नोकरीत कायम होण्यासाठी व पगारवाढ यासाठी एलटीसी कोर्सची सक्ती केली होती. त्यामुळे ती म्हणे, 'मला पूर्णच करावा लागेल हा कोर्स. एकदा हा कोर्स पास झाले की, पगार वाढेल. डब्याचा त्रासही कमी होईल. डब्याची दगदग नको वाटते गं. उठल्यावर अर्ध्या-कच्च्या झोपेत स्वयंपाकाला नको होतं. खरं सांगू का? नंतर मी थोडीशी झोपेची चैन करेन.'

तिचे हे बोल ऐकले नि काळजात खोल चरचरलं. मनात वाटलं, 'खरंच हिच्या वाटेला आलेल्या कष्टांना अगदीच मर्यादा नाहीत.' शिवाय माधवी दिवाळीत फराळाच्या ऑर्डर्स घ्यायची. आणखी वर्षभर मेतकूट, चटण्या, लोणचे, चिवडे असं काहीतरी तयार करून विकायची नि घर चालवायची. मला मोठं कौतुक वाटे तिच्या कष्टाचं, धीराचं आणि आनंदी राहण्याचं.

ठरल्याप्रमाणे आमचा क्लास पूर्ण झाला. परीक्षाही झाल्या. आम्ही सगळ्याच मैत्रिणी पास झालो. नंतर लगेच माधवीने कुठल्याशा हळदी-कुंकवाच्या निमित्ताने आम्हाला सगळ्यांना घरी बोलावले. केलेले तिचे दोन उत्तम पदार्थ खायला घातले. पुन्हा घरी येण्याचा आग्रह केला. आम्हीही तिला 'घरी ये' म्हणून आमंत्रण दिले.

आमच्यापैकी एकीला घरी खूप सासुरवास होता. ती चिडे-संतापे आणि रडे. तेव्हा माधवी तिला नेहमी धीर देत असे. माहेरी परत न जाण्याचे

तिच्याकडून वचन घेत असे. तिच्या घराकडून आम्ही तिच्याबद्दल भरभरून बोलत परतलो. त्यावेळी ती आम्हाला दीदी, ताई, मैत्रीण किंवा आई अशा नात्यात वगैरे असल्यासारखे वाटले. सगळं कसं आमचं छान चाललं होतं. ...एके दिवशी तिचा सकाळीच मला फोन आला, 'तू अमुक दवाखान्यात ये. मला जरा बरं वाटत नाहीये.' मी मुलीच्या स्कूटीवर दवाखान्यात गेले. माधवी त्यावेळी मला जरा कोमेजलेली बसलेली दिसली. तिच्याजवळ तिची मुलगी लीना काळजीत बसलेली होती. मी गेल्यावर लीना पटकन बाहेर आली नि 'मावशीऽऽ' म्हणून गळ्यात पडून रडायलाच लागली. मी म्हटलं, 'काय झालंय?' लीना म्हणाली, 'आईला गाठ झालीय. ती तपासायला लागेल. तू जा आतमध्ये. तिला डॉक्टरांनी एवढ्यातच आत घेतलंय.'

डॉक्टर तिला तपासताना मला म्हणाले, 'आपण कोण ह्यांच्या?' तेवढ्यात माधवीच म्हणाली, 'माझी धाकटी बहीण आहे' व्यवस्थित तपासून डॉक्टरांनी माधवीला बाहेर पाठवून मला सांगितले, 'हे बघा, त्यांना ब्रेस्ट कॅन्सर आहे. ताबडतोब ऑपरेशन करायला हवंय. मी बायोप्सी करतोच आहे, पण हा कॅन्सरच आहे. हे मी माझ्या इतक्या वर्षांच्या अनुभवावरून सांगू शकतो. पण थोडं धीरानं घ्या.'

डॉक्टरांचं ठाम निदान ऐकून माझा जीव तसा अगदी घाबरा घुबरा झाला. जिचा कालपर्यंत आम्हा मैत्रिणींना आधार वाटायचा, आज तीच माधवी एका मोठ्या दुर्धर आजाराला सामोरी जाणार म्हटल्यावर मला तर अगदीच भडभडून आलं. कसंबसं स्वत:ला सावरत मी लीनाला आणि माधवीला इकडचं तिकडचं धीराचं काहीतरी सांगितलं, पण मन आतून घाबरून रडायलाच लागलं होतं.

शेवटी माधवीच्या सर्व चाचण्या झाल्या. ऑपरेशनची तारीख ठरली. ते पैसे तिने कसेबसे जमवले, तिच्या ओळखी तरी काय? पण सर्व आटापिटा करून एका चॅरिटेबल हॉस्पिटलमध्ये तिच्या ऑपरेशनचे ठरले. माधवीचं आता काय होणार? या विचाराने काळीज पिळवटून जात होतं, पण या परिस्थितीत आपण काहीच करू शकत नाही, या अपराधी भावनेतही तिच्या ऑपरेशनकडे डोळे मात्र लागून राहिले.



ठरल्याप्रमाणे तिचं ऑपरेशन झालं. तिचं ऑपरेशन झाल्यानंतर मी मनाचा हिय्या करून तिला भेटायला गेले. तिचे पती तिच्या कॉटजवळच उभे होते. माधवीला औषधांची गुंगी होती. ते तिला म्हणाले, 'हे बघ, कोण आलंय तुला भेटायला.' अर्धवट शुद्धीत-अर्धवट बेशुद्धीत माधवी माझ्याकडे बघून म्हणाली, 'काय गं, एकटी आलीस? घाबरू नको, मी बरी आहे.'

मी सांगितले, 'माधवी, मोठी आलीय माझ्याबरोबर. खाली बागेत बसलीय. ती घाबरतेय वर यायला.'

मग थोडंसं हसून ती म्हणाली, 'बरं, पुढच्या वेळेस मैत्रिणींबरोबर किंवा त्यांच्याबरोबरच ये.'

मग केमोथेरपीसारखी असह्य वेदना देणारी उपचार पद्धती सुरू झाली. माधवी समंजसपणे मला म्हणे, 'फक्त त्या दिवशी तू येऊ नकोस. दुसऱ्या दिवसापासून मात्र मला भेटायला येत जा. तुला माझे हाल बघवणार नाहीत.' माधवीचे हे बोल ऐकून मला रडू आवरणे कठीण होऊन जाई. त्यावेळी वाटले, आपण जर कणखर धीराच्या असतो तर माधवी आपल्याला असं का म्हणाली असती? हळूहळू केमोथेरपीचे शेवटचे एक सत्र राहिले. मग माधवी म्हणाली, 'तू माझ्यासाठी कुठेतरी विग बघ. मला आता लायब्ररीत जायचंय गं. त्यांना सांग, ऑफिसमध्ये कुठे चौकशी करा. कुठे मिळतो का बघा.'

मी 'बरं' म्हणाले. एका मैत्रिणीकडून विग बनवून देणाऱ्याचा पत्ता मिळवून तिला फोनवरच दिला. ती त्यावर खुशारल्यासारखी वाटली.

मी तिच्या तब्येतीची चौकशी करतच होते. तीही छान बोलायची. कामावर रुजू होण्याचे सांगायची. मलाही बरं वाटलं. आणि काय आश्चर्य! माधवी हळूहळू लायब्ररीत जाऊन बसायलाही लागली. मनात म्हटलं, 'चला, माधवीचा संसार पुन्हा सुरू झाला, छान झालं.'

सुटकेचा नि:श्वास टाकून मी एकदा-दोनदा उभ्याउभ्याच तिला भेटून आले. ती झोपून असे. तिला असं झोपलेलं पाहणं नको वाटे, पण तिचं अस्तित्व किंवा 'असणं' मला महत्त्वाचं वाटलं. आम्ही तिच्या घरी तेव्हाही जेवलो वगैरे. ती समजूतदारणे झोपून घेई. हवं नको ते तिची

लेक लीनाच पाही. एकदा तर तिच्या नणंदबाईच होत्या तिच्यासोबत. तेव्हा आणखी धीर आला. ‘चला कुणीतरी जवळच आहे, तिचं करायला.’

कुठेतरी माधवीचं मार्गी लागतंय, असं समजून मी माझ्या व्यापात गुरफटले. सणवार, गौरी-गणपती, त्यावेळची माझी नोकरी, घरसंसार यात थोडसं मी माधवीला काहीशी विसरलेच. तशी आठवण येई, पण तो पहिला उत्साह, ते माधवीचं हसणं आणि तिचं भयंकर आजारपण यामुळे गलबलून येई. तिच्याकडे जाण्याचा कंटाळा नाही, पण एक उदासीच आली आमच्या मैत्रीत. नुसती काळजी वाटण्यापलीकडे मी फारकाही केलंही नाही तिच्यासाठी, पण फोनवर आम्ही अगदी नियमितच गप्पा मारीत असू. त्या गप्पात ती एकदा मला उत्साहाने म्हणाली, ‘आता बरं झालं बाई, लीनाचं ग्रॅज्युएशनचं झालं की, छान मुलगा बघून तिचं लग्न करून टाकेन. जावई चांगला पाहिजे. बाकी काही नको गं.’

माझ्यासह सर्व मैत्रिणी नाहीतरी तिला म्हणायचोच नेहमी, ‘जावईबापूंना काय अगदी भरभरून खायला घालशील गं माधवी तू.’ माधवी तेव्हा मनापासून हसे. फोनवर तिचं हसणं ऐकून केवढं तरी समाधान वाटे.

आणि काय नि कसं, माझं आणि तिचंही मध्ये चांगलं पंधराएक दिवस काहीच बोलणं झालं नाही. तिने किंवा मीही तिला फोन केला नाही. नवरात्रीचे दिवस होते. मी लायब्ररीत होते. मला फोन आला, ‘कुलकर्णी बोलताय का? मी माधवीची जाऊ बोलतेय. काल ती गेली.’ अनवधानाने मी मोठ्याने ओरडले, ‘कुठे?’ तर तिकडून त्या म्हणाल्या, ‘देवाघरी.’ तिकडूनही अबोल... इकडे मी थिजून सुन्न झालेली. काय बोलणार? तिकडून फोन ठेवल्याचा फक्त आवाज आला. डोळे नि मन भळभळून वाहू लागलं. हंबरडा फोडावं असं वाटलं, पण हुंदका दाबला. आत-आतून दुःखाच्या चिळकांड्या उडाल्यासारखं होत होतं. एका फोनने माझी जिवलग मैत्रीण अनंतात विलीन झाली होती.

लीनाची आई, आम्हा सगळ्यांची लाडकी मैत्रीण अशी अवचित कशी निघून गेली? इतक्या कष्टात, इतक्या त्रासात ती संसार पुढे रेटत होती. मुलीला शिकवत होती. तिच्या लग्नाचे बेत आखत होती. कष्टपूर्वक



एलटीसीची परीक्षा उत्तीर्ण झाली. आजारातही उभी राहिली. वेदनेची केमोथेरपी तिने सहन केली. ती पुन्हा कामावरही जायला लागली होती. मग माझ्याशी रोज गप्पा मारणारी, उमद्या मनाची, हसऱ्या चेहऱ्याची, घाऱ्या-घाऱ्या गोड डोळ्यांची प्रेमळ माधवी अशी कशी मध्येच कुणाला न सांगता अचानक उठून गेली. कशासाठी केला होता तिने सारा हा अट्टाहास? दैवाने का घेतली असेल इतकी कठोर परीक्षा तिची? तिचं जाणं मला प्रचंड वेदना देऊन गेलं. लीनाला भेटायला जाण्याचे धैर्य होत नव्हते, पण मोठं अवसान गोळा करून आम्ही तिच्या घरी गेलो. तिचे पती म्हणाले, ‘गेले पंधरा दिवस खूपच खालावली होती माधवीची प्रकृती. डॉक्टरांनी तर सांगितलेच होते आणि तिलाही समजलं होतं बहुधा! मी तिला विचारलं होतं तिला शेवटी की, प्रतिभाला कळवायचं का? ती येईल तुला भेटायला.. तुलाही बरं वाटेल.’ यावर ती त्यांना मोठ्या समजूतदारपणे म्हणाली, ‘नका हो, ती खूप घाबरते. मनाला लावून घेईल. आजारी पडेल. तिला सोसणार नाही, माझी ही अवस्था. तुम्ही तिला सगळं शांत पार पडल्यावर कळवा.’

मला माधवीचे ते बोल पुढे ऐकवेना. कशासाठी तिने दुसऱ्याचा असा मनाचा सखोल विचार केला असेल? केवढा हा समंजसपणा! एरवी माणसं जाताना हळवी होतात आणि आमची माधवी! परिस्थितीनं तिला केवढं समंजस, मोठं आणि शहाणं केलं होतं. पगार वाढल्यावर ‘विश्रांती’ची चैन करणार म्हणणारी माधवी आता देवाघरी चिरविश्रांती घेतेय, या विचाराने मन सुन्न होऊन जातं. माधवीच्या फार थोड्याशाच, पण मनाला गोड नि चटका लावणाऱ्या आठवणी मनात आहेत. आता कधी मेनरोडवरून जाताना तिची हसरी, बोलक्या डोळ्यांची लेक लीना एकटीच दिसते. जणू एकटंच वासरू मागे राहिल्यासारखी. ‘मावशीऽ’ म्हणून ती मला बिलगते तेव्हा वाटते, तिच्या गोड, निरागस डोळ्यातून आमची माधवीच मला भेटतेय. ‘माधवी’ येतेय गं येते, तुझी याद येते.

✤✤✤

# आई-आबांविषयी

प्रत्येकालाच आपले आई-वडील प्रिय असतात. आपल्या आयुष्यात आई-वडिलांचं स्थान अनन्यसाधारण महत्त्वाचं! आई-वडील हे आपले काय नसतात? ते आपल्यासाठी सर्वकाही असतात. कधी कधी तर ते आपले समीक्षक आीण टीकाकारही असतात. मला वाटतं, त्यांचं असं असणंही फार महत्त्वाचं नि उपयोगी असतं.

माझ्या आईला मी आईच म्हणते, वडिलांना मात्र आबा. परंतु या दोघांचा विचार करता ती दोघं म्हणायला दोन व्यक्ती आहेत. ती दोघं इतकी एकरूप झालेली आहेत की, त्या दोघांचा स्वतंत्र विचार करणं केवळ अशक्यच आहे. आबा स्वतंत्र प्रज्ञेचे आहेत. आई मवाळ. परंतु आईने मुद्दाम नमते घेतलंय असं नाही. तर चाळीस-पन्नास दशकांअगोदर जन्मलेली आईची पिढी अशीच शांत सोशिक वगैरे राहिलेली आहे. त्यामुळे दोघं विचार विनिमय करतात. आम्हाला तो मान्य असतो, हेही खरंच. मात्र त्यात आबा ९५% टक्के आणि आई ५ टक्के इतकं व्यस्त प्रमाण. आईच्या मात्र हे प्रमाण, हे तिचं स्थान गावीही नसतं. वडिलांचा निर्णय हाच तिचा निर्णय राहिलेला आहे. असो, मग आमची लग्नकाय असो, शिक्षण असो, वा कुठलीही खरेदी वगैरे असो, ते दोघे नेहमीच एक विचारी राहिले. त्यांच्यात मतभेद म्हणून झाले नाहीत.

आबा सरकारी नोकरीत. फार मोठ्या पगाराची वा महत्त्वाची कामं अशी त्यांच्याकडे नव्हती. परंतु त्यात दक्ष असणं, कोटेकोर असणं हा त्यांचा स्वभाव. म्हणून सरकारी नोकरी असूनही त्यात त्यांनी आपला



प्रामाणिकपणा, सचोटी जीवापाड जपली. उगीच टंगळ मंगळ, लांडीलबाडी, कुणाच्या पुढे पुढे करणं, सोयी सवलती लाटणं असे उद्योग त्यांनी कधीही केले नाहीत. सर्व कसं दोरीत, त्यांच्या पद्धतीत व शिस्तीत. त्यामुळे नेमून दिलेले काम चोख पार पाडायचे, हे आबांचे ब्रीद. सेवानिवृत्त होऊन १५-२० वर्षे झाली असतील तरीही त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी अधिकारी-कर्मचाऱ्यांत त्यांचं नाव, आठवण आवर्जून आणि आदराने काढली जाते.

बरं, ही शिस्त, नेकी इतकी पराकोटीची की, कुणी किलोभर द्राक्षं जरी त्यांना 'भेट' किंवा 'वानोळा' म्हणून सेवेत असताना दिली तर त्या माणसाला आपल्या घरी घेऊन जाणं, प्रेमाने चहा पाजणं तर ते करीतच. शिवाय त्याला आवर्जून सांगत, 'काही दिलंच पाहिजे असं नाही. प्रेमाने येत जा घरी.' यापैकी काही लोकांना ही भेट तुम्ही परत घेऊन जा, असाही प्रेमाचा (?) सल्ला ते देत असत. त्यामुळे आबा प्रेमाने बोलताहेत की चिडलेहेत याचा समोरच्याला थांग लागत नसे.

त्याउलट आई, कुणी काही आणलं 'वाऽऽ वाऽऽ', नाही आणलं, 'वाऽऽ वाऽऽ', बरं झालं तसाच आला. कशाला काही अणायचं? असा आईचा स्वभाव. शांत-सोशिक-प्रेमळ. ती फार शिकलेली नाही, परंतु पोटात एक अन् ओठात एक असा तिचा स्वभाव नाही. कुणावर चिडणं ओरडणं नाही. छक्केपंजेचे खेळ तिला ना कधी जमले ना ती कुणाला कधी त्रासदायक ठरली.

खरंतर वडलांचा पगार कमी, त्यात आलं-गेलं, पै-पाहुणे, देणं-घेणं, त्यात आम्ही चौघीजणी. म्हणजे त्यांच्या चार मुली, त्यांच्या दोघांचं मोठेपण हे की, आजवर त्यांनी आम्हाला मुलगी असण्याचं न्यूनत्त्व दाखवलेलं नाही. त्यावरून त्रागा केला नाही. समवयीन माणसांबरोबर गप्पा मारताना, 'मुलगा हवा होता हो एखादा...' असा तक्रारीचा सूरही त्यांनी कधी कुणाकडे लावला नाही. या त्यांच्या मनाच्या मोठेपणाचं मला फारच अप्रुप-कौतुक वाटत आलेलं आहे. एक थोरली लेक म्हणून आई-आबांचा मला यामुळेच फार अभिमानही वाटत आलेला आहे. आणि हो प्रेमही.

आमचं सर्व करता करता, त्यांच्या गाठी पैसे कुठून शिल्लक राहणार?

म्हणून स्वत:च्या घरासारखी गोष्ट त्यांना नाही साधली. त्याचं एक शल्य त्यांच्या मनात जरूर आहे. परंतु आई-आबा दोघेही माणूसवेडी माणसं. ही संपत्ती मात्र त्यांनी अगदी भरपूरच मिळवली.

हा लेख लिहिताना आई-आबांच्या कितीतरी सुंदर-सुंदर आठवणी मनात आहेत. त्यापैकी खाणं-पिणं तर त्यांनी त्यातल्या त्यात तब्बेतीतच केलं. वरण-भात तर कुठल्याही ब्राह्मण घरात ठरलेला. त्यापैकी तांदूळ घेताना तो 'कमोद' घ्यायचे. ती चव आजही जिभेवर आहे. कुठून तरी काहीतरी उचलून आणायचं, असं आबांनी कधीच केलं नाही. जे काही केलं ते पारखून... चोखंदळपणे आणि व्यवस्थित. मला त्यांचा हा चोखंदळ स्वभाव खूप आवडतो.

आणखी एक त्यांच्याविषयी विशेषत्वाने सांगता येईल, त्यांना आणि आईलाही वाचनाचं वेड; त्यामुळे घरी पेपर-मासिकं किंवा पुस्तकं येणं, यासाठी ते आग्रही राहिलेत. लहानपणापासूनच वाचनाची गोडी त्यांनी आम्हाला लावली. फी भरून कितीतरी पुस्तकं आम्ही त्यावेळी वाचत असू. किशोर, अमृत, चांदोबा मासिक दर महिन्याला घरी येत असे. या पुस्तकांनी आम्हाला खूप आनंद दिलाय.

बरं, ही सर्वच पुस्तकं आम्ही बहिणी तर वाचायचोच, पण आमची आईही त्यात सहभागी असे. आजही लहान मुलांची म्हणून ठकठक, चांदोबा, किशोर अशी पुस्तकं आई आवडीने वाचते. वडील मात्र चौफेर वाचतात. मध्यंतरी मारुती चितमपल्लींचं 'चकवाचांदण' हे जाडजूड पुस्तक आईने मन लावून वाचलं आणि ते आपल्याला आवडल्याचं मला फोनवरून कळवलं. 'वाचणारं कुटुंब' असा आमच्या घराचा लौकिक सांगता येईल.

वडिलांचा पगार कमी होता, पण त्यावेळी गरजा मुळात खूपच कमी होत्या. त्यामुळे एक आनंददायी बालपण त्यांनी आम्हाला दिले. आई-आबांना मुळात चांगलं-चुंगलं करून खाण्याची आवड. त्यामुळे भरपूर आणि उत्तम वाणसामान घरी येत असे. आई वेगवेगळे पदार्थ करून आम्हाला खाऊ घालत असे. त्यांच्या प्रोत्साहनामुळे आई, मावशी, आत्या, माम्या यांच्याकडून आम्हीही हा गुण उचलला. त्यामुळे आमच्या



सासरी आमचं कौतुक झालेलं आहे. याचं श्रेय माझ्या आबांना दिलं पाहिजे.

वेगवेगळ्या फॅशन्सचे महागडे कपडे मिळणं त्यावेळी शक्य नसे. परंतु वडील एकाच ताग्यातून कपडा आणून आम्हा सर्वजणींना नवीन कपडे शिवायचे. त्याचाही खूप आनंद वाटत असे. नवीन कपडे ही चैनच होती. त्यावेळी, आबांकडेही दोन-तीन ड्रेस किंवा आईकडेही दोन-तीन साड्या असायच्या फार तर! परंतु त्यातही एक व्यवस्थितपणा होता.

आई-आबांची जोडी म्हणजे खरं तर 'दो हंसों का जोडाच!' सतत एकमेकांची अती काळजी घेणं, एकमेकांशी विलक्षण प्रेमानं वागणं, असं सारं पाहिलं की वाटतं, हे दोघे 'मेड फॉर इच अदर!' वयाच्या पंचाहत्तरीतही त्याचं हे घट्टमुट्ट प्रेम पाहताना, कुणालाही विशेष वाटेल. परंतु त्यांना स्वत:ला मुलगा नसणं... आणि त्याकाळी त्यांनी गरिबीत काढलेल्या दिवसात एकमेकांना दिलेली साथ यामुळे ते दोघे एकमेकांना इतके धरून राहत असावेत, असं मला वाटतं.

आमची चौघींची लग्नं, लग्नानंतरची आमची बाळंतपणं, सणवार, माहेरपण यासारख्या जबाबदाऱ्या त्यांनी यथाशक्ती पार पाडल्या. आम्ही लहान असल्यापासूनच एक तृप्त आयुष्य त्यांनी आम्हाला दिलंय. त्यावेळी सर्वच मुलं आई-वडिलांकडे फार हट्ट वगैरे करत नसत. छोट्याशा गोष्टींनीही समाधान मिळे. वाचनाच्या संस्काराबद्दल तर आम्ही चौघीही मनात कृतज्ञता बाळगून आहोत. त्यावेळी आबा आवर्जुन पेपर विकत घेऊन घ्यायचे, याचं आज कौतुक वाटतं.

आई-वडिलांच्या प्रेमाची एक आठवण आहे. वडील परगावी साईटवर असले की, आठ आठ दिवस त्यांचा मुक्काम तिकडेच असे. मग त्यांच्या पश्चात आई व्यवस्थित घर चालवी. आई आमचं सगळं करून वडिलांनाही डबा पाठवी. पोळ्यांच्या डब्यात आई वडिलांसाठी चिठ्ठी लिहून पाठवीत असे. त्यात ती काय लिहून पाठवायची हे तिलाच ठाऊक, पण त्यांचे हे ट्यूनिंग आजही आहे.

वटसावित्री आणि दिवाळीला आईला आबांकडून नवीन साडी मिळे. ती काही फार भारीतली नसे, पण नवऱ्याच्या पसंतीच्या या दोन साड्यांवर

ती इतकी खूश असे की तिची मागणी म्हणून काही उरतच नसे. आबा आणि आई मिळून टुकीने घर चालवायचे.

आबा व्हॉलीबॉल नि बुद्धिबळ उत्तम खेळत. बुद्धिबळात ते अनेकदा विजयी होत. ते कुठे स्पर्धेत वगैरे खेळल्याचं माझ्या ऐकिवात नाही, पण कॉलनीत, घरात ते बुद्धिबळाचे राजे होते. क्रिकेटची मॅच पाहणं! हा छंद तर आजही त्यांच्यासाठी एक मोठाच विरंगुळा आहे. आईचा म्हणून असा खास छंद नाही. आबांच्या इच्छेत इच्छा मिळवून राहणं, हेच तिने तिचे कर्तव्य मानले. तिच्या माहेरी भरलं गोकुळ होतं. माणसं चांगली होती. याचाही गर्व तिने केला नाही. आमच्या मामा-मामींकडे बहीण-नणंदेचा तोरा तिने कधी मिरवला नाही. सर्वांशी प्रेमाने वागणे एवढंच तिच्याबद्दल प्रामुख्याने सांगता येईल.

आमची चौघींची लग्नं झाली. प्रत्येकीचा संसार विस्तारला. जबाबदाऱ्या वाढल्या. आई-आबा एकटेच राहतात. आम्ही तिघी बहिणी गावातच तर छोटी विद्या विंचूरला असते. येणं-जाणं होतच, पण ती दोघं, 'एकटीच' म्हणून काळजी वाटत राहते सारखी. परतु आई-आबा प्रत्येकाशी प्रेमाने वागतात, बोलतात. आप्पा, उज्ज्वलासारखी मोठ्या मनाची माणसं शेजारी म्हणून त्यांना लाभलीत. आजही त्यांच्या घरात केव्हाही जा, शेजारची छोटी बाळं त्यांच्या घरात हक्काने खेळत असतात. त्यांनाही मुलाचं प्रेम वाटतं. वेळ आनंदात निघून जातो. आम्हालाही वाटतं, चला, कुणीतरी आहे त्यांच्याजवळ.

मध्यंतरी आई घरात पडली. तिच्या पायाला फ्रॅक्चर झाले, पण आमच्या अगोदर हीच माणसं प्रथम त्यांच्यासाठी उभी राहिली. शेजारी पाजारीच जणू त्यांचे मुलगी, जावई, सून तर कधी नातू झालेले. माणसं करतातही प्रेमाने. वडील वयामुळे चिडचिड करतात. त्यांना ऐकू येत नाही. शरीर साथ देत नाही, पण आई शांतपणे ही सर्व गोष्ट बॅलन्स करते.

आजही त्यांच्याकडे स्वतःचं असं घर नाही, तरीही एका मुलीच्या मालकीच्या घरात ते आपलेपणाने राहतात. स्वयंपाकपाणी करतात. कुणी आलं-गेलं तर अगत्यानं चहापाणी करतात. आलेल्याला घासातला घास प्रेमाने देतात, म्हणून मग त्यांच्याकडे पैसे-अडके किंवा सोनं-नाणं नाही



म्हणून आम्हाला कधी वाईट वाटत नाही. त्यांनी माणुसकी अखंड जपली. नम्रतेने वागण्याचं आणि रसिकतेनं जगण्याचे संस्कार दिले. सामान्यातल्या सामान्य माणसातही असामान्यत्व शोधून त्यांचं कौतुक करण्याचं मोठं मन दोघांकडेही भरपूर आहे. आम्ही हा गुण त्यांच्याकडून सहीसही घेतला. त्यामुळे सासरी आम्हाला त्रास झाला नाही.

आई-आबांच्या आयुष्याची संध्याकाळ आता सुरू झाली आहे. स्वत:चं स्वत: करून ते राहताहेत. आम्ही चौघीजणी जमेल तसे आठवड्यातून एकदा तरी त्यांच्याकडे जाऊन येतो. फोन होतोच. शिवाय कुणीतरी ख्याली खुशालीही सांगतातच. त्यांनी आम्हाला काय काय दिलं, आम्हाला त्यांच्याकडून काय काय मिळालं? त्यांनी आमच्यासाठी काय काय करायला हवं होतं? असे हजार प्रश्न, विचार मनात येऊन जातात, पण आता ठरवून टाकलंय मनात की, नाही, आबांचा चिमुकला पगार, सतराशेसाठ जबाबदाऱ्या, त्यांचं स्वत:चं जगणं यात त्यांनी आमच्यावर अखंड प्रेमाची, मायेची पाखर घातली. काही म्हणून कमी पडू दिलं नाही. आता विठ्ठल-रुक्मिणी, लक्ष्मी-नारायणाकडे त्यांच्या भक्तांनी श्रद्धेने पहावं तसं आम्ही त्यांच्याकडे कृतार्थ नजरेने त्यांना डोळ्यात, मनात साठवतोय. त्यांचं अस्तित्व किंवा 'असणं' हेच आमच्यासाठी आता सर्वस्व राहिलेलं आहे. होय, वयाच्या चाळिशीतही एक भावनिक आधार म्हणून आई-आबा दोघंही आम्हाला हवेचहेत.

घरात बहिणींमध्ये मी मोठी. सासरीही एक सून म्हणून. आणि मुली झाल्यावर वय वाढत गेलं. समाजात वावरताना तर एक पांघरुणच घ्यावं लागतं मोठेपणाचं. त्यात वयही वाढतच असतं. आपलं रोज रोज... पण आई-आबांकडे गेले की असं वाटतं, पोरवयातलीच होऊन जाते मी. आताशा तिथे गेल्यावर चहा-पाणी, नाश्ता, प्रसंगी जेवण, भांडीकुंडी अशी सर्व कामं आम्हीच करून टाकतो, पण मनाने मी आईच्या कुशीत शिरलेली असते आणि आबा आमच्याकडे कौतुकाने पाहताहेत असंच वाटत राहतं.

✤✤✤

# सदाकाका

कॉलेजात असतानाची गोष्ट. मी बारावीत होते, तेव्हा वर्गात बसलेली असताना बाहेरून माझ्या मामाचा आवाज आला. 'सर, माफ करा. माझी भाची भार्गवे आपल्या वर्गात आहे. तिला पाठवता का? मी तिला घेऊन जाण्यासाठी आलोय.'

सर 'येस' म्हणाले.

मी आश्चर्याने बाहेर आले. मामा म्हणाला, 'आईने घरी बोलावलंय. तिला व आबांना पिंपळसगावाला जायचंय आता. सदाकाकांना बरं नाहीये.' आम्ही पटकन घरी आलो.

आईने  सांगितले, 'ताई, घरात लक्ष दे. छोट्या तिघींना सांभाळ. मी संध्याकाळपर्यंत तुम्हाला घ्यायला परत येते. सदाकाका देवाघरी गेलेत.'

सदाकाका म्हणजे वडिलांचा धाकटा भाऊ. एकूण सगळ्या सहा भावांपैकी पाच नंबरचा. सदाकाका शेती करायचा. आम्ही गावी गेलो की, शेतातून ऊस, कवठं, बोरं, चिंचा आणायचा. गाणी, भजनं म्हणायचा. कधी कोणाला रागवत नव्हता की, शाळेची, अभ्यासाची वडीलकीने आमची विचारपूसही करायचा नाही. त्यामुळे त्याची आम्हाला भीतीही कधीच वाटली नाही. संध्याकाळी घरी आला की, कधी कधी तो आम्हा सगळ्या मुलांसमोर नाचायचाही. अगदी मुलात मूल होऊन राही. त्याच्या शेतीच्या व्यापामुळे त्याचं आमच्या घरी दोन-चार वर्षांतून एखाद्या वेळेस येणं व्हायचं. त्याचा आम्हाला व आमचा त्याला लळा



असा नव्हता. अन् घरातही तो एकटाच शेतीकाम करायचा. म्हणून की काय, जास्त कुणा भावांमध्ये तो मिसळत नसे. त्याचं नि त्याच्या शेतीचंच काय ते नातं होतं, असं वाटे.

आमची आत्याही, माझे वडील आणि काका लहान असताना वारलेली. त्यामुळे घरात सर्वात जास्त जवळचं माणूस म्हणून काकाला त्याची आई म्हणजे माझी आजीच होती. तशी आमची काकू आणि त्याची मुलंही होती त्याला. पण सदाकाकाचं आजीशी जास्त सख्य होतं. कालांतराने मी मोठी वगैरे होऊन सासरी आले. मग पुढच्या सगळ्या धबडग्यात मला सदाकाकाची फारशी आठवण राहिली नाही.

मागच्या वर्षी माझ्या आईचे खुब्याचे मोठे ऑपरेशन झाले. तिला वर्षभर घरातच रहावे लागले. तब्बल वर्षभराने तिला माझी धाकटी बहीण माधुरी आईला गावातच हवापालट करायला म्हणून तिच्या घरी घेऊन गेली.

तिला भेटायला म्हणून जवळच राहत असलेली आणि पिंपळसचे माहेर असलेली आमची मानलेली मंदाआत्या आईला भेटायला आली. माझ्या आईची ख्यालीखुशाली तिने विचारली. आबांशी भरपूर गप्पा मारल्या. आई म्हणाली, 'मंदाताई, तुम्ही या आमच्या घरी. माहेर आहे तुमचं.'

आत्या हरवून गेल्यासारखी शून्यात बघून म्हणाली, 'वहिनी माहेर? माझा सदाभाऊ गेला अन् मला माहेरचं कोणीच उरलं नाही बघ.'

सदाकाकांसाठी अत्यंत हळवी होऊन आत्या जेव्हा सदाकाकाविषयी उत्कटतेने सांगत राहिली. 'मला माहेरी बहीण, भावंड नाही. देवाने पोटी अपत्यही दिले नाही. सासरी-माहेरी सांपत्तिक स्थिती ठीक आहे, सासरी आले. खूप वर्षांपासून शहरामध्ये राहते म्हणून भाचे, पुतणे यांना जवळ शिकायला आणले. पोटचं पोर नाही, पण सासरच्या सगळ्यांच्या मुलांना शिक्षणासाठी 'ह्यां'नी घरी आणले. त्यांचं सगळ्यांचं आम्ही केलं. आताही मुलं मोठी झाली आहेत. त्यांच्या स्वत:च्या व्यापात अडकली आहेत. माझी आता त्यांना फारशी गरज उरली नाही.

पण राहून राहून सारखी आपल्या सदाभाऊंची आठवण येतेच बघा.

सासरी सणवारी सगळे एकत्र गावी जमायचो. जावांचे भाऊ यायचे. नणंदबाई आपल्या भावांसाठी यायच्या. हसून मला सगळ्याजणी विचारायच्याच, 'काय, येणार का तुझा भाऊ?' मी फक्त मान डोलवायचे. रक्षाबंधन, भाऊबीज सकाळपासून माझ्या घरकामातूनही, पुढच्या दरवाज्यापर्यंत आतुरतेने चकरा सुरू असायच्या. घरातल्या सगळ्यांना तेव्हा हसू यायचे.

जवळच असलेल्या पिंपळसमधून शेतातल्या कामातून दुपारी औत सोडून सदाभाऊ लांबून येताना दिसला की, सासूबाई हाक मारून म्हणायच्या, 'मंदा, आला गं तुझा भाऊ.' पटकन लहान पोरीसारखी मी पळत दारात यायचे. काळासावळा, रापलेला चेहरा, एका डोळ्यात थोडासा तिरळा, धोतर गुडघ्यापर्यंत घेऊन काचा मारलेला, लांब ओपनसा शर्ट घातलेला, त्यात चिखलाचे पाय, धोतराच्या कडाही चिखलाने माखलेल्या.

माझा सदाभाऊ तोपर्यंत अंगणात आलेला असायचा. मोठ्याने म्हणायचा, 'मंदाबाई, आलो गं मी.' बादली भरून पाणी घेऊन मी बाहेर न्यायची. ओसरीवर सदाभाऊ स्वच्छ हातपाय धुवायचा. सासूबाईंना, मेहुण्यांना अदबीनं नमस्कार करायचा. आतमध्ये येतानाच शर्टाच्या आत कोपरीत खिशात पैसे चाचपत यायचा. म्हणायचा, 'मंदाबाई, चला, आधी औक्षण करा. मला राखी बांध. सकाळपासूनच केव्हा एकदा तुझ्याकडे येईन, असं झालं होतं बघ.' मग साग्रसंगीत औक्षण व्हायचं. माझा सदाभाऊ आठाणे, बाराणे भाऊबीज म्हणून ताटात टाकायचा. पायावर डोकं ठेवायचा. तेव्हा दोघांना सुख-दुःखाचे कढ अनावर व्हायचे.

सदाभाऊ भक्कम जेवायचा. आमच्या ऐसपैस गप्पा व्हायच्या. लगेच पुन्हा कामाच्या ओढीने तो शेतावर जायला निघायचा. मी म्हणायचे, 'ये ना, नाशिकला आला तर.'

तेव्हा तो म्हणायचा, 'सवड नाही होत गं. तूच येत जा लवकर...लवकर इथे, म्हणजे आपली भेट होईल. येतो हं मी.'

त्यानंतर तो दिसेनासा होईपर्यंत मी अंगणाच्या बाहेर येऊन त्याला पाठमोरं बघत राही. मला माहीत असायचं, पुढच्या वेळेस पुन्हा माझा



निरोप येईपर्यंत मध्ये काहीच नाही, पण पुन्हा निरोप आल्यावर तो मला इथे भेटायला येईल, हे अगदी ठरलेलंच.

तो मळ्यात निघून गेल्यावर माझ्या जावा-नणंदा चेष्टा करायच्या. 'भावाने आठाणे, बाराणे दिले का? भाऊबीजेचे!' मला मात्र ते आठाणे, बाराणे बाराशेच्या बरोबर असायचे.

अचानक माझा सदाभाऊ गेला. मला मात्र माहेरचा हा एकटाच होता. तोही देवाने हिरावला. आता आपल्याला कुणीच नाही, असं वाटत राहतं.'

नात्यात नाही, गोत्यात नाही, पण माझा केवढा आधार होता. सदाभाऊ! माझ्या जिवाचा विसावा होता. तो होता तेव्हा हक्काने म्हणायला तरी होते, 'माझा पण भाऊ येणार आहे!'

त्यानंतर मात्र अगदीच एकटी झालेय. आता तर साठीही गेली, सत्तरी आली, पण मला मात्र पुन्हा पुन्हा माझा सदाभाऊच आठवतो!

एवढं बोलून आत्याने उसासा टाकला. वाटलं, खरंच हं, ज्याच्या त्याच्या जिवाचे बंध असतात. वडील, आई, आम्ही सगळ्या बहिणी रक्ताने सदाकाकांच्या होतो एवढंच. पण मंदाआत्याच्या व सदाकाकाच्या मधला पवित्र 'रेशीमबंध' आम्हाला कुठे कळला होता? जाणवला होता?

मनातून सदाकाकाला मी जरी विसरले नव्हते, तरी आमच्या सर्वांच्या काहीसा विस्मृतीतच गेलेला होता. पण मंदाआत्यासारख्या मानलेल्या नात्यामध्ये सदाकाकासारखा भोळ्याभाबड्या जीवाचा नवाच पैलू समोर आला आणि मनोमन मी अस्वस्थही झाले. मनात विचार आला, 'रक्ताची नाती खरी असतात की काळीजनाती!'

✤✤✤

# बोक्या

माझ्या माहेरी आम्ही चौघी बहिणीच आहोत. आम्हाला भाऊ नाही. पैकी आम्ही दोघी मोठ्या बहिणी दोन दोन मुली असलेल्या. शेवटच्या दोघींना एक एक मुलगा, असं छान कॉम्बिनेशन आहे. भाऊबीजेला किंवा रक्षाबंधनापुरती भावाची उणीव जाणवायची. भावाची हौस किंवा कुतूहलही असतंच बहिणींच्या मनात. ते कुतूहल वगैरे आमच्या दोघी बहिणींना 'मुलगे' झाले तेव्हा छान अनुभवता आलं.

तीन नंबरची बहीण वैजू आणि तिचा मुलगा यश मुळात शांत, सालस, काहीसा अबोल आणि आज्ञाधारक. त्यामुळे त्याने कधी आमच्यासमोर दंगामस्ती वगैरे केलेली आम्ही कुणी पाहिली नाही. या पार्श्वभूमीवर धाकट्या बहिणीचा, विद्याचा मुलगा साहिल याविषयी मला सांगायचं आहे.

साहिलचा जन्म झाला तेव्हा त्याच्या आईजवळ आम्हीच तिघी मोठ्या बहिणी होतो. पहिलाच मुलगा अन् तोही छान गुटगुटीत, गोरापान म्हटल्यावर सर्वांनाच खूप आनंद झाला. तो झाल्यावर डॉक्टरांनी आम्हाला दाखवायला बाळ बाहेर आणलं, तेव्हाच मनात आलं की, अगदी मोठ्या बोक्यासारखं दिसतंय. नकटं नाक. बाळशामुळे तर त्याचे डोळे अगदीच नेपाळी लोकांसारखे दिसत होते. रडण्याचा आवाजही चांगला मोठा. अन् महत्त्वाचं म्हणजे हृतिक रोशनसारखी बाळाची अकरा बोटे! भाग्याची असतात म्हणे ही बाळं...

दवाखान्यात आम्ही तिन्ही मावशांनी त्याला मांडीवर घेतलं. इतका



बाळ रडायचा. मग त्याचा मुक्काम त्याच्या गावी विंचूरला हलला. पटपट त्याच्यात प्रगती दिसत होती. बाळ मोठं होत होतं. चटपटीतपणा तर एवढा की, त्याला आवरणं आमच्या बहिणीलाच काय, बाळाच्या वडिलांना किंवा त्यांच्या आईलाही (आजीला) शक्य व्हायचं नाही. त्याचं नाव साहिल असं ठेवण्यात आलं, पण लाडाने आम्ही त्याला 'बोक्या'च म्हणतो.

विंचूर हे त्याचं गाव. त्याच्या घराजवळची सर्व घरं, त्याच्यासाठी सदैव उघडी असतात. लहान वयातच म्हणजे एक-दीड वर्षांचा असल्यापासून आई-बाबांना दोरा, चॉकलेट, चहापुडा आणून देणं वगैरे कामं तो व्यवस्थितपणे करतो. कुठे गाडी किंवा चेंडू दिसलाच तर खरेदी ठरलेलीच. चेंडूचं एक आख्खं पोतं त्याने घरात साठवून ठेवलंय.

साहिल राकट आहे, धीट नि बोल बोल बोलणारा आहे. जोरात नि मनमोकळं बोलणं त्याला आवडतं. त्यात इरसाल शिव्यांची बेमालूम पेरणी करणं त्याला आवडतं. आज तो पाच-सहा वर्षांचा आहे, पण त्याचं बोलणं, ज्याने कुणी ऐकलंय त्याला वाटतं की, 'कोणी शहाणं माणूस बोलतंय.' कारण घरातल्या नात्यातल्या, ओळखीच्या, लहान-मोठ्यांची नावे तो जाणून घेतो आणि स्वारी मूडमध्ये आली की एकेरी नावाने त्याच्या हाका सुरू होतात.

बरं, तो इतका प्रेमाने नि ठणकावून विचारतो की, समोरचा फोनवर असो की, प्रत्यक्ष हजर, तो भारदस्त आवाजात दटावतोच, 'ए, काय रे, कुठे आहेस तू... मला गाडी आण बरं का येताना...' त्याला असं बोलताना संकोच, दडपण वगैरे काहीही नसतं. त्या मागणीतही एक आपुलकी, जवळीक असते. त्यामुळे समोरचा त्याला छान समजून घेऊ शकतो.

बरं, ही गाडी किंवा तत्सम खेळणी हातात पडली रे पडली की त्याचे पार्ट्स किंवा त्या यंत्राची आख्खी सिस्टीम बाहेर काढलीच त्याने म्हणून समजावे. असा पार्ट न पार्ट खोलून पाहिला तरच त्याला त्या खेळण्याचं समाधान लाभतं.

त्याची आई काही खरेदीसाठी नाशिकला आली आणि आम्ही

सगळ्या बहिणी गावात मेनरोडला वगैरे फिरताना तो दणकारतोच मध्ये, 'आई, लहान मूल बरोबर आहे, याची तुला काही आठवण आहे का? रस्त्याने मला काही ज्यूस वगैरे पाजायचा तुमच्या लक्षात येत नाही का?' त्याचे हे खडे बोल ऐकताना वाटतं की, असं मोठ्या माणसासारखं याला कसं बोलता येत असेल? आम्हाला त्याचं कौतुक वाटतं, पण आपलं बाळ असं चुकीचं वागलं-बोललं म्हणून त्याची आई, विद्या त्याच्यावर रागे भरते. त्याच्याशी अबोला धरते. मग त्याच्या लक्षात येते की, आपण चुकलोच म्हणून. तो लागलीच आईला म्हणेल, 'आई, सॉरी हं, मी पुन्हा नाही बोलणार असं...' विद्या कधी जोरात ओरडली, रागावली तरी साहिल आपल्या आईला विनंतीवजा स्वरात म्हणतो, 'आई, सॉरी म्हण ना मला.'

दोन नंबरची त्याची मावशी त्याला छान सांभाळते. एवढा दंगेखोर स्वभाव, पण तोही तिच्याकडे चांगला महिना महिना राहतो. कधी चेष्टेने ती त्याला म्हणते, 'साहील, तुझी आई काळी आहे ना?' तेव्हा त्याला खूप वाईट वाटतं. मुसमुसून रडत तो म्हणतो, 'नाही नाही, माझी आई खूप गोरीपान आहे. असं म्हणू नकोस पुन्हा.'

आपलं चुकलंय किंवा आपल्या आई वडिलांविषयी कुणी चेष्टा केलेली त्याला आवडत नाही.रेटेल तेवढं तो ठणकावून बोलतोच. अंगावर आलं की, तलवार म्यान करणं त्याला अचूक साधतं.

त्याच्या घरी आम्ही गेलो की त्याची खूप लगबग होते. साहिलचं घर मोठ्ठंच्या मोठ्ठं आहे. घरामागे मोठा वाडा आहे. घरात काय काय नवीन आलंय, ते त्याला आवर्जून दाखवायचं असतं. त्याची शाळा, त्याची खेळणी, असं काही काही त्याला दाखवायला आवडतं. मधूनच शंका विचारूनही घेतो. 'ए, तुम्ही कधी जाणार आहे घरी?'

'लगेच जाऊ?' असं म्हटलं की, त्याला खूप वाईट वाटतं. त्याचं 'नको, नको' म्हणणं तेव्हा खूप कालवाकालव करतं.

साहिल सध्या तबला शिकण्याच्या क्लासला जातो आहे. त्यामुळे तो कुठेही जावो, टेबल, टिपॉय, डबे याचाही उपयोग तबला वाजविण्यासाठी लीलया करतो. काहीही नवीन शिकायला त्याला आवडतं. ते सर्व पटकन



आत्मसात करण्याची त्याची सवय, अभ्यास करताना चुळबुळत का होईना, आईजवळ तो बसतो आणि छान मार्क्सही मिळवतो. वर्गातही त्याचं कौतुक होतं.

एकदा त्याच्या घरात, त्याच्या काकाचे नुकतेच लग्न झाले होते व लगेचच शाळेचे गॅदरिंग होते. त्याने आपल्या मनानेच सांगितले की, मी नवरदेव होणार. बाईंना त्याचे कौतुक वाटले. मग काय, साहिलचा उत्साह वाढलेला. आईबाबांना सांगून त्याने 'थ्री पीस' आणायला लावला. मोत्याचं नारळ, मुंडावळ्या घेऊन तो छान नवरदेव झाला. प्रत्यक्ष कार्यक्रमात छान आवाजात सगळ्यांना 'जेवल्याशिवाय कृपया जाऊ नका.' अशी खास खेडेगावातली लग्नातल्या माईकवरची घोषणाही त्याने देऊन टाकली.

माझे आईवडील म्हणजे त्याचे आजोळचे आजी-आजोबा त्याच्या घरच्या आजी-आजोबांपेक्षा वयस्कर आहेत. मग तो नाशिकच्या आजी-आजोबांना सांगतो, 'तुम्ही म्हातारे आहात. तुम्ही दोघं आमच्या घरी येऊ नका. माझे आजी-आजोबा तरुण आहेत.' असंही तो कधी कधी बोलतो. त्याचा अर्थ लागत नाही, पण त्याला बोलायला आवडतं. बाळलीला म्हणून त्याचं कुणी कधी मनावर घेत नाही. खूपदा त्याच्या बोलण्यात एक चेष्टेखोरपणा असतो, हेच खरे.

नाशिकचे आजोबा अन् अप्पामामा त्यांच्या घरी गेले, तेव्हा त्याच्या आईने त्यांना जेवायला वाढले. तेव्हा हा त्यांच्याजवळ जाऊन उभा राहिला व त्याने त्यांना दटावले, 'काय रे, तुम्ही काय जेवायला आले का इथे?' असं त्याने बोलू नये, असं वाटतं, त्याची प्रत्येक गोष्ट सर्वजण हसण्यावारी नेतात. मग त्यालाही उत्साह येतो.

साहिल आईबरोबर गावच्या बाजारात जातो, भाजी आणतो, स्वत:च्या बाबांच्या मित्रांना हाच मोठ्याने हाक मारून 'काका, नमस्कार' म्हणतो. त्याला कुणीही सुचवत नाही, पण तो असे काही करतोच. चप्पल-बूट आणतानाही तो दुकानदाराला म्हणेल, 'काय, ही किंमत आहे का? आम्ही तुमच्या गावातलेच ना?' त्याला असं टचकन बोलायला मुळातून आवडतं. तेव्हा त्याची आई निराश होऊन जाते. तेव्हा आपली चूक लक्षात येऊन,

‘सॉरी आई.’ असं म्हणून तो आपली सुटका करून घेतो. आई-बाबा, आजी-आजोबांसारखी बाकीची सर्व माणसं त्याला आपलीच वाटतात.

बरं, त्याला शिष्ट, मस्तीखोर म्हणावं तर तसंही नाही. कुणाकडे काय वस्तू मागावी, त्याचं भान त्याला अचूक आहे. त्या मागण्यात एक मोकळेपणा त्याच्यात असतो. अप्पामामाला तो वही-पेन आणायला सांगेल. दादामामाला तो गाडी आणायला सांगेल. आजी-आबांना पेढे, माधुरी मावशीला कपडे असं त्याचं ठरलेलं असतं.

असं विलक्षण मनमोकळं, काहीसं रांगडं, दणकट असं त्याचं वागणं, पण त्याच्यात एक थोर समंजसपणाही आहे. त्याचं कौतुक वाटतं. टीव्हीवरचा एखादा कार्यक्रम, जाहिरात पाहताना तो उत्तम कानसेन होतो. त्यावेळी आस्वाद घेण्याची त्याची तल्लीनता वाखाणण्याजोगी असते.

मला वाटतं, वय वाढेल तेव्हा हा त्याचा अघोचरपणा कमी होईल. त्याच्यातील एक उत्तम कलावंत, माणूस समोर येईल आणि हे गुणी बाळ विद्याचं नाही, तर संपूर्ण विंचूरकरांचा एक ‘शिंपल्यातला मोती’ होईल! एवढी गुणवत्ता त्याच्यात ठासून भरलीय. त्याच्यातील कलावंतास गरज आहे ती, त्याच्या प्रतिभेला योग्य ते वळण आणि प्रोत्साहन देण्याची.

विद्याच्या वेळी आम्हाला भाऊ हवा होता, पण आमच्या आईला चौघी मुलीच झाल्या. आमची भाऊ असण्याची हौस तशीच राहून गेली, पण साहिल आला नि एक बंड, शहाणा भाऊ कसा असतो! याचा वास्तुपाठच साहिलने आम्हाला दिला. साहिल मोठा होत राहील, पण आमच्यासाठी मात्र तो तेवढाच दवाखान्यातला गुटगुटीत ‘बोका!’

✤✤✤



# प.पू. श्री शंकर महाराज

मूळातच मी अस्तिक वगैरेच. देवधर्मावर माझा प्रगाढ विश्वास. आई-वडिलांचे डोळस संस्कार होतेच. माझे वडील आबा आम्हा सगळ्यांना सांगत, ‘येणाऱ्या-जाणाऱ्या गरजू अतिथींना घोटभर चहा, पाणी अवश्य द्यावं. ईश्वर नावाची अज्ञात शक्ती आपल्याकडे लक्ष ठेवून असते. परमेश्वर आपल्याला कठीण प्रसंगात अज्ञात रूपाने मदत करतो. फक्त श्रद्धा ही हवीच.

त्यामुळे प्रत्येक मंदिरात देवदर्शन घेताना, धार्मिक कार्यक्रमाला जाताना माझ्या मनात अपार श्रद्धा असते. देवीची, संत महात्म्यांची कुणी टिंगल टवाळी केली तर मला ते आवडत नाही. त्या अनुषंगाने कितीतरी धार्मिक पुस्तकं, लेख मी आवर्जून वाचते, त्याप्रमाणे दारात आलेल्या भिकाऱ्याला, याचकाला, साधूला, प्राणीमात्रांना विन्मुख पाठवायला मला कधीच आवडत नाही.

१९९५-१९९६ ला आम्ही नवीन घर घेतलं. अन् घराच्या मागेच दोन-तीन महिन्यांत पंचगुरूंचं एक सुंदरसं मंदिर झालं. आम्ही उत्साहाने दर्शनाला गेलो. त्यात शेगावचे श्री गजानन महाराज, शिर्डीचे श्री साईबाबा, श्री स्वामी समर्थ, श्री गुरुदेव दत्त व धनकवडीचे शंकर महाराज अशा पाच गुरूंची मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेली होती.

त्यातील एक शंकर महाराज तेवढे माझ्या ओळखीचे नव्हते. बाकी सर्व गुरूंना व गुरुदेव दत्तांना तर लहानपणापासूनच सर्वत्र पाहत आले होते. परंतु शंकर महाराजांना तर मी फोटोतसुद्धा कधी बघितलेले नव्हते.

त्यांना मी इथेच प्रथमत: बघत होते. रोखून बघितल्यासारखे शंकर महाराज बघताहेत, असंच वाटलं. प्रथम त्यांच्या नजरेला नजर देताना डोळे आपोआपच खाली झुकत होते.

का कुणास ठाऊक, पण थोडंस घाबरल्यासारखं वाटलं. त्यांचं बसणं, पाहणं, पोषाख सर्वच नवीन नि वेगळं वाटलं. बसताना गुडघे छातीपर्यंत आलेले व त्यांच्याभोवती हाताची मिठी आणि ते भेदक पाहणं सर्व कसं लक्षात राहिलेलं. त्यांना मनोभावे नमस्कार तर केलाच, पण त्यांच्याविषयी जाणून घ्यावं, असंही वाटलंच.

त्यावेळी मी वाचनालयात काम करत होते. तिथे मी ज्यांना गुरू मानते, असे सद्‌गृहस्थ असलेले आदरणीय श्री. सी.आर. कुलकर्णी काकांना त्यांच्याविषयी विचारले. त्यांनी उत्साहाने महाराजांविषयी माहिती दिली. ते म्हणाले, 'घाबरू नकोस. ते मोठे अवलिया पुरुष होते. नाथपंथामधील ते सर्वश्रेष्ठ गुरू आहेत.' काकांच्या या सांगण्यामुळे मी खूपच प्रभावित झाले. मनात कुठेतरी खोल वाटतच होतं की, हे महाराज नक्कीच खूप मोठे कुणीतरी असावेत.

नंतर काकांनी मला त्यांचं एक छोटेखानी चरित्रही आणून दिलं. ते वाच म्हणाले आणि 'साद देती हिमशिखरे' या पुस्तकात उल्लेख केलेले गुरू ते हेच शंकर महाराज आहेत, असे सांगून तेही वाचण्यास त्यांनी मला सुचविले.

त्याप्रमाणे काकांनी दिलेलं महाराजांचं चरित्र मी लगेच वाचून घेतलं. मला त्यांच्याविषयी माहिती मिळाली, तेव्हा कुठे मला धीर आला.

महाराजांविषयी वाटलेली प्रथम भीती आता श्रद्धेत परावर्तीत झाली.नकळत मी महाराजांची अनुयायी झाले होते.

योगायोगाने माझ्या ओळखीच्या पैठणकर काकूंकडे गेले. त्यांना महाराजांची प्रचिती आलेली होती. त्यांच्याकडे याच अनुभवासंबंधी माहिती घ्यावी म्हणून गेले, तर काकूंनी अत्यंत उत्साहाने व श्रद्धेने महाराजांचं चरित्र, पारायण करावयाची पोथी माझ्या हातात ठेवली. त्यावेळी माझी स्वत:ची अवस्था खूपच निराशेची झालेली होती. साडेसातीच्या फेऱ्यात मी विचित्र गुरफटली गेले होते. मन अत्यंत उदास



आणि भयभीत झालेलं होतं. परंतु महाराजांचं चरित्र हातात पडलं. त्यांची पोथी मिळाली आणि खूप धीर मिळाल्यासारखं वाटलं. खूप आश्वासक असं काही वाटलं त्यामुळे. महाराजांना अत्यंत मन:पूर्वक नमस्कार करून पोथी घरी घेऊन आले.

त्यावेळी मनाला जी काही काहिली जाणवत होती ती महाराजांजवळ सांगितली. 'तुम्हीच माझे पाठीराखे आहात.' असे म्हणून महाराजांवर भार सोपवला. त्याप्रमाणे पोथी मनोभावे वाचली. खूप छान, हलकं हलकं वाटत होतं. पहाटे पहाटेच मला स्वप्नात येऊन महाराज म्हणाले, 'अगं, मी तुझ्या घरात आलोय ना, मग काळजी कशाला करतेस?' आणि मी जिथे बसून पोथी वाचली त्या जागेकडे बोट दाखवत महाराज म्हणाले, 'हे बघ, मी इथेच आहे.'

माझ्या मनाला खूप बरे वाटले. कोणी काहीही म्हणो, मला हसो, पण त्या दिवसापासून मी स्वत: शांतवत, आनंदी होत गेले. एकप्रकारची विलक्षण मन:शांती मला जाणवत राहिली. महाराज लौकिकदृष्ट्या वेडं, बागडं, भोळं असं रूप धारण करून इथे वावरले. सामान्य माणसासारखी त्यांनी व्यसनं केली. सर्वसामान्यांना आपलेसे करण्यासाठी ते असं करीत असत. अनेक प्रकारचे दु:खी लोक त्यांच्याकडे आपली दु:खं, गाऱ्हाणी सांगत. महाराज चुटकीसरशी ती सोडवत. अंगारे, धुपारे नाहीत, कर्मकांड नाही, कडक शब्दात रागवत, अनुभूती देत, लोक आपोआप सुधारत. श्रद्धा ही डोळस असावी, असे म्हणतात. कारण आपल्याकडे बाबा-बुवांना काही कमी नाही. हजारो बुवा, गंडेदोरे, तंत्रमंत्र वगैरे विद्या (?) देत बोल बोल बोलतच राहतात. त्यात गोंधळायला होतं. काय चांगलं, काय वाईट, काहीच समजत नाही. म्हणून या सगळ्यांवर विश्वास कसा ठेवावा, हे अचूकपणे सांगणारा कुणी अधिकारी पुरुष आपल्याला भेटावा, असं प्रत्येकाला वाटतं. या पार्श्वभूमीवर नाशिकला गंगेवर जगन्नाथ कुंटेंचे प्रवचन होणार होते. मी त्यांचे नर्मदा परिक्रमा, साधनामस्त सारखी पुस्तकं वाचली होती. तिथे त्यांचे अमोघ विचार मी ऐकले. महाराजांविषयीही त्यांनी सांगितलं. ते अनुभव, प्रचिती ऐकताना खूपच प्रभावित झाल्यासारखं वाटलं. जणू महाराजांनीच मला ते ऐकायला तिथे बोलावले होते. महाराज

खरोखरी अवलियाच होते. २००६ च्या गमभनचा अंक शंकर महाराजांच्या जीवनावरच प्रकाशित करण्यात आलेला आहे. तो मी संग्रही ठेवलाय. त्यात वेगवेगळ्या क्षेत्रातील लोकांचे, त्यांच्या अनुभवांवर आधारित लेखन आहे. आचार्य अत्रे यांनाही शंकर महाराजांची प्रचिती आलेली आहे, असा त्यांची मुलगी कवयित्री शिरीष पै यांचा लेखही त्यात आहे. या लेखात पै यांनी लिहिलेय, 'प्र.के. अत्रे यांनी बुवा तिथं बाया हे नाटक लिहून भल्या भल्या भोंदू बुवा-बाबांची खिल्ली उडविली, पण त्यांनाच शंकर महाराजांमध्ये देवत्व जाणवले होते.' आता तर शंकर महाराजांचे फोटो आणखी काही ठिकाणी मला पहायला मिळाले. शिवाय दूरदर्शनवरही काही जाहिरातींच्या अगोदर व नंतर महाराजांचा फोटो दिसतो, तेव्हा छान वाटतं. शंकर महाराज हे खरोखरीच महान योगी आहेत. ते महान तत्त्वज्ञही होते. आपल्या आतच ईश्वर बसलाय, त्यात डोकावून बघा, हा त्यांचा साधा-सोपा परंतु अत्यंत महत्त्वपूर्ण उपदेश होता.

महाराजांविषयी अशीच एक अनुभव, प्रचिती माझ्या ऐकण्यात घरबसल्या आली. मालपाठक म्हणून कॉलेज युवती आमच्या घरी येत असे. तिने एकदा आपल्याला आलेल्या अनुभवाबद्दल सांगितले, 'माझा भाऊ ४-५ वर्षांचा आहे. तो थोड्याशा अंतरावर राहत असलेल्या त्याच्या मित्राकडे खेळायला जातो व तोही आमच्या घरी येतो. आई-बाबा शंकर महाराजांचे उपासक आहेत. मी मात्र मनोमन त्यांना हसायचे. एके दिवशी अंधार झाला. आमची जेवणे झाली, अन् भावाचा तो मित्र आमच्याकडे खेळायला आला. मी विचारलं, 'कसा आलास रे तू? तुला इथे आणून कुणी सोडलं?' तर तो चटकन म्हणाला, 'माझा मीच आलो ताई. मला खेळायचं होतं ना, तुझ्या भावाशी.'

एक-दीड तास खेळून तो परत गेला. मी त्याला सोडवायला त्याच्या घरी गेले तर तो घराबाहेरच मला म्हणाला, 'ताई, बस आता मी जातो घरात... तू जा आता...' मी त्याला घरात जाताना बघितलं व घरी आले.

दुसऱ्या दिवशी त्या मुलाच्या दारावरून जाताना त्याची आई म्हणाली, 'माझा मुलगा परवा रात्रीपासून फार आजारी आहे गं.' त्यावर मी लगेच त्यांना म्हणाले, 'काकू, तो तर काल रात्री आमच्याकडे खेळायला आला



होता.' मी काहीतरीच बोलतेय, अशा भावनेने काकू बोलल्या, 'नाही गं, तो तर साडेसहा-सातलाच झोपला होता आणि बंगल्याच्या गेटला मी आतून स्वत:च कुलूप लावलं असताना तो कसा तुमच्याकडे येणार?' त्यावर मी काहीच न बोलता तिथून निघून गेले.

पण त्या क्षणीच माझ्या डोक्यात प्रकाश पडला की, महाराजांनी माझ्या अंश्रद्धाळूपणाला हे उत्तर दिले आहे. अन् तेव्हापासून मी महाराजांची निस्सीम भक्त झाले आहे. पैठणकर काकू किंवा ही छोटीशी मैत्रीण मालपाठक यांनी सांगितले म्हणून नाही तर जिथे जिथे म्हणून महाराजांविषयी अनुभव, प्रचिती मिळाली. त्यांच्याविषयी वाचायला, ऐकायला मिळाले असे खूप झाले त्या दिवसात. मी स्वत:ही चरित्राचं पारायण करतच होते. मन शांतवत होते. मी जीवनात पुन्हा उभी राहिले ती केवळ महाराजांमुळेच. आज ते मळभ दूर झालेलं आहे. महाराज आपल्या पाठीशी आहेत. याचा खूप मोठा आधार वाटत राहतो. कुणाची श्रद्धा असो नसो. मी मात्र मनोमन त्यांना नेहमीच स्मरत राहते. आई-आबा थकलेले. आयुष्याची संध्याकाळ अनुभवताहेत. मध्यंतरी आई पडली, मोठं ऑपरेशन झालं. क्षणभर मी गोंधळून गेले, पण आई पुन्हा चांगली झाली. नुसती वाचायलाच नाही तर घरकामही करू लागली. मला वाटतं, महाराजांचा खूप मोठा कृपाशीर्वाद माझ्यासोबत त्यावेळी होता. असे एक ना अनेक केवळ चांगलेच अनुभव. शंकर महाराज हे आता केवळ माझे श्रद्धास्थान असलेले गुरू राहिलेले नाहीत, असं वाटत राहतं की, ते माझे सर्वकाही आहेत. माझं सद्भाग्य की ते मला भेटले. त्यांनी मला संकटातून बाहेर काढलं. जगण्याचा नवीन अर्थ दिला. महाराजांप्रती मी पामर आजन्म कृतज्ञ आहे. आता मागे वळून पाहताना वाटतं की, मी किती भ्याले होते, महाराजांचं प्रथमत: दर्शन घेताना. पण आता? आता तर महाराजांचं स्मरण आणि त्यांचे आशीर्वाद हा तर माझा श्वासच झालेला!

✤✤✤